# प्रकरण दुसरे

# 'वारुळ' कादंबरी प्रेरणा व आशयसूत्रे

१) प्रस्तावना

२) 'वारुळ' च्या प्रेरणा

३) 'वारुळ' चे स्वरुप व आशय सूत्रे

   ३.१) कादंबरीचे स्वरुप

   ३.२) वारुळमधील आशयसूत्रे

४) वास्तववादी आशयसूत्र

५) 'वारुळ' एक सामाजिक आशयसूत्र

६) 'वारुळ' मधील राजकीय आशयसूत्र

७) 'वारुळ' आणि ऐतिहासिक आशयसूत्र

८) 'वारुळ' आणि परिवर्तनवादी आशयसूत्र

९) आशयसूत्रांची गुंफण

- समारोप
- निष्कर्ष
- संदर्भ ग्रंथ

# प्रकरण दुसरे

# ''वारुळ'' कादंबरी : प्रेरणा व आशयसूत्रे

## १) प्रस्तावना :—

१९८० नंतरच्या कादंबरीकारांत विदर्भातिले सृजनशील कादंबरीकार म्हणून बाबाराव मुसळेंना ओळखले जाते. त्यांच्या पहिल्याच कादंबरीने त्यांना जरी ग्रामीण कादंबरीकार म्हणून ओळखले जाऊ लागले तरी त्यांच्या कथा, कादंबऱ्या दलित व ग्रामीण साहित्याच्या सीमारेषेवर असलेल्या दिसून येतात. 'वारुळ' ही त्यांची कादंबरी मातंग समाजाच्या इतिहासाचा आलेख रेखाटणारी आहे. या कादंबरीत स्वातंत्र्यानंतरचा (१९४७) आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महार बौध्द झाले. त्यापासून आजपर्यंतचा कालावधी निरनिराळया सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, भौगोलिक तपशिलासह येतो. एकंदरीत 'वारुळ'चा कालखंड विस्तृत आहे. बौध्द झाल्यानंतर बौध्दांनी गावकीची कामे सोडली त्या कामावर मातंग लोक टपून बसलेले होते. त्यांनी राजीखुशीने गावकीची कामे स्वीकारली. ही कामे करीत असताना मातंगांना मिळणारी वागणूक हीन होती. मर्तिकाचे निरोप सांगणे, दुरडया टोपलीवळणे लाकडे फोडणे, वाजविणे, मेलेली ढोरे ओढून टाकणे, सोलणे, दोखळणे, विकणे व स्वत:चा उदरनिर्वाह करणे. बौध्दांप्रमाणे सर्व दलितांना आंबेडकरांनी संदेश दिला होता. तुम्ही माझ्या पाठीमागून या. परंतु मातंग—बौध्द यांचे पूर्वीचे वैमनस्य कायम आड येते होते. आंबेडकर बौध्दांचे म्हणून आंबेडकरांच्या कोणत्याच संदेशाचा अंगिकार मातंगांनी कधीच केला नाही. बौध्दांनी आंबेडकरांच्या संदेशाने स्वत:चे जीवन गावगाडयाच्या गर्तेतून सोडविले, ते शिकले, सवरले, संघटीत झाले स्वत:च्या हक्क व मागण्यांसाठी त्यांनी संघर्ष केला. सभा, मोर्चे, संमेलने आयोजित केली. परिवर्तनवादी चळवळ उभारुन स्वत:च्या विकासाचा मार्ग चोखाळला. मातंग समाजाने स्वत:च्या विकासाकडे दुर्लक्ष केले. गावकीच्या कामात धन्यता मानली. त्याने मातंगाचा विकास बौध्दांपेक्षा २० ते २५ वर्षे उशिरा झाला. डॉ. भोपळे साहेबांनी मुंबई प्रांतात 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ'नावाच्या

परिवर्तनवादी चळवळीने मातंगांचा विकास झाला. या चळवळीच्या शाखा जिल्हा, तालुका पातळीवरुन प्रत्येक खेडयात सुरु झाल्या व मातंग समाजानेही बौध्दांसारखी शैक्षणिक, अर्थिक, सामाजिक प्रगती केली.

'वारुळ' मध्ये ग्रामीण भागात चालणाऱ्या आलुतेदार, बलुतेदारांचे जीवनचित्रण येते. गावातील सरपंच, पाटील यांच्या राजकीय परिस्थितीचे अनेक पैलू येतात. ग्रामीण भागातील सामाजिक परिस्थिती, समाजवास्तव आणि परिवर्तनवादी चळवळीच्या विकासाचा आलेख आपल्याला कादंबरीत पहायला मिळतो.

## २) 'वारुळ' च्या प्रेरणा :–

साहित्यिक साहित्य निर्माण करतो तो समाजासाठी. 'साहित्य हे समाजाचा आरसा असतो' असे म्हटले जाते. कारण, साहित्यातून समाजाचे जीवनचित्रण केले जाते. समाजांतले अनेक घटक छोटया मोठया प्रसंगातून मांडले जातात. त्यासाठी तो त्या घटकांवर सतत विचारविनिमय करीत असतो. समाजाचे अवलोकन तो संदेनशील मनाने करीत असतो. त्या विचारातून घटनांची प्रसंगाची मालिका त्याच्या मनात चाललेली असते. त्यात त्याच्या भावनांनाही महत्त्व येते. काव्याला किंवा साहित्याला ज्यामुळे मूल्य प्राप्त होते. आशा साहित्यिकांच्या अनुभवात सामान्य माणसांच्या अनुभवांपेक्षा प्रेरणांच महत्त्वाच्या ठरतात. कारण त्या ठिकाणी प्रेरणांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केलेला असतो. लेखक कवींच्या अनुभवाचा आस्वाद वाचक घेत असतो. लेखकाच्या कलेच्या अनुभवात रिचर्ड्स यांनी प्रेरणांनी महत्व दिलेले दिसते. "जाणिवेतील आणि नेणिवेतील इच्छा तसेच मज्जासंस्थेतील घडांमोडी यांना ते प्रेरणा म्हणतात." १ ज्या अनुभवात मूल्य असते त्या अनुभवात जाणिव, नेणिव आणि मज्जासंस्था या तीन प्रकारच्या प्रेरणांना समाधान लाभत असते असे रिचर्ड्स यांचे मत आहे. सामान्य माणसाच्या मनात जो विचार आलेला असतो तो विस्कळीत असतो. लेखकाच्या मनात मात्र तोच विचार सुसंगत असा येतो. परस्पर विरोधी असलेल्या, एकमेकांना खेचणाऱ्या, एकमेकांना अडथळे निर्माण करुन फटकून असणाऱ्या अनेक प्रेरणा साहित्यिकाच्या मनात येतात व एक

स्थिर संतुलन साधतात. साहित्यिकाचे शब्द वाचकांच्या ठिकाणी प्रेरणा निर्माण करु शकतात. साहित्यिकाची कला आपल्या जीवनाच्या प्रतिक्रिया नव्याने निर्माण करुन त्याची वाढ करण्याचा प्रयत्न करते. विचारांमुळे भावना व प्रेरणा निर्माण होतात. प्रत्येक भावनेत प्रेरणा अंतर्भूत असते. रा.भा. पाटणकरांच्या मते:— "त्यामुळे भावनाजागृतीचा अनुभव म्हणजे पर्यायाने प्रेरणाजागृतीचाच अनुभव असतो." २ कादंबरी जेव्हा निर्माण होते. तेव्हा लेखकाच्या प्रेरणांना मूर्त स्वरुप मिळते. त्यांच्या प्रेरणांचा शोधा घेणे म्हणजे कादंबरीच्या आकलनास सुलभ होते. लेखकाच्या प्रेरणांचे स्वरुप निश्चित करण्यासाठी लेखकांचे व्यक्तिमंत्व त्याच्या सभोवतालाचे सामाजिक, सांस्कृतिक वास्तव आणि नैसर्गिक परिसर यांचा मोठा वाटा असतो. कादंबरी लेखनामागील प्रेरणांचे स्वरुप विशिष्ट तत्वानुसार, किंवा जीवनमूल्यांवरील निष्ठेमुळे निर्धारित होते.

एक सामाजिक कादंबरी म्हणून 'वारुळ' कादंबरीच्या प्रेरणांवर प्रकाश टाकणे योग्य ठरेल. 'वारुळ' आदीच्या कादंबऱ्यांच्या प्रेरणा निरनिराळया होत्या. ग्रामीण भागातल्या लोकांची असणारी आर्थिक कुचंबना, सामाजिक रुढी परंपरा, सरकारी वा सहकारी पातळीवर होणारे शोषण, सावकारांनी केलेली पिळवणूक, छळवणूक राजकीय नेते, उच्च अधिकारी यांच्या पातळयावर ग्रामीण भागाबद्दल असणारी उदासिनता शेतकऱ्यांचे व्यापाऱ्यांनी केलेले शोषण इं. प्रेरणा 'हाल्या हाल्या दुध दे' कादंबरी लेखनामागे होत्या. तर 'पखाल', 'वारुळ', 'पाटीलकी', यांच्या प्रेरणा थोडयाशा वेगळया आहेत. यात ग्रामीण भागातील बलुतेदारीचा व्यवसाय नव्या वैज्ञानिक प्रगतीने, तंत्रज्ञानाने मोडीत निघाला. सर्व बलुतेदार देशोधडीला लागले. त्यांचा पारंपरिक पिढीजात धंदा बसला. नवीन व्यवसाय करायला ज्ञान आणि भांडवल नाही. अशा बलुतेदारांची घुसमट सुरु झाली. त्याचे चित्रण 'पखाल' व काही अंशाने 'वारुळ' आणि 'पाटीलकी' मध्येही आलेले दिसते. 'वारुळ' कशी सुचली याविषयी लेखक सांगतात:— "याशिवाय सामाजिक विषमता, त्यातून जाती—जातीत निर्माण होणारे ताणतणव.... सवर्णांनी अस्पृश्य ठरविलेल्या दोन जातींमध्ये ही 'आम्ही श्रेष्ठ, तुम्ही कनिष्ठ,' हा अहंगंड निर्माण करणारा वाद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व अस्पृश्यांना एका धर्माच्या झेंडयाखाली आणण्याच्या

प्रयत्नास बसलेली खिळ आणि त्यातून निर्माण झालेले संघर्ष म्हणजे सवर्ण—दलित—दलित अशा तीन पातळयांवरचा संघर्ष हे प्रत्यही दिसणारे वास्तव मला अस्वस्थ करीत होते. त्यातूनच 'वारुळचा जन्म झाला." ३ थोडक्यात सामाजिक विषमता ही 'वारुळ' कादंबरीच्या लेखनामागे असलेली दिसून येते. जातीय संघर्षाच्या जाळयात समाज गुरफटलेला आहे. 'वारुळ' कादंबरीच्या प्रेरणा सविस्तर पाहू.

१) ग्रामीण भागातील वास्तव जीवन, दलितांवर होणारा अन्याय, अत्याचार रेखाटणे ग्रामीण भागातील वास्तव जीवन सर्व तपशिलांसह यामध्ये येते. वाशिम—अनसिंग—अकोला इ. परिसरात समाज कोणत्या प्रकारचे जीवन जगतो. तो पट यात मांडलेला आहे. प्रत्येक गावात दलित आहेत. त्यांच्यावर सवर्णांकडून शतकानुशतक अन्याय होत आलेला आहे. अजूनही होत आहे. याचे चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न इथे केलेला आहे.

२) भूक—अपमानित जिणे, अज्ञान याविरुध्द आवाज उठविणे ही या कादंबरीची प्रेरणा सांगताना:— डॉ. किशोर सानप म्हणतात. "एकाच स्तरावर लाचारीच स्वाभिमान शून्य जीवन जगणारे हे समाज अज्ञान, दारिद्रय, लाचारी, शोषण यांमुळे पीडित होते, पडीची वाटेल ती कामं गावकी करुन घ्यायची. मोबदल्यात भाकरतुकडा द्यायची. दोन्ही समाजाचा संघर्ष हा केवळ पोटापाण्याचाच संघर्ष होता. भूकेचा संघर्ष होता." ४

३) जातीजातीतील संघर्ष व फुले—शाहू—आंबेडकर विचारांचा चळवळीला झालेला फायदा सांगितला आहे. बौध्द — मातंग या दोन्ही जाती दलित होत्या. तरीही पूर्वीपासून यांच्यात वैमनस्य होते. आंबेडकर बौध्दांचे म्हणून मातंग परिवर्तनात सहभागी झाले नाहीत. फुलेंनी समाजपरिर्वतनाचा अंगिकार केला. शाहूंनी त्याला राजाश्रय दिला व तेच कार्य आंबेडकरांनी पुढे नेटाने चालविले. या दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी असलेल्या त्रयींच्या विचारांचा फायदा मातंगांच्या परिवर्तनवादी चळवळीला कसा झाला याबाबत ओघाने कादंबरीत विवेचन येते.

४) लाचार, दुबळेपणा, दारिद्रय गावकीच्या कामात आनंद मानणाऱ्या समाजाचे चित्रण करणे, बौध्द—मातंग या जातींनी हजारोवर्षे सवर्णांची लाचारी पत्करली,

दुबळेपणातर त्यांच्यात होताच, अर्थिक विकासाचे मार्ग तर सवर्णाच्याच हाती होते. गावकीची कामे करुन परिवर्तनापेक्षा मांग समाजाला पोटाचा प्रश्न महत्वाचा वाटत होता. याविषयी डॉ. किशोर सानप म्हणतात. "मेलेल्या ढोराचं मांस वाटण्याच्या बाबतीतला संघर्ष पूर्वापार सुरु होता. एकाच स्तरावर लाचारीचं, स्वाभिमानशून्य जीवन जगणारे हे समाज अज्ञान, दारिद्रय, लाचारी, शोषण, यामुळे पीडित होते."५ आळशीपणा या समाजाचा दुर्गुण होता. त्यांनी गावकीच्या कामावरच धन्यता मानली. बौध्दांची कामे मातंगांनी स्वीकारली म्हणून त्यांचा विकास उशीरा झाला.

५) मातंगांची शतकानुशतकांची दयनीय स्थिती विषद केलेली दिसते. दलितांची सामाजिक स्थिती दयनीय होती. मातंग समाज आपला मूळ पुरुष मातंगऋषीला मानित होता. स्वतःला पवित्र मानित होता. त्यामुळे त्यांच्यात आळशी, अडाणीपणा वाढीस लागला. पुराणकाळात मातंग ऋषीला जसा त्रास सहन करावा लागला तसा त्याचा वारसा सांगणाऱ्या समाजालाही आजवर त्याप्रकारचा त्रास सहन करावा लागला.

६) गावपातळीवरचे राजकारण आणि त्यात मातंग समाजाची झालेली ससेहोलपट रेखाटणे, याविषयी आपले मत प्रा. अजय देशपांडे पुढीलप्रमाणे मांडतात "समाजाच्या अंतर्गत विरोध समाजप्रगतीला मारक ठरत असतात. वैयक्तिक हेव्यादाव्यातून निर्माण झालेले राजकारण विकासाचा बळी घेणारे असते." ६ असाच आशय 'वारुळ' मध्ये येतो.

७) बौध्द समाजाच्या प्रगतीमुळे झालेली मातंग समाजाला अधिकार व हक्काची जाणिवः—

आंबेडकरांच्या धम्मपरिवर्तनाने बौध्दांनी गावकीची गुलामगिरी नाकारली, ती मातंग समाजाने स्वीकारली. बौध्द शिकले सवरले स्वतःचे हक्क मिळवू लागले, उच्च पदस्थ नोकऱ्या मिळविल्या, त्याची जाणिव मातंग समाजालाही झालेली दिसून येते. आंबेडकरांसारखे नेतृत्व आपल्याला मिळावे, शिकून—सवरुन नोकऱ्या कराव्या, आपल्या समाजाची प्रगती करावी अशी जाणिव निर्माण झाली.

८) परिवर्तनवादी चळवळीमुळे व शिक्षणामुळे मातंग तरुणांत झालेली जागृती विशद करणेः—

बाबाराव मुसळेंनी आपल्या सर्वच कादंबऱ्यातून परिवर्तनवादी चळवळीच्या अलक्षित अशा समाजघटकांचे चित्रण केलेले आहे. १९८० ला डॉ. भोपळेंच्या नेतृत्वाखाली मातंग समाजाला परिवर्तनवादी चळवळीचा लाभ झाला. त्यामुळे मातंग तरुण समाजकार्यात पडला, शिकला, समाजप्रगती, विकास त्याने साधला आणि स्वत:चाही विकास करुन घेतला. बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्यात परिवर्तनाच्या चळवळीची बीजे रुजलेली आहेत. समाजाच्या व्यथा, वेदनांना साहित्यकृतीतून ती येत आहेत. म्हणून प्रा. अजय देशपांडे त्यांच्या कादंबऱ्या बाबत म्हणतात, "परिवर्तनवादी जीवनमूल्ये हेच खरे साहित्यमूल्य असते. याचा प्रत्यय बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्या वाचताना येतो." ७

९) मातंग समाजाच्या स्थितीगतीचा आलेख रेखाटणे, मातंग—बौध्द परिवर्तनाचा इतिहास सांगणे—मातंगांना मातंग ऋषीमुळे पौराणिक संदर्भ लाभतो. तिथून पुढे आपण मातंग ऋषीचे वंशज म्हणून स्वत:ला मातंग पवित्र समजत होते. त्यामुळे मातंग आंबेडकरांच्या चळवळीत सहभागी झाले नाहीत. त्यामुळे बौध्द समाजाच्या प्रगतीशी मातंग एकरुप होऊ शकले नाहीत. अडाणीपणामुळे, आळसामुळे ते गावकी—भावकीतच रमले. त्यामुळे त्यांचा २०—२५ वर्षे विकास उशिरा झाला. त्यासाठी त्यांना डॉ. भोपळेंच्या परिवर्तनाची वाट पहावी लागली. याचा इतिहास 'वारुळ' मध्ये येतो.

१०) ग्रामीण साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या इच्छा — अपेक्षा व त्यांचे प्रश्न मांडणे.

ग्रामीण भागातले ग्रामीण जीवन आपल्या कथा कादंबऱ्यातून बाबाराव मुसळे रेखाटतात. ग्रामीण साहित्यात दलितांचे चित्रण करुन त्यांच्या इच्छा—अपेक्षा कोणकोणत्या आहेत याचे दर्शन मुसळे घडवितात.

११) बौध्द समाजाच्या धर्मातरानंतरच्या काळात मातंगांच्या राजकारणात उद्भवलेल्या अंत:प्रवाहांचा वेध घेणे ही एक महत्वाची प्रेरणा मानावी लागेल.

१२) अण्णाभाऊ साठे नंतर खोळंबलेल्या मातंग समाजाच्या वाङ्‌मयीन आविष्कृतीत जो रिक्त अवकाश होता तो भरुन काढणे अण्णाभाऊनंतर फारच थोडया लेखकांनी मातंग समाजाचे दु:ख मांडले. त्यांनतर काहीकाळ गेल्यानंतर

'वारुळ'च्या माध्यमातून मातंग समाजाच्या वाङ्.मयीन आविष्कृतीत जो रिक्त अवकाश होता. तो भरुन निघाला.

थोडक्यात 'वारुळाच्या प्रेरणेविषयी मुसळे म्हणतात. "ऐंशीच्या दशकात मातंग चळवळ सुरु झाली या चळवळीच्या वाढत्या रेटयाने महाराष्ट्रभरातील मातंग समाजामध्ये जाणिव—जागृतीची ज्योत प्रज्वलित झाली. अज्ञान, दारिद्रय, लाचारी, लाळघोटेपणा, अस्पृश्यता आदीमुळे मागील पिढयांनी स्वीकारलेली शरणागत मानसिकता सोडून नव्या पिढीने आपण महान, तेजस्वी आणि उज्वल अशी परंपरा लाभलेल्या रामायणकालीन मातंगऋषी, लहुजी साळवे, अण्णाभाऊ साठे, यांचे वंशज आहोत ही भावना जोपासली. आपणही तेवढयाच स्वाभिमानी ज्ञानाधिष्ठित, कर्तृत्ववान वृत्तींचा अवलंब करुन स्वत:सह समाजाचा उत्कर्ष केला पाहिजे ही चळवळीची शिकवण आहे. ही शिकवण प्रत्येक मातंग बांधवांपर्यंत पोचवून त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, भागध्येय, प्रकाशमान बनविण्यास सहाय्यभूत झाले पाहिजे या प्रेरणेतून 'वारुळ' चे लेखन झपाटल्यागत केले". ८ 'वारुळ' च्या लेखनामागील प्रेरणा अत्यंत स्पष्टपणे मुसळे यांनी उपरोक्त रुपात मांडली आहे. सामाजिक चळवळीद्वारें सामाजिक अभिसरण्याची प्रक्रिया क्रियाशील होते यावर मुसळे यांचा पूर्ण विश्वास आहे. तद्वतच साहित्य निर्मिती द्वारे ही यास्वरुपाची प्रक्रिया घडू शकते. हे सुदधा मुसळे मान्य करतात. त्यामुळे साहित्य आणि समाज यांचे ऋणानुबंध मुसळे यांना मान्य आहेत म्हणून सामाजिक भान निर्माण करण्याच्या हेतूने त्यांनी 'वारुळ' कादंबरी लिहील्याचे स्पष्टपणे ग्वाही त्यांनी दिली आहे. 'वारुळ' कादंबरीच्या प्रेरणा पाहिल्यानंतर कादंबरीचे स्वरुप पहाणे आवश्यक ठरते.

## ३) 'वारुळ' चे स्वरुप व आशयसूत्रे

### ३.१) कादंबरीचे स्वरुप :—

कादंबरी हा वाङ्.मयप्रकार बहुआयामी आहे. हा वाङ्.मय प्रकार इतर वाङ्.मय प्रकारासारखाच परंतु पूर्णपणे वेगळा असणारा वाङ्.मय प्रकार आहे. त्याचा विकास जर पहायचा झालाच तर आपल्या प्राचीने साहित्यात त्याची बीजे

15187

शोधण्याचा प्रयत्न साहित्य तज्ञांनी केला आहे. 'कांदबरी हे नाव संस्कृत साहित्यातून मराठी वाड्.मयात आले असले तरी वाड्.मयाचा हा आधुनिक ललित प्रकार मात्र इंग्रजी साहित्याच्या परिशिलनाने मराठीत स्थिरावला 'कदंब' वृक्षापासून 'कादंबरी' नाव आले. आणि बाणाच्या 'कादंबरी' पासून 'कांदबरी' या लेखन प्रकाराला 'कादंबरी' हे नामाभिधान मिळाल्याचे दिसते. तरीही कादंबरीचा विकास झाला तो इंग्रजी साहित्यात इंग्रजी सत्तेमुळे भारतीयांना इंग्रजी साहित्याची ओळख झाली. परंतु कादंबरीची बीजे डॉ. किशारे सानप जुन्या गद्य वाड्.मयात शोधतात. "कादंबरी हा रचनाप्रकार जरी मराठीत इंग्रजीवरुन रुढ झाला असला तरी कादंबरीची बीजे जुन्या गद्य वाड्.मयात आढळतात. असे लीळाचरित्र, स्मृतीस्थळ, बखरी, महिपतीकृत चरित्रे आदी." ९मध्ये सापडतात.

अशा प्रकारे मराठी कादंबरीची वाटचाल आज २१ व्या शतकातही चालू आहे. कादंबरीत मात्र काळानुसार बदल झालेला दिसतो. तिच्या स्वरुपा संबंधी सर्वप्रथम मराठीत चर्चा कां. बा. मराठे यांनी केली. नंतर अनेक साहित्य तज्ञांनी कादंबरीच्या स्वरुपाचा विचार केला. चंद्रकांत बांदिवडेकर कादंबरीच्या स्वरुपा संदर्भात म्हणतात:— "कादंबरी हा वाड्.मयप्रकार इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक आहे की त्याचे स्वरुप सांगता आले तरी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण" १० कादंबरी वाड्.मयाला जीवनाचा आरसा संबोधतात म्हणजे वाड्.मयसृष्टीतील संसारचित्र तरी ही कादंबरीकार किंवा कवी यांची निर्मिती यांत्रिक नसून मानवी असल्यामुळे कर्त्याच्या मनोवृत्तीचा त्याच्या स्वातंत्र्य दृष्टीकोणाचा प्रभाव त्याच्या कृतीवर पडणे अपरिहार्य आहे. प्रत्येक वाड्.मय लेखकास स्वत:चे अनुभव, आकांक्षा व विचार प्रदर्शित करण्याची तीव्र इच्छा निसर्गत:च असते. कादंबरीचा अवकाश हा विस्तृत असतो. अनेक छोटे—मोठे प्रसंग, पात्रेही कादंबरीत येतात. त्यात सामाजिक आशय असतो. कोणत्याही सामाजिक समस्येचा पाठपुरावा कादंबरी करीत असते. कांदबरी विषयक भालचंद्र नेमाडेंचे पुढील मत —"कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग — अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते." ११

नमाडयांच्या वरीलमतानुसार 'वारुळ' मध्ये ही आशयसूत्रे येतात ती विविध प्रकारची. 'वारुळ' चे स्वरुप हे निश्चित अशा आशय—विषयांनी, आशयसूत्रांनी भरलेले आहे. आशय सूत्रांविषयी तात्विक विवेचनानंतर 'वारुळ' मधील आशयसूत्रांच्या सहाय्याने आपल्याला तिचे स्वरुप जाणून घेता येईल.

### ३.२) 'वारुळ' मधील आशयसूत्रे :—

'वारुळ' चे स्वरुप निश्चित करण्यासाठी तिच्यातील आशयसूत्रांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरेल. कादंबरी हा कथनात्मक वाङ्.मय प्रकार आहे. छोटया—मोठया प्रसंगातून कथानक पुढे सरकत असते. तस तसे त्यातील आशयसूत्रांचाही विकास होतो. ती पूर्णत्वास जातात. "एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली कल्पना अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्व म्हणजे साहित्यकृतीचे आशयसूत्र".१२ कोणत्याही प्रकारच्या साहित्यकृतीला घटकांना व तपशिलांना आशयसूत्र हे जोडणारे असते. प्रत्येक साहित्यकृतीत आविष्काराचे व आशयाचे अंग असते. वाचन क्रियेत ही अंगे कळत असतात. साहित्यकृतीतील आशय पात्र, स्थळ, काळ, घटनाप्रसंग यांनी संघटीत केलेला असतो. ही सर्व संघटना आशयसूत्रावर आधारित असते. कोणत्याही कलाकृतीत मूळ आशयसूत्र एकच असले तरी आशयद्रव्यांच्या घटकांमुळे व त्यातील संघटनातील भिन्नतेमुळे कादंबरी, नाटक, चित्रपट अशी वेगळी रुपे आकाराला येतात. एक साहित्यप्रकार म्हणून कादंबरीचा अभ्यास करीत असतात. कादंबरीच्या पायाभूत अभ्यासाकडे लक्ष दिले जाते. त्यात कादंबरीचे विश्लेषण केले जाते. विश्लेषण करीत असताना कादंबरीची संहिताचिकित्सा, अनुभवाचे स्वरुप, अनुभवाकडे पाहण्याची लेखकाची दृष्टी आणि अनुभव घेण्याची त्याची पध्दती, अनुभव व्यक्त करण्याची पध्दती याकडे लक्ष द्यावे लागते. यामध्ये मुसळे यांच्या 'वारुळ' कादंबरीतील अनुभवाचे स्वरुप आपल्याला अपेक्षित आहे. हा अनुभव वेगवेगळया आशयसूत्रांनी गुंफला गेलेला आहे.

## ४) वास्तववादी आशयसूत्रः—

'वारुळ' सामाजिक कादंबरी असून तिचे कथानक वास्तववादी आहे. कादंबरी समाजजीवनाची नोंद करणारा वाङ्मय प्रकार असल्यामुळे कादंबरीत समाजवास्तव हे येतेच. समाजाचे आणि व्यक्तिचे वास्तव यात विभाजन होऊ शकत नाही. जर झालेच तर साहित्यकृती निर्माण होऊच शकत नाही. या कादंबरीतही सत्यता येते. कादंबरीच्या सुरुवातीलाच देश स्वातंत्र्य झाल्याची माहिती तारीख महिना, सालासही येते. सुरुवातीलाच या कादंबरीचा नायक प्रभू वर्गात अभ्यास करीत असतो. कुलकर्णी मास्तर त्याला शिकवित असतात. ते प्रभूला तुझा जन्म देश स्वातंत्र्य प्राप्तीच्या, १९४७ च्या साली झाला असे सुचवितात. त्याबरोबरच देशाच्या स्वातंत्र्याबरोबर अप्रत्यक्ष प्रभूला तुही स्वातंत्र झालास असे गुरुजींना सुचवायचे होते. पारतंत्र्यात देश असताना दलितांना शिक्षणांची व्यवस्था नव्हती. शिक्षण फक्त पाटील—पांडे—कुलकर्णी या लोकांच्यासाठीच होते. प्रभूची पहिलीच पिढी मातंगामधील शिक्षण घेत होती. त्यावेळी सवर्णातील शिक्षक महार—मांग मुलांची नावे शाळेत घेत नसत. (उदा. भोसले मास्तर) कुलकर्णी मास्तर ब्राम्हण असले तरी ते महार मांगांच्या मुलांची शाळेत नावे घेतात.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महारमांग या दलित जातीत कोणते बदल झाले याचे दर्शन कादंबरीत येते. १९५६ ला दसऱ्याला आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौध्द धर्म स्वीकारुन महार बौध्द झाले. ढोर ओढून सोलव्यासह सर्व गावकीच्या गलिच्छ कामावर त्यांनी बहिष्कार टाकला. त्या कामावर टपून असलेल्या मातंगांनी मात्र ती लगेच राजीखुशीने स्वीकारली कारण पूर्वी महार लोक पढीचे हिस्से टाकत त्यावेळी मांग लोकांनी वाटे महारांनी आपल्याला थोडे मांस दयावे पण सगळे चांगले मांस आपल्याला घेऊन खराब झालेले मांस मांगाच्या अंगावर ते फेकत यावरुन महार जात श्रेष्ठ, मातंग 'कनिष्ठ हा भेदभाव दिसून येतो. हा भेदभाव पूर्वीपासून चालत आलेला होता. त्यामुळे या दोन जातीत पूर्ववैमनस्य होते.

गावकीची कामे मातंगांच्याकडे आल्यानंतर त्यांच्यात कामाची वाटणी होते. येसाजी पोलीस स्टेशनला हप्त्याचा रिपोर्ट द्यायचा तर चाहादू, यादव, तुळशीराम हे गावात येसकरकी मागून, इतर गावातली कामे करीत होती. नाथा, हारजी, भिका,

संपत यांना ढोर ओढणे, सोलणे, हिस्से टाकणे इ. कामे असत. अशी कामाची वाटणी झालेली होती. पूर्व वैमनश्यामुळे मांग समाजाच्या पिढीला आंबेडकर बौध्दांचे म्हणून जवळीकता वाटत नाही. त्यावर बौध्दांचा शिदनाक येसाजीला आंबेडकरांच्या कर्तृत्वाविषयी सांगतो. "हे पहाय येसाजी, आज मी काय मनतो हे तुले पटणार नाही... पण नशिबानं जर तुले लांब आयुष्य भेटलं तं एक ना एक दिवस तुले हे पटंल की आंबेडकरबाबा एकटया आमच्या जातीचे नाहीत... तुमचे आमचे सगळयांचे आहेत." (वारुळ पृष्ठ १३) आंबेडकरांनी बौध्दांना ढोर ओढणे, सोलणे त्यांचे मांस खाणे या गोष्टी सोडायला लावल्या. स्वाभीमानाने जगायची एक नवी वाट दाखविली. गावकीची लाचारी नाकारायला लावली. एक नवी वाट दाखविली गावकीची लाचारी नाकारायला लावली. एक नवजीवन बौध्दांना मिळवून दिले. त्याचे महत्त्व शिदनाक येसाजील पटवून देतो. पण त्याला पटत नाही. त्यामुळेच बौध्दांना गावातील पाटील व गाव बहिष्कार टाकतो.

'वारुळ' मध्ये रामायण काळातल्या मातंग ऋषींचा संदर्भ येतो. मातंगांना मातंग ऋषीचे वारस म्हणून अभिमान वाटतो. स्वत:ला ते पवित्र समजतात तरी महार व मातंगांचा कुणबी वाट धरतात. मारुतीच्या पारावर कुणबी शाळा भरवू देत नाहीत. कारण महार—मातंगांच्या मुलांमुळे देव वाटेल अशी कुणब्यांची धारणा असते. त्यासाठी महारामांगांच्या पोरांची नावे शाळेतून काढून टाकण्यास सुचविले जाते. कुलकर्णी मास्तरांना प्रभूचा बाट वाटत नाही ते दोघे स्वत:च्या घरी एकत्र फराळ करतात, बसतात, प्रभूला आनसिंगला परीक्षेला गेल्यानंतर आपला डबा कोण आणेल याची चिंता वाटते. कारण मांग लोकांचा बाट सर्वचजण धरीत असतात. गावात जेवायला गेल्यानंतर स्वत:च्या पत्रावळया त्यांना उचलाव्या लागत होत्या. मास्तर प्रभूला माणुसकीची वागणूक देतात. शहरातल्या सुधारणेची जाणिव करुन देतात. वर्गात सुविचार लिहीतात — "माणूस कर्माने मोठा होतो जातीने नव्हे" (वारुळ पृ. १८)

मातंगांची पहिली पिढी शिकलेली नाही. गावकीच्या कामातच त्यांनी धन्यता मानलेली आहे. शेती कधीच केलेली नाही. या पिढीला शिळया—पाक्यावर, उष्टयावर जगायची सवय लागलेली होती. त्यांना कष्ट म्हटले की नको होते.

नोकरी नाही. शिक्षणाची संधीच त्यांना मिळालेली नाही. त्यांच्यावेळी गावातल्या शाळेत महारा–मांगांच्या पोरांना कधी घेत नसत. मातंगांनाही त्याची गरज कधी वाटली नाही. उलट बौध्दांची कामे स्वीकारुन जास्तच घाणीत ही पिढी गेलेली होती. मातंगांची घरे बसकी, कुडाची मातीच्या भिंती असलेली जास्तीत जास्त खांदयाएवढया उंचीची, दरवाजेही त्याचप्रमाणे असत त्यांना खिडक्या नाहीत. कांही घरांवर टीन तर कांही घरे नुसत्या झोपडयाच घरात मुलांची लग्न झाली की त्यांना वावरताही येत नाही. घर वाढवावे, मोठे बांधवे असे कोणा मातंगाला वाटत नाही. बायका मुली उघडयावर आंघोळी करीत एकूण मातंग समाजाची आर्थिक स्थिती नाजूक आहे. सर्व गावावर बौध्द–मातंगांना मालकी वाटायची. तरीही त्यांच्यात बदल होत होता. मांगाच्या माणसाने कुणब्यांच्या माणसांना खुरमान घालण्याची पध्दत होती. पाटील मांगांचे तोंड पहाणे शुभ मानित होते. त्यासाठी कुणबी मातंगांची घरे समोरा–समोर होती. मांगांला पूर्वीपासून लक्ष्मीचा लेक मानित. त्यामुळे ग्रहण मागण्याचा त्याला अधिकार होता. भाडोळा मागणे त्याची गीते ही त्यांना म्हणावी लागत.

बौध्द समाजाचा मातंगांपेक्षा शैक्षणिक विकास जास्त झालेला आहे. मातंग मुले अर्ध्यातून शाळा सोडतात. याविषयी चहादूचा इव्हाई म्हणतो चिकाटीने फक्त बौध्दांचीच मुले शिकतात. बौध्दांनी आंबेडकरांनी दिलेल्या शिकवणीची यावरुन खात्री पटते. मातंग व्यक्ती वचनाला जबानीला जागणारी आहे. प्रामाणिक आहे. येसाजी सोडला तर प्रत्येक कुटुंबाला मुलाची संख्या जास्त आहे. ढोर मेल्याचे समजताच मांगवाडयात आनंद, चैतन्य निर्माण होते. "विश्वास बेल्याची गाय मेल्याची बातमी सगळया मांगवाडयात पसरली तसा सगळा मातंगवाडा चेकाळला लहान लेकर, बायका, म्हातारे–कोतारे या सगळयांच्या तोंडाला जणू पाणी सुटलं" (वारुळ पृ.५५) पहिल्या पिढीत कामाच्या वाटणीवरुन व पडीच्या हिश्यावरुन एकमेकांत भांडणे होतात. मांग जात तेही, तांबोळी, माळी, कुणबी यांच्यांच लग्नात सनई वाजवित महारांच्या कोणत्याच लग्न कार्यात ते वाजवित नाहीत. मातंग स्त्रियांना खायला–प्यायला कुणब्यांच्या स्त्रियांसारख मिळत नाही. मातंगांजवळ शेती, जमिन जुमला नाही. त्यांना रहायच्या घराची पंचायत होती. लग्नात वाजंत्री

म्हणून गेल्यानंतर वऱ्हाडा सोबत त्यांना चालतच जावे लागत होते. कुणबी लोक मातंगाचा व वाजत्र्यांचा बाट धरतात. त्याचा प्रभूला राग येतो. पखवाज वाजविणारा यादव मागांचा माणूस म्हणून कुणब्या, तेल्यांच्या भजनी मंडळला त्याचा बाट वाटतो. कुणबयांच्या लग्नात बौध्दांना मातंग लोक आपल्या पंगतीला बसलेले चालत नाहीत. बौध्दांना मातंगांचा बाट वाटतो. त्याचे वाईट प्रभूला वाटते. मातंगात दुसऱ्या पिढीत (प्रभूच्या) लहान वयातच लग्न केली जातात.

मातंग समाजातल्या बायका कुणब्यांच्या घरी सारवायला, दळण निवडायला, दळण दळायला जात त्याबदल्यात त्यांना भाकरी, मिठ–मिरच्या भेटायच्या काही वेळेला शिळी खराब झालेली भाकरी दिली जायची. मातंग स्त्रीया खळे मागायला जायच्या, गहू हरबऱ्याचे खळे आटोपले की त्या खळे झाडायला जायच्या. पंडीत नेहरुंच्या मृत्यूची बातमी वडगांवपर्यंत येऊन पोचते. १९७१ च्या दुष्काळाचा संदर्भ,भारत–चीन युध्द, भारत – पाकिस्तान युध्द, लाल बाहाददूर शास्त्रींच्या काळात झाले. त्यात भारताचा झालेला विजय मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी परदेशाहून येणाऱ्या मिलो व गव्हाचा केलेला निषेध, शेतकऱ्यांसाठी त्यांनी आणलेली 'कापूस एकाधिकार योजना',शेती सिंचनासाठी त्यांनी घडवलेले बदल अशा सर्व माहितींचा वास्तववादी संदर्भ 'वारुळ' मध्ये येतो. मातंगांच्या आठरा जातींचा उल्लेख यामध्ये येतो. त्यात मांग, मातंग, दखनी मांग, मांगमशी, मदारी, गारुडी, मांगगारुंडी इ. जोशी, गोंधळी, वासुदेव, डुंबरकीवाले, नंदीवाले, माकडवाले, अस्वलवाले हे सर्व प्रथम मांगाच्याच घरी भिक्षा मागतात. त्यामुळे भिक्षेला बरकती येते अशी त्यांची धारणा आहे.

मातंगांची दुसरी पिढी पारंपरिक कामे सोडून शिकून–सवरुन नोकरी व्यवसायाकडे वळते. नायक प्रभू कोतवालपदासाठी अर्ज करतो तर गणा स्वत:च्या बॅडचा व्यवसाय करतो. हया पिढीला गावकीची कामे कराविशी वाटत नाहीत. ग्रहण मागणे, भांडळांची गाणी म्हणायला आवडत नाही हा बदल या दुसऱ्या पिढीत थोडयाफार शिक्षणाने झालेला आहे. १४ एप्रिल १९७० ला प्रभूला मुलगा होतो ही मातंगांची तिसरी पिढी आहे. हीच अधिक प्रकाशमान आहे. दुसऱ्या पिढीतले उंबरकर गुरुजींसारखे लोक स्वत:चे आडनाव बदलून घेतात. मातंग

समाताला हेच लोक शिक्षणाचे महत्व पटवून देऊन समाजजागृती करतात. आंबेडकरांच्या कार्याविषयी समाजाला उद्बोधन करतात. हळूहळू या पिढीत बदल होतो. लोक एकमेकांला किंमत देत नाहीत. पाटील होता त्यावेळी त्याच्या बैठकीत सर्व अधिकारी बसत. आज मात्र ग्रामपंचायतीमुळे सर्व लोकांत बदल होतो. निवडणूकीत पाटील सांगतील त्यालाच मत दिले जायच. पण आता त्याच्या उलट लोक आपल्या मताची किंमत वसूल करायला लागले आहेत.

'वारुळ' मध्ये १९७० सालच्या दुष्काळाची भीषणता येते. सर्व शेतकरी कर्जबाजारी झाले होते. घरात अन्न मिळावे यासाठी घरातली भांडी—कुंडी विकली जाऊ लागली होती. दुष्काळाने सर्वांना त्रास व्हायला लागला. लोक नाती गोती विसरली होती.

"......१९७० सालचा हा दुष्काळ माणसांची रया उडवून गेला. या दुष्काळाने भाऊ भावला व बहिणीला ओळखेनासा झाला.... माणुसकी मेली कसेबसे आपले पोट भरणे महत्वाचे वाटू लागले." (वारुळ पृ. १४५) लेखकाला १९७० च्या दुष्काळाची जाणिव असलेली दिसून येते. त्याने सर्व महाराष्ट्र हवालदिल झालेला होता. अशा अवस्थेत सरकार काहीच करु शकत नाही याविषयी प्रा. अजय देशपांडे म्हणतात. "अशा दीनवाण्या अवस्थेतल्या समाजासाठी सरकारही काहीही करु शकत नाही. ते अधिक ठळकपणे दिसते. कुठल्याही शोषित—पीडित समाज घटकाच्या मदतीला शासन कधी धावून येत नाही हे वास्तव येथे अधोरेखित होते." १४ दुष्काळाची भीषणता शहरात कमी होती. चोऱ्या लुटमाऱ्यांचे प्रमाण वाढले होते. वडगावच्या मातंगात येसकरकी मागणाऱ्या लोकांचे हाल होते. फक्त चहादूचे पोट कसेबसे भरत होते. इतरांची उपासमार होत होती. कुणब्यांनी आपली ढोर रानात सोडलेली होती. त्यामुळे ढोर ओढायचे सोलायचे काम उरले नव्हते. मातंगांची तर वाईट स्थिती झाली होती. कुणबी—बौध्द लोक रोजगारासाठी मुंबईला जावू लागले होते. गावात कोणीच त्यांना कामाला, रोजगाराला ठेवत नव्हते. भाकरतुकडा वाढीत नव्हते. पडीसाठी मातंग लोकांमध्ये दुष्काळामुळे संघर्ष निर्माण झाला होता. जातीचेच लोक माणुसकी, मानमरातब विसरलेले होते. या भीषण दुष्काळाने लोकांचे बळी घेतले होते. दुष्काळातच १७

डिसेंबर १९७१ ला वडगावच्या ग्रामपंचायत निवडणूकीची तारीख जाहिर होते. दुष्काळाचा फायदा घेऊन निवडणूक लढविणारांनी दुष्काळातील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय केली, पोटासाठी धान्य वाटले. त्यांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. पण दुष्काळामुळे महाराष्ट्रातील सर्व निवडणूका सरकार एका वर्षांसाठी पुढे ढकलते. वडगावातले मातंग लोकही रोजगारासाठी गाव सोडतात. नंतर लगेचच रोजगार हमीचे काम चार दिवसात सुरु होते. श्रेष्ठ—कनिष्ठ जातीपातीचा विचार आपोआप दुष्काळाने कमी होतो. इंदिरा सरकारने गोर—गरीबांना सरकारी खर्चाने घरे बांधून दिली होती. त्यामुळे गावाच्या रचनेत बदल झाला होता. त्यात सरकारने जातीपातीचा विचार केलेला नव्हता!

विनायक पाटील वडगावात 'जयबजरंग युवक आघाडी' नावाची संघटना स्थापना करतो. निवडणूकीसाठी बौध्दांना पुतळा आणि उपसरपंचपद देण्याचे कबूल करतो. पण बौध्दांची मत मला पडावीत असे सांगतो. या गोष्टी निवडून आल्यानंतर तो बौध्दांना देतो. पण पुतळा उभारण्याच्या जागेवरुन कुणबी बौध्द संघर्ष सुरु होतो. मात्र कुणब्यांच्या वरचढ बौध्द होतात. कारण बौध्दांना सेव्हन पी. सी. आर नावाच्या कायदयाचे संरक्षण त्यांना असते. तहसिलदार, न्यायाधिश हे बौध्द समाजाचे असल्यामुळे त्यांच्यासारखाच न्याय मिळतो. बौध्दांच्यात संघटीत होऊन एकीने लढण्याची ताकद आंबेडकरांनी निर्माण केली, व तिचा वापर ते समाजासाठी कायम करतात. त्यामुळे कुणब्यांनी टाकलेल्या बहिष्काराला ते नेटाने तोंड देतात. बौध्दांना गावाची फारशी गरज लागत नाही. मातंगात बौध्दांसारखी एकी नाही. साधना गवनाला मारते व तिला तिच्या नवऱ्याला उलट धमक्या देतात तरी कोणी मातंग काहीच करु शकत नाही.

१७ जानेवारी १९८२ ला डॉ. अण्णासाहेब भोपळे मुंबई प्रदेशाला मोहना या गावी 'अखिल महाराष्ट्र मातंग संघाची' स्थापना करुन शपथ घेतात. 'जगेन तर समाजासाठी मरेन तर समाजसाठी' (पृ.क्र.२१५) झोपडपटटीतील मातंगांच्या समस्या सोडविण्याचे काम त्यांनी केले. आणि 'अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' स्थापण्यासाठी त्यांनी लढा सुरु केला. अण्णाभाऊ साठेंची ओळख मातंग समाजाला डॉ. भोपळे करुन देतात. महामंडळातर्फे व्यवसायासाठी लोकांना कर्ज

मिळवून दिले जाते. त्यासाठी तायडे गुरुजी १ ऑगस्ट १९८४ ला अण्णाभाऊंची जयंती वडगावात साजरी करुन त्यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख मातंगांना करुन देतात. समाजात स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न करतात. पण त्याचे हे काम कुणब्यांना भानगडी वाटतात. गुरुजींची बदली केली जाते. तायडे मास्तर पाणीपाडया महाराजाला वाचवितात. बौध्दांचे सुधारणावादी विचार मातंगांना उपयोगी पडतात. बौध्दांच्या पुतळा प्रकरणात कुणब्यांना त्रास झाला. तसाच त्रास पाणीपाडया महाराजाला मारले त्यातही कुणब्यांना होणार होता. गुरुजींच्या मदतीने प्रभू मातंग समाजाच्या हक्क संरणासाठी प्रयत्न करतो. साठे साहेब संघाचे कार्यक्रम वाशिमला घेतात. त्याला सर्व गावपातळीवरच्या कार्यकारणी उपस्थिती राहातात त्या कार्यक्रमापासून समाजात बोलण्या वागण्यात फरक होतो. लोकांतून डॉ. भोपळेंचा कार्यक्रम वाशिमला घेण्याची मागणी होते. मेळाव्यासाठी सर्व लोक वर्गणी देतात. ६ डिसेंबरला बौध्द आंबेडकर पुतळा बसवितात. तर मातंग डॉ. भोपळेंच्या कार्यक्रमाला वाशिमला जातात. दलित चळवळ आणि मातंग संघ, दलितांच्या हिताचे सेव्हन पी. सी. आर सारख्या कायदयाची सवर्णांना धास्ती वाटते. स्वतःच्या स्वार्थासाठी सवर्ण, धन दांडगे जमीनीसाठी धरण बांधतात ते दुसऱ्याच्या सिंधीच्या बनात त्यामुळे मातंग समाजाचा उदरनिर्वाह बंद पडतो.

संघटनेमार्फत तालुक्याच्या गावी वाचनालये स्थापन होतात. मातंगांना त्याचा फायदा होतो. आंबेडकर, फुले, साठे यांची पुस्तके त्यात ठेवली जातात. वाशिमच्या भोपळे साहेबांच्या कार्यक्रमाने सर्व मातंग भारावले जातात. गावकीची हीन कामे सोडतात. वाशिमच्या कार्यक्रमानंतर कुणब्यांनी बौध्दाप्रमाणे मातंगांवरही बहिष्कार टाकला. तरी गावातले लोक गावकीची कामे मुद्दाम सांगत. संबा बेल्यांचा मेलेला बैल ओढण्यास यंकाला निरोप देतात. यंकात भोपळेंच्या भाषणाने फरक पडलेला होता तो साधी दवंडी देत नाही. गणा मातंगांना कुणब्यांची कामे करु देत नाही. कुणब्यांनी बहिष्कारा सोबत मातंगांचे विहिरीचे पाणी बंद केले होते. भोपळे साहेबांच्या चळवळीचा परिणाम गावोगावच्या मातंगांवर होतो. मात्र कुणब्यांची मानसिकता बदलत नाही. बैल ओढीत नाही म्हणून यंकाला लिंबा आणि राजाराम मारतात. बामणी गावात लग्नाची लाकडे फोडीत नाही म्हणून एका मातंगाला

मारहान केली जाते. पिंपळगावात बॅडवाल्यांशी तक्रारी होतात. मातंग लोक गावकीच्या कामावर बहिष्कार टाकतात. खंडाळयाला मातंगाची वस्ती व शामराव थोराताचे घर सवर्ण जाळतात.

राज्याच्या निवडूणकीत अ. म. मातंग संघाचे डॉ. भोपळेसाहेब आमदारकीला शिवसेनेतून उभे राहातात. कारण अ. म. मातंग संघ आपली ताकद या निवडणूकीतून दाखवेल असा आशावाद त्यांना वाटतो. शामराव थोरातांच्या प्रकरणात त्याला मदत मिळवून देण्यासाठी अ. म. मातंग संघाचे सर्व पदाधिकारी अकोल्याचे मंत्री, राज्यमंत्री, कलेक्टर, डी. एस. पी. जळीत क्षेत्राची पहाणी करतात व मदत करतात त्यावेळी ना. लहाने चळवळीच्या कर्तृत्वाचा आलेख सर्वासमोर मांडतात त्याने प्रभू भारावतो व समाजाच्या हिताचे काम करायला लागतो.

मराठवाडा विद्यापीठ नामांतरांचा वास्तववादी संदर्भही 'वारुळ' मध्ये येतो. नामांतर लढयात पोचीराम कांबळेला त्याचे गाववाले जाळून मारतात. पुलोद आघाडीचे सरकार स्थापन करुन शरद पवारांनी विधानसभेत मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर केलेला होता.

बौध्द धर्म स्वीकारल्यानंतर गायरान बौध्द वहितीला काढतात. त्याप्रमाणे मातगं लोक काढतात. पोळयाच्या सणाला कुणब्यांची बैल मातंग लोक धरीत होते. आता चळवळीमुळे तेही बंद झाले आहे. साधे डफडे किंवा सनई—चौघडाही वाजवित नाहीत. या प्रकारची कामे जो कोणी करील त्याच्यावर मातंग बहिष्कार टाकतात. उदयोग व्यवसाय करण्यासाठी विकास मंडळातर्फे जातीबांधवांना कर्ज मिळवून देतात. 'वारुळ' मधील संतोषची पिढी ही मातंगांची तिसरी पिढी आहे. ही शिकते आणि परिवर्तनवादी चळवळीचे प्रतिनिधित्व करायला तयार होते.

भोपळेसाहेबांच्या शिवसेना प्रवेशाने संघातील कार्यकर्ते नाराज होतात भोपळेंना व इतर संघाच्या कार्यकर्त्यांना समाजकारण आणि राजकारण एकमेकांना पूरकच वाटते. नाराज झालेले संघाचे कार्यकर्ते 'अण्णाभाऊ साठे क्रांतीदल' स्थापन करतात. संघात प्रा. अंभोऱ्याच्या रुपाने क्रांतीदल स्थापन करुन फूट पडते. दि. ८ डिसेंबर १९८५ ला मातंग समाजाचा नागपूर विधान भवनावर मागण्या मान्य करुन होण्यासाठी मोर्चा नेहण्याचा निर्णय डॉ. भोपळे साहेबांचा असतो. त्यात जास्त

लोक सहभागी होतात. परंतु मातंग समाजाचे दारिद्रय त्याआड येते. त्याबाबत बौध्दांचा आदर्श त्यांनी समोर ठेवला. गोर—गरीब बौध्द दसऱ्याला नागपूरला मोठया संख्येने जातात. तसेच मातंग लोक मोर्चाला जातात. संतोषला त्यांच्या वर्गात अस्पृश्यतेला सामोर जावे लागते. 'वारुळ' मध्ये अनैतिकतेचे वास्तवादी चित्रण अल्पप्रमाणात येते. मीरा—राजाराम मास्तर यांचे अनैतिक संबंध एका प्रसंगात येतात. काही गावात पुन्हा मातंग लोक गावकीची कामे करायला लागतात. अ. म. मातंग संघाच्या चळवळीपासून मातंगांची देव देवतां बद्दलची मते बदललेली होती. देवदेवतांची पूजा आर्चा करुन आपला, आपल्या समाजाचा कधीच फायदा झाला नाही. देवाच्या कृपेने आपला कोणताच फायदा झाला नाही, असे त्याचे मत होते देवाच्या कृपेने कोणतीच गोष्ट आपल्याला मिळत नाही. कष्टानेच ती मिळवायची आहे. असा त्यांचा निश्चय होता. संघाच्या चळवळीत गावोगावच्या शाखांनी हिंदू देव—देवतांवर बहिष्कार टाकलेला होता. आंबेडकर पुतळयावरुन जसा वाद झाला तसा वाद मातंगात निर्माण होईल असे वास्तवादी भाकित सांगितले होते. गावपातळीवरील राजकारण व जागृत झालेले जनमत प्रत्येक गावात झालेला बदल यामध्ये येतो मातंग सरपंच निवडणूकीत सहभागी होतात. आपल्या एका मेंबरच्या बदल्यात पैसे वसूल करतात आपल्या समाजाचा विकास प्रगती साधतात. कुणब्यांचे वर्चस्व झुगारुन देतात. समाजाचा विकास प्रगती साधतात कुणब्यांचे वर्चस्व झुगारुन देतात. समाजाला उपयोगी असा विचार बौध्दांनी केलेला होता व उपसरपंचपद पदरात पाडून घेतले होते. भोपळेंनी शिवसेनेत प्रवेश केला तरी संघाच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला नव्हता. ते संघाशी बांधिल राहिले. भोपळेच्या राजकारण प्रवेशाचा उपयोग गावच्या राजकारणासाठी कसा होतो यासाठी डोळे लावून राहिले निवडूणकी वेळी भाऊबंदकी कशी चालते याची माहिती यात मिळते. मातंग समाजाने दाखविलेल्या एकजुटीची माहिती यात येते. अल्प संख्यांकाच्या मतावर संख्येने जास्त असणाऱ्यांना कसा कायदा होतो. त्यांचे भवितव्य ठरते. याची वास्तव माहिती तपशिलाने येते. त्यामुळे मातंग समाजाला एक प्रकारचे महत्व मिळते. कादंबरीतल्या नायकाबरोबरच सर्वांना अ. म. मातंग संघाच्या कार्यकर्त्यांमुळे नवनिर्माणाची नजर प्राप्त होते. मातंग समाजाच्या 'वारुळ'

निर्मितीसाठी सर्व मातंगांचा कसा उपयोग होतो याचे चित्रण येते. आपलेच लोक आपल्या लोकांना त्रास देतात याची प्रचिती गणात येते तो सदैव प्रभूला त्रास देतो.

**सारांश :—** वास्तववादी कथानक असणाऱ्या या कादंबरीत १९४७ नंतरचा परिवर्तनवादी चळवळ सुरु झाल्याचा सर्व कथाभाग येतो. बौध्द मातंग या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींच्या जीवनांची अवस्था यात येते. गावकीची कामे करणारी मातंगांची पहिली पिढी (येसाजी) समाजाचा परिवर्तनवादी चळवळीच्या माधमातून विकास करु पाहणारी दुसरी पिढी (प्रभू) समाजाचे परिवर्तनवादी चळवळीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी शिकून सवरुन तयार होणारी तिसरी पिढी (संतोष) याचे तपशिलवार चित्रण येते. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौध्दांनी दीक्षा घेतली, गावकीच्या कामावर बहिष्कार घातला, ते शिकले सवरले, उच्च पदस्थ नोकरी करु लागले. मात्र मातंग समाज गावकीच्या कामावर टपून होता. बौध्दांनी सोडलेली गावकीची कामे त्यांनी स्वीकारली. परिणामी बौध्दांपेक्षा २०—२५ वर्षे त्यांचा विकास उशिरा झाला. १९८० ला डॉ. भोपळे यांच्या कर्तृत्वाने 'आखिल महाराष्ट्र मातंग संघच्या रुपाने परिवर्तनवादी चळवळ उभारली आणि मातंग तरुणांत जागृती आणि हक्कांची जाणीव निर्माण झाली. हीच चळवळ विकासाला, प्रगतीला पोषक ठरली. त्यामुळे समाजकारण, राजकारण यात मातंगाना परिणामी दलितांना झालेली जाणीव यातून बदलणारा समाज याचे वास्तव चित्रण 'वारुळ' मध्ये येते.

## ५) 'वारुळ' एक सामाजिक आशयसूत्र :—

मराठीत सामाजिक कादंबऱ्यात मोठया प्रमाणात निर्माण झाल्या. सभोवतालच्या परिचित विश्वाचे चित्रण करणाऱ्या वास्तववादी कादंबऱ्या लिहिल्या जातात. पात्रे, त्यांच्या कृती, कालखंड या कादंबऱ्यात येतो. या प्रकारच्या कादंबरीत विशिष्ठ स्थळ असते. त्याचे तपशिल कादंबरीकार देतो. आपल्या डोळयासमोर सहज येतील अशी दृश्ये, परिचित स्थितीचे वर्णन या कादंबऱ्यात येते. या कादंबऱ्यांना एक सामाजिक संदर्भ असतो. विविध व्यवसाय, वय, स्वभावाची माणसे, असलेला समाज जो एका विशिष्ट संस्कृतीचे नमुने असतात. ते कोणत्या कोणत्या वर्गाचे प्रतिनिधित्व करीत असतात. अशा कादंबऱ्या विशिष्ठ

सामाजिक वातावरणाची निर्मिती करतात. त्यात लोकांलोकांतील व्यवहाराचे चित्रणही कादंबरी विशेषत्वाने करते आणि सामाजिक कादंबरीत परिवर्तनशील गतीवर लक्ष दिलेले असते. काळानुसार परिस्थितीत मानवीसंबंधात कसा बदल होतो याचे चित्रण ही कादंबरी करते.

कादंबरी हा सामाजिक आशयद्रव्य असलेला वाङ्.मय प्रकार आहे. त्यामुळे एखादया कादंबरीतील जीवनचित्रण प्रत्ययी आहे की नाही हे व्यक्ति चित्रण आणि समाजजीवनांचे चित्रण यावरुन समजून येते. त्यामुळे सामाजिक आशयसूत्रासाठी सामाजिक चित्रण अपरिहार्य मानले जाते. म्हणून या संदर्भात ज्येष्ठ कादंबरीकार व समीक्षक भालचंद्र नेमाडे म्हणतात.

"कादंबरीत सामाजिक आशय प्रामुख्याने असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह माडंलेला असतो. एखाद्या पोट संस्कृतीचे तपशिलासह दर्शन घडवलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहातात यातूनच कादंबरीत संपूर्ण समाजजीवन चित्रित होते." १५ कांदबरीच्या रचनेसाठी कादंबरीकार जे तपशिल निवडीत असतो ते सर्व व्यक्ती व समाज यांच्याशी संबंधित अशा ठिकाणीच असतात. त्यामुळे त्या समाजात रुढ असणाऱ्या भाषेचाच त्याला वापर करावा लागतो. एखाद्या व्याक्तिचे जीवनचित्रण चितारतानाही कादंबरीकाराला समाजाचे दर्शन घडवावे लागते. 'वारुळ' या कादंबरीत सामाजिक आशय मुख्य करुन कसा आविष्कृत झाला आहे. हे पाहणे गरजेचे वाटते. यात मातंग समाज केंद्रवर्त्ती आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपर्यंत मातंग समाजजीवनाचा आलेख कादंबरीत येतो ही कादंबरी दोन भागात आहे. मातंग समाजाच्या दोन पिढयांच्या सामाजिक इतिहासाचा मागोवा घेतलेला आहे. तर तिसरी पिढी शिक्षण घेऊन स्वत:ची प्रगती साधून समाताचे प्रतिनिधित्व करण्यास तयार होत असलेली दिसते. बाबाराव मुसळे ग्रामीण व दलित साहित्याच्या सीमारेषेवर कादंबरीलेखन करीत असल्यामुळे ग्रामीण भागातील कुणबी, सरपंच, पाटील, गावकामगार, तलाठी, कोतवाल, येसकर, इ. गावगाडयातील लोकांचे चित्रण 'वारुळ' मध्ये येते. 'वारुळ' चे कथानक विदर्भातल्या वडगावात घडते त्याठिकाणच्या व्यक्तिंच्या स्वभावाची

वैशिष्टये ही आपल्यास कळतात. मातंग समाजाच्या पिढयांचा तपशिलाने विचार पुढीलप्रमाणे:—

**१) मातंग समाजाची पहिली पिढी :—**

आंबेडकरांनी बौध्दांना दीक्षा दिली. त्यांनी गावकीच्या कामावर बहिष्कार टाकला, आणि या कामावर टपून असणाऱ्या मातंग समाजाने मेलेली ढोरं ओढून त्याची कातडी सोलण्यासहीत बौध्दांची सर्व कामे आपल्याकडे घेतली. मातंग समाजाला फुकट पडीचा हिस्सा मिळावा अशी अशा पूर्वीपासून लागून होती. ढोर फाडून त्यांचे हिस्से जेव्हा महार घालत तेव्हा त्यातील थोडेफार मांस आपल्यालाही दयावे असे मातंगांना वाटायचे. महार चांगले मांस आपल्याला घेऊन खराब मांस मातंगांच्या अंगावर फेकत त्यामुळे काहीही करुन हे काम आपल्याला मिळावे असे मातंगांना वाटत होते व ते काम त्यांना मिळाले. त्यापैकी येसाजी हा गावाची येसकरकी करतो. गावचा हप्त्याचा रिपोर्ट तालुक्याला पोलीस स्टेशनला देतो. येसाजीला हे काम गावचे पाटील देतात कारण येसाजीला साहेब लोकांशी कसे बोलावे, वागावे हे समजते. चहादू, यादव, तुळशीराम हे गावात येसकरकीच्या भाकरी मागत. त्याच्या बदल्यात गावकीची इतर कामे करीत होती. ढोर ओढणे, सोलणे हे नाथा, हारजी, भिकाजी,संपत हे करीत. त्यामुळे त्यांना पडीचे हिस्से दोन—दोन मिळत आणि कातडयावर या चौघांचा अधिकार चालत होता. गावकीची कामं करणारी मातंग समाजाची ही पहिली पिढी होती.

बौध्द होण्यापूर्वी बौध्दांची पहिली पिढी सुध्दा गावकीची कामे करीत होती. त्यापैकी सिदनाक हा वडगावच्या बौध्दांचा प्रमुख होता ढोर ओढणं, सोलणं व पडीचे हिस्से टाकणे ही कामे सिदनाक करायचा वडीसाठी आशा धरुन आजूबाजूला बसलेल्या मातंगाच्या अंगावर हाच सिदनाक ढोराच्या आतडयाचे दोन—चार तुकडे टाकायचा येसाजीला यामुळेच सिदनाक आवडत नाही. दोघांमध्ये कायम शाब्दीक खटके उडतात. आंबेडकरांचे मोठेपण आणि कर्तृत्व येसाजीला सांगताना. "बाबासायबानं या गोष्टी आम्हाले सोडाय लावल्या, यांत बाबासायबाचा काहीच स्वार्थ नव्हता, उलट बाबासायबानं आम्हाला अभिमानान जगायची नवी वाट दावली." (वारुळ पृ.१३) तरी येसाजीला त्याचे म्हणणे पटत नाही.

सिदाजी पाटील वडगावचे पाटील आहेत. वय झाले तरी शरीरयष्टी राखून असणारे, कुस्तीचा शोक त्यांना होता. ही कुणब्यांची पहिली पिढी मातंगांच्या पिढी मातंगांच्या पिढी बरोबर त्यांचाही संदर्भ ओघाने येतो. मातंगांचा येसाजी गाईचे मांस खात नाही. त्याच्या बापाने त्याला कपिला गाईची गोष्ट सांगितलेली होती. मातंगांच्या या पिढीने वाजाविणे, आणि गावकीच्या कामाशिवाय कोणतीच कामे केलेली नाहीत. शिळया—पाक्यावर, उष्टया—पाष्टयावर त्यांना जगायची सवय लागलेली होती. कष्टाची कामे करणे त्यांना जमत नाही. दुसरा कोणता व्यवसाय, नोकरी करायचे म्हटले तर त्याचे शिक्षण नाही. येसाजी, हारजी, संपत, नाथा, चहादू, यादव, तुळशीराम, भिका यापैकी कोणीच शिकलेलं नाही. त्यांना शिकायची संधीच कधी मिळाली नाही. त्यांच्यावेळी महारा—मागांच्या पोरांना शाळेतच घेतले जात नव्हते. त्यांनाही कधी शिक्षणाची गरज वाटली नाही. प्रत्येकाला चार—सहा मुले आहेत. प्रत्येकाची घरे बसकी, टीनाची, तुऱ्हाटयाच्या पऱ्हाटयाची, कुडामातीची आहेत. या घरांना दरवाजे, खिडक्या नाहीत. सर्व लोक त्यात दाटीवाटीने वावरतात. एखादया मुलाचे लग्न झाले की आई—वडील कुणाच्या तरी ओटयावर झोपायला जायची. घर वाढवावे, दुसरे बांधावे अशी ईच्छा मातंग लोकांच्या मनात येत नाही. मुली बाळींना आंघोळीसाठी साधी न्हानी नाही. एकंदरीत मातंग समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. कुणब्यांच्या माणसांना मातंग खुरमान घालतात. कुणबी मातंगांचे तोंड पहाणे शुभ मानतात. ग्रहण मागण्याचा अधिकार पूर्वीपासून मातंग समाजाचा आहे. तो अजूनही आहे. ग्रहणाबरोबर भाडोळा मागायचा अधिकार आहे. बौध्दांची मुले शिकतात याचे आश्चर्य मातंगांना वाटते. वडगावात पाटील सर्वात श्रीमंत. त्यांच्या घरात शेतात व इतर कुणब्यांच्या मर्जीने रहावे लागत होते. कुणब्यांची नडली अडली कामे हा समाज करीत होता झाडण—लोटण, इंधन—गोवारी, लग्नकार्यात पत्रावळया तयार करणे दिवाळी, पोळा सण वाजविणे अशी कामे मातंगांना भाकरीच्या आशेवर करायला लागत होती. येसाजीचा सनई—चौघडयाच्या जोड होता गावकामदार येसकर झाल्यापासून तो नाथाला देतो. भिका—नाथा यांच्यात चौघडयाच्या सुपारीवरुन मतभेद होतात. भिका त्यातून बाहेर पडतो. त्याच्या जागी येसाजी सनई

वाजविण्यासाठी प्रभूला पाठवतो. यांचा राग भिकाला येतो. भिकाची बायको द्वारका हिला पाच सात मुले आहेत. गरोदर असून ती सुकलेली आहे. एके दिवशी दुकानदाराच्या खळयावरुन बायकोची आठवण येताच भिका रात्रीच घरी येतो.

मातंगांची घरे पावसाळयात गळतात इतकी ती झोपडीवजा होती. थकलेली गुरे थंडी वाऱ्याने मरत होती. 'पड आली रे आली' म्हटले की मातंगांना आनंद होत होता. विश्वास बेल्याची मेलेली गाय ओढताना भिका त्याला हात लावू देत नाही. कारण येसाजीनेही ढोर, ओढून सोलावी असे त्याला वाटते. मुलीच्या लग्नात सनई—चौघडा वाजविला नाही. म्हणून जगन्नाथ पाटील भिकाला मारतो त्याचा संशय भिका येसाजीवर घेतो. शिव्या देतो. बेइमानी, लबाडी, आडमुठेपणा हा भिकाच्या रक्ताचा गुण होता. भिकाच्या आज्याने, बापाने व भिकाने कोणाचा नाही कोणाचा मार खालेला आहे. भिकाच्या बापाने बुगाजी पाटलाचा मार खाल्ला तर आज्याने अर्ध्या गावाचा मार खाल्ला. बौध्दांच्या लग्न कार्यात सनई चौघडा कधी मातंग वाजवित नाहीत पण भिकाचा आजा शिदनाकाच्या पोरीच्या लग्नात वाजवितो त्यामुळे गावातले लोक त्याला मारतात. तरी भिकाच्या घरातील कोणीच सुधारत नाही. येसाजीला इतर मातंग लोक सांभाळून घेतात. नाथा तर स्वत:च्या पडीतला हिस्सा दयायला तयार होतो. विरोधक असूनही येसाजी भिकाच्या आजारी मुलीला बघायला जातो यावरुन येसाजीमध्ये असणारी सामाजिक बांधिलकी लक्षात येते.

मातंग समाजात असणाऱ्या अंधश्रध्दाचे दर्शनही यामध्ये घडते. लहान मुलांच्या आजारावर छा—छू करुन अंगारा—धुपार करणारा दाजिबा शेळके याचा संदर्भ 'वारुळ' मध्ये येतो. सटवाई जोखाईवर श्रध्दा असणाऱ्या पदमीनीसारख्या स्त्रियाही यामध्ये येतात. कुणबी समाजाचे कोणी मेले तर मातंग त्यांच्या मर्तिकाचे वाजवित. निरोप देणे, सरणाची लाकडे फोडणे, लाकडे गोवऱ्या नेणे इ. सर्व कामे त्यांना करायला लागत. त्याबरोबर धनगर तेली, माळी, वाणी, इ. लोकाची कामे करावी लागत होती. मर्तिकांचे वाजविताना डफडयाची चाल मात्र उलटी असते.

**२)मातंग समाजाची दुसरी पिढी :–**

मातंगाची दुसरी पिढी प्रभू गणाची आहे. ही पिढी शिकते आणि आपल्या हक्कांच्या जाणिवेने पेटून उटते. प्रभू ४ थी तून शाळा सोडल्यानंतर गावकीच्या कामात स्वत:ला झोकून देतो पण त्यात त्याचे मन लागत नाही. शाळा सोडल्यानंतर प्रभू नाथाच्या सनई—चौघडयाच्या जोडात सनई वाजवायला जातो. सनई वादनाचे शिक्षण त्याला येसाजीकडून मिळते. सनई वाजवायला तो लहान वयातच शिकतो, गणाही बँडाच्या जोडात जातो. बँड वाजविण्याचे शिक्षण घेतो. इतरही या दोघांप्रमाणे शाळा सोडल्यानंतर वडिलांना गावकीच्या कामात मदत करतात. परगावला वऱ्हाडा निघाले की सनई चौघडा वाल्यांना स्वत:ची बासने सांभाळीत वऱ्हाडाच्या गाडयाबरोबर चालत जावे लागते. बौध्द धर्मात जाण्यापूर्वी बौध्दांनाही हेच काम करावे लागत होते. प्रभू सेन गावला पायी चालतच जातो. रात्रभर जागरण होते. काटया—कुटयातून चालताना त्याचा जीव मेटाकुटीला येत होता. कुणबी बैलगाडीतून आपण मांग म्हणून पायी याचा या पहिल्या पिढीला राग येतो. प्रभूला प्रश्न पडतो,"अशी कशी रीत? माणसाला माणूस न समजण्याची? ते कुणबी मारे बैल गाडयात अन् आपण मांग झालो म्हणून पायी पायी? मग वाजवायच्या या भानगडी करायच्याच कशाला." (वारुळ पृ. ७२) आपल्याच नशिबी अशी धावपळ का? अशा प्रश्नांच्या मोहोळात दुसरी पिढी पडलेली आहे. कुलकर्णी मास्तर सारखे लोक मात्र या पिढीला चांगले विचार देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे प्रभूला त्याची आठवण होते. 'मांगे हो' अशी हाक मारल्यांने या पिढीला राग येतो तो ही पिढी शिकल्याने येतो. हारजीच्या यंकाला काहीच वाटत नाही कारण तो अशिक्षित असतो. लग्नातल्या पंगती उठल्यानंतर शेवटी बौध्दांच्या पंगतीत वाजंत्र्यांना बसवितात. याचा बौध्दांना बाट होतो. त्याने प्रभूला दु:ख होते प्रभूचे लग्न अवघ्या १५ व्या वर्षीच होते. गणा हा बॅडत वाजवितो. सोनाळयात येसाजी त्याला बघतो. बॅड सनई—चौघडयाचा स्पर्धक असतो. गणाचाही विचार प्रभूचा सनईचा जोड बंद पाडण्याचा असतो.

ग्रहण मागणे, भाडोळाचे गीत म्हणून धान्य मागणे हे या पिढीला हे धंदे लाचारीचे ऐतखाऊपणाचे वाटतात. बौध्दांनी गावकीची कामे सोडली. त्यांची मुले

शिकली, नोकरी, व्यवसाय करु लागली त्यांच्या राहण्यात, वागण्यात कमालीचा बदल झाला. आंबेडकारांनी त्यांचा उध्दार केला. आपला उध्दार कोण करील? असा प्रश्न या पिढीला पडतो. मातंग समाजातल्या जनार्दन, यंका, सखाराम यांना गावकीच्या कामात आनंद वाटतो. कारण त्यांचे शिक्षण झालेले नाही. मेलेल ढोर बघितले की या पिढीला कसेतरी वाटते. त्यामुळे मांस खाणे ही पिढी सोडून देते. ही पिढी भाकरीच्या मोबदल्यात ढोर मेहनतीची कामे नाकारते. मातंगांना कनिष्ठ मानले जात असताना कुलकर्णी मास्तर प्रभूचा बाट धरीत नाहीत. श्रेष्ठ—कनिष्ठ हे भेद ते मानित नाहीत. शिक्षणाला आधिक महत्व देतात. गावकीच्या कामापेक्षा मातंगाची ही पिढी नोकरी, व्यवसाय करताना दिसते. यामध्ये उंबरकर मास्तरांचे उदाहरण देता येईल. प्रभू गावकामगार कोतवाल होतो. कुणबी मात्र मांग महाराच्या शिक्षकांना गावातून हाकलून लावतात कारण जातीयता त्याच्या आड येते. साधी मातंगांची घरे कुणब्यांच्या घरापेक्षा मोठी, उंच नसावीत असा अलिखित नियम होता. या पिढीला फुले आंबेडकर अधिक जवळचे वाटतात. ही पिढी समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देते. समाज उत्कर्षासाठी प्रयत्न करते. विज्ञानाच्या जोरावर जसा बदल होतो. तसा गावावर त्याचा परिणाम जाणवतो. महाराष्ट्रातील दुष्काळाची झळ गावाबरोबर मातंगांनाही बसते. दुष्काळात सर्वच जाती धर्माचे वागणे बदलते. मातंगांना मेलेलं ढोर बघायला मिळत नाही. प्रभूच्या नोकरीमुळे घरी बरे चालले होते. इतरांची परिस्थिती मात्र वाईट होती. दुष्काळाने सर्वांना एका रांगेत उभे केले होते. गरीब—श्रीमंत असा भेदभाव राहिला नाही. दुसरी पिढी ही अजून थोरा—मोठयांच्या आज्ञेत राहात होती. कोणताही निर्णय घ्यायला ते एकमेकांशी सल्ला मसलत करीत असत. दुष्काळात मजूरी करण्यासाठी बाहेर जाण्याचा त्यांचा विचार बैठकीत बसून होतो. सामाजिक बांधिलकीमुळे, मजुरीसाठी बाहेर गावी जाणाऱ्या तरुणांना पाहून येसाजीला वाईट वाटते. त्यासाठी गावकीत येसकरकीच्या भाकरी कोणीतरी एकाणेच मागाव्यात असे येसाजी सांगतो.

दुसऱ्या पिढीत प्रभूसारखे तरुण समाजाचे हित साधून विकास व प्रगती करण्याचा प्रयत्न करतात. हे समाजाचे हित पाहू शकत नाहीत. तायडे गुरुजींच्यामुळे या पिढीला डॉ. भोपळेंची ओळख होते. 'आखिल समाजाचे परिवर्तन

अखिल महाराष्ट्र मातंग संघाची ओळख होते. या संघामुळे मांतग समाजाचे परिवर्तन कसे झाले हे समजते. भोपळेंच्या विचाराने ही पिढी भारावते. जिल्हा, तालुका, गावपातळीवर या चळवळीच्या शाखा स्थापन केल्याज जातात. कार्यकारिणी नेमतात व मातंग समाजाच्या सेवेसाठी तत्पर होतात त्यात सूर्यकांत साठे वाशिम तालुक्यतून प्रभूसारख्या तायडे गुरुजी सारख्यांना मार्गदर्शन करीत असतात. डॉ. भोपळेंनी अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ स्थापन केले त्यामार्फत ही पिढी समाजातील गरीब लोकांना उद्योग, व्यवसायासाठी कर्ज मिळवून देण्याच प्रयत्न करते. खेडेगावात पडीत जमिनीचे पट्टे वहितीला काढतात. गावोगावच्या मातंग समाजाची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थिती कशी आहे. सरकारकडून कोण-कोणत्या योजनांचा त्यांना लाभ होतो. कोण-कोणत्या कार्यालयात मातंग समाजाचे लोक कार्यरत आहेत. त्याविषयी ही पिढी माहिती मिळविते. त्यात कशी प्रगती करता येईल याचा विचार करते. तालुका जिल्हा पातळीवर ही पिढी डॉ. भोपळे यांचे कार्यक्रम मेळावे घेते. समाजात प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जातो. सर्वजन त्यामुळे विकासाच्या मार्गाला लागतात. मातंग समाजाच्या मुला मुलींना शाळेत घालण्यास सांगतते. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देते.

डॉ. भोपळेंच्या सभेनंतर या पिढीत फरक पडतो. गावकीच्या कामावर ही पिढी बहिष्कार टाकते. भोपळे साहेबांचे विचार आचरणात आणते. आपल्या जाती बांधवांवर झालेल्या अन्यायाची दाद संघाच्या माध्यमातून मागते.

**३) मातंग समाजाची तिसरी पिढी:-**

मातंग समाजाची ही पिढी अत्यंत बुद्धीमान आहे. उच्च शिक्षण घेते. समाजात होणारी परिवर्तने हेरते. त्याचा समाजासाठी उपयोग करते. 'वारुळ' मध्ये प्रभूचा मुलगा 'संतोष' या पिढीचा दावेदार आहे. अस्पृश्यतेची त्यालाही वाईट वागणूक वर्गात मिळते. ब्राम्हण - मराठा मुले त्याच्या शेजारी बसत नाहीत. संतोषची कपडेही इतर मुलांपेक्षा स्वच्छ नव्हती. सातव्या वर्गात त्याचा तिसरा नंबर आलेला होता. हेडमास्तर त्याचे कौतुक करतात, बक्षिस देतात. आठवीत त्याची काळजी घेतात. प्रभूला त्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी सांगतात. 'तुमचा पोरगा हुशार आहे. तो तुमचे मॅट्रीकला नाव काढेल' असे सांगतात. प्रभू संतोषचा गाडीचा पास

काढून देतो. अभ्यासासाठी घरात लाईट घेतो. संतोषला प्रभूप्रमाणे शुद्ध बोलायला ज्योती शिकविते. संतोष आपल्या आईकडून लोकगीते लिहून शाळेत नेतो. अशा प्रकारे ही पिढी शिकून आपल्या व समाजाच्या प्रगीतचा ध्यास धरणारी आहे. परिवर्तनवादी चळवळीचे प्रतिनिधीत्व करणारी आहे.

### ६) 'वारुळ' मधील राजकीय आशयसूत्र

'वारुळ' मध्ये राजकीय घटकांचा विशेष असा परिणाम साधलेला दिसून येतो. राजकीय पार्श्वभूमी जाणून घेताना तिच्यातील या घटकांच्या तळाशी कोणत्या प्रेरणा असतील त्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. 'वारुळ' मध्ये येणारी राजकीय पार्श्वभूमी ही वडगावातल्या ग्रामीण भागातली येते. जाती जातीतील तसेच गावगाड्यातील संघर्षाबरोबरच राजकीय संघर्ष चित्रित केलेला आहे. आंबेडकरांच्या विचाराने बौध्द भारावले. शिकून सवरुन सरकारी अधिकाराच्या नोकऱ्या त्यांनी मिळविल्या. सामाजिक उत्कर्ष त्यांनी करुन घेतला. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. बौध्द राजकारणात उतरले. मातंग समाज याबाबत मागे राहिला. त्यालाही कारण होते. आंबेडकरांनी बौध्दांना नागपूरला १९५६ साली दीक्षा दिली. ते बौध्द झाले. आंबेडकरांनी त्यांना 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असा मूलमंत्र दिला. त्याचे त्यांनी काटेकोर पालन केले. नंतर आबेंडकरांनी त्यांना 'राज्यकर्ती जमात बना' असाही संदेश दिला होता. बौध्द गावपातळीवरील राजकारणात उतरले पाटील, उपसरपंच, सरपंच, जि. प. सदस्य, सभापती, आमदार पदापर्यंत निवडून येतात सरकार दरबारी स्वत:च्या मागण्या, दु:खे त्यांनी मांडली, हक्क मिळविले. त्याचे संरक्षण केले. याबाबत मातंग मागे राहिले. त्यांचा राजकीय विकास बौद्धांपेक्षा २०-२५ उशिरा झाला. मातंगांना १९८० नंतर डॉ. अण्णासाहेब भोपळे यांचे नेतृत्व मिळाले. 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' नावाची संघटना स्थापन केली. त्यांच्या जीवनात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. समाजाचे हित झालेली हक्कांची जाणीव, याने मातंग समाजाला जाग आली. मातंग संघाच्या रुपाने परिवर्तनवादी चळवळीने वाशिम, अकोला अनसिग या भागातील सुशिक्षित मातंग तरुण एकत्र आले त्यांनीही चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवली व मातंगांचा विकास करायला सुरुवात केली. चळवळीला

राजकीय पाठींबा असावा म्हणून डॉ. भोपळे शिवसेनेस प्रवेश करतात. त्यामुळे त्यांची कुचेष्टा सर्वजण चळवळीत करतात. 'वारुळ' मध्ये गावपातळीवरचे राजकारण येते. सरपंचपदाच्या निवडणूकीसाठी कुणबी, मातंग, बौध्द यांच्यातील चढाओढीचे दर्शन घडते.

**१) बौद्ध आणि राजकारण**

१९५६ साली आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौध्दांनी दीक्षा घेतली. बौध्दाच्या जीवनात प्रकाश पडला आणि शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात त्यांचा शिरगाव झाला. गावकीची कामे त्यांनी सोडून दिली, लाचारी सोडून दिली. स्वाभिमानाने जगण्याची त्यांची जिद्द कमालीची होती. या अगोदर गावकीची कामे करीत असताना त्यांनी अपमानीत जीणे, पडीची हलती सलती कामे त्यांना करावी लागत होती. बौध्दांची कामे मातंग समाजाने स्वीकारली व त्यातच त्यांनी धन्यता मानली. बौध्दांच्यात कुणब्यांना शह देण्याची ताकद आली ते पाटील - पटवाऱ्यांसमोर उभे राहातात. गावाच्या उष्ट्यापाष्ट्यावर जगणारी बौध्दांची जात गावाने बहिष्कार टाकला तरी नमली नाही, झुकली नाही. व्यावसाय, उद्योग करायला काही बौद्ध मुंबई, सुरतला गेले. थोडीफार शेती असणारे गावावरच राहीले एवढे सगळे बख आंबेडकरांच्यामुळे बौद्धांच्यात आले. आंबेडकरांच्या मृत्यूनंतरही त्याचा प्रभाव बौद्धांवर आहे. कुणब्यांना त्याचे आश्चर्य वाटते की आंबेडकरांनी बौद्धांवर एवढी कशी जादू केली. बौद्धांच्या जीवनात सर्वच बाबतीत परिवर्तन व्हायला लागले.

गावात पूर्वी पाटील महत्त्वाचा घटक असायचा त्यांच्या शब्दांपुढे गव जात नव्हता. निवडणूकीच्या वेळी पुढारी व्यक्ती पाटलांच्या बैठकीत येऊन भेटून जात. सर्व गावाच्या वतीने पाटील त्या व्यक्तीला शब्द देत व पाळीत त्यामुळे निवडरूकीची चुरस, उत्साह कांही वडगावच्या लोकांमध्ये नसायचा. पाटील म्हणतील त्या चिन्हांवर शिक्का मारायचा. ग्रामपंचायती गावात आल्यानंतर पाटलापेक्षा सरपंचाला, त्याच्या निवडणूकीला महत्व प्राप्त झाले. सरपंचाकडे आर्थिक व्यावहाराचे अधिकार ग्रामसेवकांच्या मदतीने मिळाले. पाटलाऐवजी सर्व लोक कार्यालयीन कामासाठी सरपंचाकडे येऊ लागले. १९७० साली दुष्काळात वडगावच्या ग्रामपंचायत निवडणूकीची तारीख जाहीर झाली होती. परंतू दुष्काळात

गांजलेल्या लोकांना वाटत होते ते की, निवडणूकीऐेञ्जी सरकारने दुष्काळ निवारण करावे. पैसा खर्च करावा. अगोदर ग्रामपंचायत सदस्य लोकच निवडीत असत. त्यातून सरपंचपदही निवडले जायचे. वडगावात भगवान पाटलांच्या म्हणण्यानुसार सरपंच पद निवडले जायचे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूका म्हणजे काय? हे लोकांना माहित नव्हते. सरपंचाला लोक निरुपद्रवी समजत होते. ग्रामपंचायतीमुळे सरपंचाला ग्रामसेवकाबरोबर आर्थिक अधिकार मिळाल्याने सरपंचपदाला महत्व आले. रामा बेले हे हेरुन होता. त्याने दोन वर्षापासून 'माझ्या लिंबालेच सरपंच करीन' असा प्रचार सुरु केला होता. त्यामुळे रामा बेले पाटलाचा कट्टर विरोधक बनतो. पाटलांच्या शेताच्या व्यवहारात विनाकारण घुसतो. पाटलांची जमीन करायला लागतो एक वेळ लिंबा बेले सरपंच होतो. नंतर ग्रामपंचायत निवडणूकीला विनायक पाटील 'जय बजरंग युवक आघाडी' तरुणांची उभी करतो बौद्धांची दोन मते मिळवितो. नागसेन कांबळेला उपसरपंच करुन आपण स्वत: सरपंच होतो. उपसरपंच पदाबरोबच बौद्धांना आंबेडकर पुतळा देण्याचे मान्य करतो. व तो उभा करण्यावरुन कुणबी - बौध्द संघर्ष सुरु होतो. लिंबा गावाला बौध्दांना विनायक विरुद्ध भडकवितो. बौध्दांना पुतळा देऊन त्याने या सगळ्या पंचायती केल्या असे तो सांगतो. बौध्द आपल्या बायकांची इज्जत घेतील असे सांगतो. तर दुसरीकडे बौध्दांना पुतळा त्याच जागी उभारा मी तुमच्या पाठीशी आहे असे सांगतो. विनायकला गावाच्या नजरेतून त्याला उतरवायचे होते. आणि बौद्ध कुणबी यांच्यात वितुष्ट निर्माण करुन त्याला विनायकला बाजूला सारुन स्वत:ला सरपंच व्हावयाचे होते. त्यामुळे तो बौध्दांना सतत डिवचायचा. त्यांच्या सांगण्यावरुन बौध्द पुतळ्यासाठी चबुतरा तयार करता. ६ डिसेंबरला नुसता पुतळा बसवायचा तर गावातले लोक येऊन त्यांचे बांधकाम पाडता. २० -२५ जण बौद्धांना मारतात. गौतम आणि नागसेन लिंबाला बोलवायला जातात पण तो येत नाही. सगळा बौध्दवाडा ओसाड पडलेला होता. सर्वजण जीवाच्या भितीने पळून गेले होते. गौतम आणि नागसेन यांनी वासिमला पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. पोलीसांनी ३० जणांना अटक केली. त्यात लिंबा बेलेही होता. विनायकलाही पकडले जाते. ही केस सेव्हन पी. सी. आर. या मागासवर्गीयांसाठीच्या कायद्यात नोंदविली जाते.

भगवान पाटलांनी धावपल करुन पालकमंत्री, खासदार, स्थानिक आमदार यांच्या संपर्क साधला पं. स. सभापतींना मध्यस्थी करायला लावली. सर्वांना सोडायला सांगितले १५ दिवसांनी सर्वांना जामीनावर सोडले. पोलीसांच्या संरक्षणामुळे गावावरुन पळून गेलेले बौध्द मंडळी परत येते. कुणब्यांनी बौध्दांवर बहिष्कार टाकला. बौद्धांनी टाकलेल्या केसचा खर्च सगळ्या कुणब्यांनी वर्गणी काढून करायचा ठरते. लिंबानी विनायकला एकदा वकील बोलावून घेतो. पुतळ्याची केस आपआपसात मिटवायला सांगतो. केस. सेव्हन. पी. सी. आर. मध्ये गुंतल्याने तिचा निकाल बौद्धांसारखा लागतो. वाघमारे नावाच्या न्यायाधिशांनी मागासवर्गियांच्या केसचा निकाल सर्व प्रथम लावला. बौद्धांच्या सर्व अटी मान्य करुन वकील केस मिटवायला सांगतात. या भानगडीतून कुणबी वाचतात की नाही तर त्याच कायद्याने मातंगही लढायला तयार होतात.

६ डिसेंबरला १९८४ ला मातंग लोक वाशिमला भोपळे साहेबांचा कार्यक्रम आयोजित करतात. तर बौध्द आंबेडकरांचा पुतळा गाववाल्यांचा पोळ्याचा जागी उभारतता. त्यांनी सेव्हन पी. सी. आर. कायदा आणि त्याचे न्यायाधिश यामुळे हवे त्या ठिकाणी त्यांना पुतळा उभारु दिला जातो. पुतळा उभारायला परवानगी दिल्यामुळे विनायक आणि लिंबा यांच्याविषयी गाववाल्यांच्या मनात राग होता. त्यांचे राजकारण गावाच चालू द्यायचे नाही. या दोघांना राजकारणातून हद्दपार करण्याचा ते बेत करतात. शिवसेनेची गावात सुरुवात विकास बेलेच्या रुपाने होते. कॉलेज बरोबर तो गावातल्या राजकारणात असतो. पाटीलकीसाठी बौद्धांच्या केशवसह गावातील तिघे उभे राहतता. नवीन कायद्यामुळे मागासवर्गीयांचाही एखादा पाटील होऊ शकतो. म्हणून केशव उभा राहतो. त्याची पाटील होण्याची शक्यता सर्वांना वाटते. इतर पाटीलकींसाठी उभे राहणारांनी अर्ज मागे घ्यावेत असे लोकांना वाटते. १९८६ ला सरकारने ग्रामपंचायत निवडणुका जाहीर केल्या व प्रत्यक्ष २ मेला मतदानाची तारीख जाहीर झाली होती.

त्यात बौध्दांचे दोन उमेदवार सरपंच पदासाठी उभे होते. त्यात मातंगांचा एक व विकास लिंबा यांचे ही अर्ज होते. एकूण सहा

उमेदवार होते. कोणाचेही पाच निवडून येतील त्यांचा सरपंच होणार होता. बौध्द, मातंग यांच्यावर संख्येने जास्त असणाऱ्यांचे भवितव्य ठरणारे होते. कारण कुणब्यांत एकजूट नव्हती.

**२) मातंग आणि राजकारण :—**

गावच्या राजकारणात गाववाल्यांसोबत बौध्दाप्रमाणेच मातंगांचाही समावेश झालेला होता. पाटीलकीसाठी इतरांबरोबर गणाही अर्ज भरतो. पण त्याची पाटील होण्याची चिन्हे दिसत नव्हती. प्रभू सरपंचपदासाठी मातंगातून गणांचा भाऊ गजूला उभा करतो. डॉ. भोपळे शिवसेनेत प्रवेश करुन आमदार होण्याची स्वप्ने बघतात ते विधानसभेत स्वत:चे प्रतिनिधीत्व करण्याचा प्रयत्न करतात. शिवसेना प्रवेशाने सर्व कार्यकर्ते नाराज होतात. भोपळे साहेबांनी आपल्या स्वार्थासाठी मातंग समाजाला वापरुन घेतले असे सर्वजन म्हणतात. आपल्या पाठीमागे मातंग समाजाला घेऊन फक्त शक्तीचे प्रदर्शन त्यांनी केले अशाने संघाच्या चळवळीचे नुकसान होईल भोपळे आमदार होतील, मंत्री होतील त्यांनी मातंग समाजाला धोका दिला. असे कार्यकर्ते म्हणत होते. शिवसेनेत भोपळेंनी प्रवेश करणे प्रभूला गैर वाटत नाही. समाजकारण आणि राजकारण या वेगळया गोष्टी असल्या तरी समाजकारण आणि राजकारण या दोन्ही गोष्टी एकच व्यक्ती करु शकते. 'समाजकारण राजकारणाला पूरकच ठरु शकते' असे प्रभूचे मत आहे. प्रभूही मांगवाडयाचे समाजकारण करीत पं. स. जि. प. निवडणूकीचे राजकारण करतो .एवढे खरे की समाजाला बाधक ठरेल असे राजकारण करु नये एवढे नकळण्याइतके भोपळेसाहेब अज्ञान नाहीत असे प्रभूला वाटते. डॉ. भोपळेंच्या राजकारण प्रवेशावर प्रा. अंभोरे टीका करतात. 'अखिल महाराष्ट्र मातंग संघातून' बाहेर पडून 'स्व अण्णाभाऊ साठे क्रांतीदल' स्थापन करतात. यावर सूर्यकांत साठे अंभारेंना उत्तर देतात "कोणतंही वयात आलेलं आंदोलन शेवटी राजकीय स्वरुप घेतल्याशिवाय राहात नाही." (वारुळ पृ. ४२२) असे योग्य बोल त्यांना ऐकवतात. डॉ. भोपळेंच्या राजकारण प्रवेशाचे ते समर्थन करतात. डॉ. भोपळे राजकारणात घुसले तर त्यांचा उद्देश साठे स्पष्ट करतात इंगोले गुरुजीही समर्थन करतात. राजकारणाने पक्षकारणाने आज संघटनेला

केली त्यात लिंबा बेलेही होता. विनायकलाही पकडले जाते. ही केस सेव्हन पी. सी. आर. या मागासवर्गियासाठीच्या कायद्यात नोंदवली जाते.

भगवान पाटलांनी धावपळ करुन पालकमंत्री, खासदार, स्थानिक आमदार यांच्याशी संपर्क साधला पं. स. सभापतींना मध्यस्थी करायला लावली. सर्वांना सोडायला सांगितले १५ दिवसांनी सर्वांना जामिनावर सोडले. पोलीसांच्या संरक्षणामुळे गावावरुन पळून गेलेली बौध्द मंडळी परत येते. कुणब्यांनी बौध्दांवर बहिष्कार टाकला. बौध्दांनी टाकलेल्या केसचा खर्च सगळया कुणब्यांनी वर्गणी काढून करायचा ठरते लिंबा आणि विनायकला एकदा वकिल बोलावून घेतो. पुतळयाची केस आपआपसात मिटवायला सांगतो. केस सेव्हन पी. सी. आर मध्ये गुंतल्याने तिचा निकाल बौध्दांसारखा लागतो. वाघमारे नावाच्या न्यायाधिशांनी मागासवर्गियांच्या केसचा निकाल सर्वप्रथम लावले. बौध्दांच्या सगळया अटी मान्य करुन वकिल केस मिटवायला सांगतात या भानगडीतून कुणबी वाचतात की नाही तर त्याच कायदयाने मातंग ही लढायला तयार झाले होते.

६ डिसेंबर १९८४ ला मातंग लोक वाशिमला भोपळे साहेबांचा कार्यक्रम आयोजित करतात तर बौध्द आंबेडकरांचा पुतळा गाववाल्यांच्या पोळयाच्या जागी उभारतात. त्यांनी सेव्हन, पी. सी. आर कायदा आणि त्याचे न्यायाधिश यामुळे हवे त्या ठिकाणी त्यांना पुतळा उभारु दिला. पुतळा उभारयाला परवानगी दिल्यामुळे विनायक आणि लिंबा यांच्याविषयी गाववाल्यांच्या मनात राग होता. त्यांचे राजकारण गावात चालू दयायचे नाही. या दोघांना राजकारणातून हद्दपार करण्याचा ते बेत करतात. शिवसेनेची गावात सुरुवात विकास बेलेच्या रुपाने होते. कॉलेज बरोबर तो गावावल्या राजकारणात असतो. पाटीलकीसाठी बौध्दांच्या केशवसह गावातील तीघे उभे राहातात. नवीन कायद्यामुळे मागासवर्गियांचाही एखादा पाटील होऊ शकतो म्हणून केशव उभा राहातो. त्याची पाटील होण्याची शक्यता सर्वांना वाटते इतर पाटीलकीसाठी उभे राहाणारांनी अर्ज मागे घ्यावेत असे लोकांना वाटते १९८६ ला सरकारने ग्रामपंचायत निंवडणुका जाहिर केल्या व प्रत्यक्ष २ मे ला मतदानाची तारीख जाहीर झाली होती. त्यात बौध्दांचे दोन उमेदवार सरपंचपदासाठी उभे होते. त्यात मातंगांचा एक व विकास लिंबा याचेही अर्ज होते. एकूण सहा

लोक कार्यालयीन कामासाठी सरपंचाकडे येऊ लागले. १९७० ला दुष्काळात वडगावच्या ग्रामपंचायत निवडणूकीची तारीख जाहीर झाली. परंतु दुष्काळात गांजलेल्या लोकांना वाटत होते निवडणूकी ऐवजी सरकारने दुष्काळ निवारण करावे, पैसा खर्च करावा. अगोदर ग्रामपंचायत सदस्य लोकच निवडीत असत. त्यातून सरपंचपदही निवडले जायचे. वडगावात भगवान पाटलांच्या म्हणण्यानुसार सरपंचपद निवडले जायचे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुका म्हणजे काय? हे लोकांना माहित नव्हते. सरपंचाला लोक निरुपद्रवी समजत होते. ग्रामपंचायतीमुळे सरपंचाला ग्रामसेवकाबरोबर अर्थिक अधिकार मिळाल्याने सरपंचपदाला महत्व आले. रामा बेले हे ओळखून होता. त्याने दोन वर्षापासून 'माहया लिंबालेच सरपंच करीन' असा प्रचार सुरु केला होता. यामुळे रामा बेले पाटलाचा कट्ट्र विरोधक बनतो. पाटलांच्या शेताच्या व्यवहारात विनाकारण घुसतो पाटलांची जमिन करायला लागतो एक वेळ लिंबा बेले सरपंच होतो. नंतर ग्रामपंचायत निवडणूकीला विनायक पाटील 'जय बजरंग युवक आघाडी' तरुणांची उभी करतो. बौध्दांची दोन मते मिळवितो नामसेन कांबळेला उपसरपंच करुन आपण सरपंच होतो. उपसरपंच पदाबरोबरच बौध्दांना आंबेडकर पुतळा देण्याचे विनायक मान्य करतो व तो उभा करण्यावरुन कुणबी—बोध्द संघर्ष सुरु होतो. लिंबा गावाला, बौध्दांना विनायक विरुध्द भडकवितो. बौध्दांना पुतळा देऊन त्याने या सगळया पंचायती केल्या असे तो सांगतो. बौध्द आपल्या बायकांची इज्जत घेतील असे सांगतो. तर दुसरीकडे बौध्दांना पुतळा त्याच जागी उभारा मी तुमच्या पाठीशी आहे सांगतो. विनायकला गावाच्या नजरेतून उतरवायचे होते. आणि बौध्द—कुणबी यांच्यात वितुष्ठ निर्माण करुन त्याला विनायकला बाजूला सारुन स्वत:ला सरपंच होता आले असते. त्यामुळे तो बौध्दांना सतत डिवचायचा. त्यांच्या सांगण्यावरुन बौध्द पुतळयासाठी चबुतरा तयार करतात. ६ डिसेंबरला नुसता पुतळा बसवायचा तर गावातले लोक येऊन त्याचे बांधकाम पाडतात, वीस—पंचवीसजन बौध्दांना मारतात. गौतम आणि नागसेन लिंबाला बोलवायला जातात पण तो येत नाही. सगळा बौध्दवाडा ओसाड पडलेला होता. सर्वजन जीवाच्या भितीने पळून गेले होते. गौतम आणि नागसेन यांनी वासिमला पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. पोलीसांनी ३० जनांना अटक

केली त्यात लिंबा बेलेही होता. विनायकलाही पकडले जाते. ही केस सेव्हन पी. सी. आर. या मागासवर्गियासाठीच्या कायद्यात नोंदवली जाते.

भगवान पाटलांनी धावपळ करुन पालकमंत्री, खासदार, स्थानिक आमदार यांच्याशी संपर्क साधला पं. स. सभापतींना मध्यस्थी करायला लावली. सर्वांना सोडायला सांगितले १५ दिवसांनी सर्वांना जामिनावर सोडले. पोलीसांच्या संरक्षणामुळे गावावरुन पळून गेलेली बौध्द मंडळी परत येते. कुणब्यांनी बौध्दांवर बहिष्कार टाकला. बौध्दांनी टाकलेल्या केसचा खर्च सगळया कुणब्यांनी वर्गणी काढून करायचा ठरते लिंबा आणि विनायकला एकदा वकिल बोलावून घेतो. पुतळयाची केस आपआपसात मिटवायला सांगतो. केस सेव्हन पी. सी. आर मध्ये गुंतल्याने तिचा निकाल बौध्दांसारखा लागतो. वाघमारे नावाच्या न्यायाधिशांनी मागासवर्गियांच्या केसचा निकाल सर्वप्रथम लावले. बौध्दांच्या सगळया अटी मान्य करुन वकिल केस मिटवायला सांगतात या भानगडीतून कुणबी वाचतात की नाही तर त्याच कायदयाने मातंग ही लढायला तयार झाले होते.

६ डिसेंबर १९८४ ला मातंग लोक वाशिमला भोपळे साहेबांचा कार्यक्रम आयोजित करतात तर बौध्द आंबेडकरांचा पुतळा गाववाल्यांच्या पोळयाच्या जागी उभारतात. त्यांनी सेव्हन, पी. सी. आर कायदा आणि त्याचे न्यायाधिश यामुळे हवे त्या ठिकाणी त्यांना पुतळा उभारु दिला. पुतळा उभारायाला परवानगी दिल्यामुळे विनायक आणि लिंबा यांच्याविषयी गाववाल्यांच्या मनात राग होता. त्यांचे राजकारण गावात चालू दयायचे नाही. या दोघांना राजकारणातून हद्दपार करण्याचा ते बेत करतात. शिवसेनेची गावात सुरुवात विकास बेलेच्या रुपाने होते. कॉलेज बरोबर तो गावावल्या राजकारणात असतो. पाटीलकीसाठी बौध्दांच्या केशवसह गावातील तीघे उभे राहातात. नवीन कायद्यामुळे मागासवर्गियांचाही एखादा पाटील होऊ शकतो म्हणून केशव उभा राहातो. त्याची पाटील होण्याची शक्यता सर्वांना वाटते इतर पाटीलकीसाठी उभे राहाणारांनी अर्ज मागे घ्यावेत असे लोकांना वाटते १९८६ ला सरकारने ग्रामपंचायत निवडणुका जाहिर केल्या व प्रत्यक्ष २ मे ला मतदानाची तारीख जाहीर झाली होती. त्यात बौध्दांचे दोन उमेदवार सरपंचपदासाठी उभे होते. त्यात मातंगांचा एक व विकास लिंबा याचेही अर्ज होते. एकूण सहा

उमेदवार होते. कोणाचेही पाच निवडून येतील त्यांचा सरपंच होणार होता. बौध्द, मातंग यांच्यावर संख्येने जास्त असणाऱ्यांचे भवितव्य ठरणारे होते. कारण कुणब्यांत एकजूट नव्हती.

**२) मातंग आणि राजकारण :—**

गावच्या राजकारणात गाववाल्यांसोबत बौध्दाप्रमाणेच मातंगांचाही समावेश झालेला होता. पाटीलकीसाठी इतरांबरोबर गणाही अर्ज भरतो. पण त्याची पाटील होण्याची चिन्हे दिसत नव्हती. प्रभू सरपंचपदासाठी मातंगातून गणांचा भाऊ गजूला उभा करतो. डॉ. भोपळे शिवसेनेत प्रवेश करुन आमदार होण्याची स्वप्ने बघतात ते विधानसभेत स्वत:चे प्रतिनिधीत्व करण्याचा प्रयत्न करतात. शिवसेना प्रवेशाने सर्व कार्यकर्ते नाराज होतात. भोपळे साहेबांनी आपल्या स्वार्थासाठी मातंग समाजाला वापरुन घेतले असे सर्वजन म्हणतात. आपल्या पाठीमागे मातंग समाजाला घेऊन फक्त शक्तीचे प्रदर्शन त्यांनी केले अशाने संघाच्या चळवळीचे नुकसान होईल भोपळे आमदार होतील, मंत्री होतील त्यांनी मातंग समाजाला धोका दिला. असे कार्यकर्ते म्हणत होते. शिवसेनेत भोपळेंनी प्रवेश करणे प्रभूला गैर वाटत नाही. समाजकारण आणि राजकारण या वेगळया गोष्टी असल्या तरी समाजकारण आणि राजकारण या दोन्ही गोष्टी एकच व्यक्ती करु शकते. 'समाजकारण राजकारणाला पूरकच ठरु शकते' असे प्रभूचे मत आहे. प्रभूही मांगवाडयाचे समाजकारण करीत पं. स. जि. प. निवडणूकीचे राजकारण करतो .एवढे खरे की समाजाला बाधक ठरेल असे राजकारण करु नये एवढे नकळण्याइतके भोपळेसाहेब अज्ञान नाहीत असे प्रभूला वाटते. डॉ. भोपळेंच्या राजकारण प्रवेशावर प्रा. अंभोरे टीका करतात. 'अखिल महाराष्ट्र मातंग संघातून' बाहेर पडून 'स्व अण्णाभाऊ साठे क्रांतीदल' स्थापन करतात. यावर सूर्यकांत साठे अंभारेंना उत्तर देतात "कोणतंही वयात आलेलं आंदोलन शेवटी राजकीय स्वरुप घेतल्याशिवाय राहात नाही." (वारुळ पृ. ४२२) असे योग्य बोल त्यांना ऐकवतात. डॉ. भोपळेंच्या राजकारण प्रवेशाचे ते समर्थन करतात. डॉ. भोपळे राजकारणात घुसले तर त्यांचा उद्‌देश साठे स्पष्ट करतात इंगोले गुरुजीही समर्थन करतात. राजकारणाने पक्षकारणाने आज संघटनेला

स्वतःची ताकद सिध्द करण्याची संधी प्राप्त होते, पक्षीय राजकारणात दबाव गट निर्माण होतात. चळवळीने राजकारणाची कास धरली तर त्यातून फायदाच होण्याची शक्यता असते. त्यावर साठे इंगोले गुरुजींना सांगतात 'पक्ष तयार करण्यासारखी आपल्या समाजाची संख्या नाही.' 'एखादया विधानसभा व लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत निवडणूकीचा निर्णय बदलविण्याची ताकद आपल्या समाजात नाही. असे साठेंचे पक्षांसंदर्भात मत असते. मातंग समाज अल्पसंख्य असल्याने भोपळे साहेब पक्ष काढीत नाहीत.

१९८६ ला सरकारने ग्रामपंचायत निवडणुका जाहीर केल्या अर्ज भरणे व मागे घेण्याच्या तारखा निश्चित झाल्या. मतदानाची तारीख जाहीर झाली. त्यात वडगावचाही समावेश होता. अगोदर असणाऱ्या सरपंचाने विनायकने कोणकोणती विकासकामे केली याचा गाववाले लेखाजोखा मांडू लागले. कांही लोक त्याच्या कामावर खुष, तर काही नाराज होते. त्याच्या काळात प्लॉट दिले, पण तेही विश्वासातल्याच लोकांना दिले. त्यामुळे प्रभूसारखेही त्याच्यावर नाराज होते. गावात जिथे नको तिथे रस्ते नाले झाले, नळ आले. परंतु मातंग बौध्दांच्या नळाला पाणीच चढत नव्हते. ग्रामपंचायत मेंबर होते त्यांच्याच दारात मुरुम टाकला. नाले त्यांच्याच दारी झाले. त्यामुळे मातंगवाडा, बौध्दवाडा त्यापासून अलिप्त राहिला. पावसाळयात या दोन वस्त्यांत चिखलाने चालता येत नाही. बल्ब गेले तर बदलले नाहीत. त्यामुळे विनायकवर सर्व लोक नाराज होते. ग्रामपंचायत मध्ये बौध्दांचे दोन मातंगांचा एक असे सदस्य असून त्याचा फायदा कांहीच होत नव्हता. बौध्दांचे अविरोध सदस्य निवडून दिले होते. अपाल्याला पाठींबा मिळावा यासाठी बौध्दांच्या मागणीपोटी त्यांना आंबेडकर पुतळा आणि उपसरपंचपद दिले होते. पण तो मांडण्याच्या जागेवरुन भांडण झाले होते. या निवडणूकीला तसे होऊ द्यायचे नाही असा मातंगांनी निश्चय. केला सरपंच होण्यासाठी ज्याला पाठींबा हवा असेल तर त्याच्याकडून जास्तीत जास्त रक्कम वसूल करायची, असे ठरविले जाते. येणारी रक्कम बँकेत दोघांच्या नावे संयुक्त खाते काढून टाकायचे ठरविले जाते. मातंग विनायक पाटलाची सामाजिक कार्यासाठीची ढवळाढवळ सहन करायची नाही ठरवितात. विनायक पाटीलकी असल्यामुळे सरपंचकी साठी अर्ज भरणार नाही असे

लिंबा व विकासला तोंडी सांगतो. पुढच्या निवडणूकीत सरपंच लिंबा बेले व उपसरपंच विकासने व्हायचे असा करार ठरतो. पण गावात निवडणूकीचे वेगळेच वातावरण होते. लिंबा व विकास यांच्यात सरपंच तू की मी असा वाद निर्माण होतो. त्यांचा वाद विनायक पाटलांकडे येतो. विनायक त्यांना पाटीलकीच्या वेळी सांगितले तसे वागा सांगतो. परंतु लिंबा 'सरपंच होईन तर मीच' असे विकासला सांगतो. त्यामुळे या वादातून विनायक स्वत:चे अंग काढून घेतो लिंबा आणि विकास एकमेकांच्या विरोधात निवडणूकीच्या तयारीला लागतात. दोघेही मातंग, बौध्दांना आपल्याकडे वळविण्यास सुरुवात करतात. बौध्दांनी त्यांना सांगितले होते की आम्ही मागू तेवढा पैसा दयाल तर आमची दोन मते तुम्हाला भेटतील विकास प्रभुला भेटून मातंगांच्या एका मताविषयी विचारतो. विकास हा डॉ. भोपळेंच्या शिवसेना प्रवेशाचा उपयोग स्वत:ला गावच्या राजकारणासाठी करुन घेतो.

सर्व मातंग निवडणूकीसाठी आपला सदस्य नेमण्यासाठी मिटींग घेतात त्यात सदाशिवचे नाव सर्वजन सुचवितात परंतु गणा त्याल विरोध करतो. त्यावर उपाय म्हणून सर्वानुमते गजूचे नाव सुचविले जाते. भाऊ असल्यामुळे गणा त्याला विरोध करीत नाही. या बैठकीत गजूच्या मतासाठी जो सर्वात जास्त पैसे देईल त्याला मत द्यायचे सर्वजन ठरवितात, व येणाऱ्या पैशातून समाज मंदिर बांधण्याचा संकल्प सवर्जन करतात. विनायक त्यावेळी प्रभूवर दबाव आणतो पण प्रभू स्वत:च्या मनाने वागतो. स्वत:चा निर्णय स्वत: घेतो. एक दिवस रात्री १२ ला लिंबा बेले प्रभूकडे येऊन मातंगांच्या सदस्याचे दहा हजार रुपये प्रभूकडे देतो व बाकीची रक्कम मतमोजणी दिवशी जितकी मागशील तितकी देईन असे सांगतो. प्रभू ती रक्कम लिंबाला परत करतो व नंतर पाहू असे उत्तर देतो.

निवडणूक जशी जवळ येत होती तसं मतदारांना भेटणं, वळविणे, दबाव आणणे, रुसवे, फुगवे इ. गोष्टी चालत होत्या. राजारामाने तर अनसिंग वरुन दारुचे खोके विकत आणले. गावात दारुसोबत मटण, गहू, ज्वारी, दाळदाण वाटला होता. १ मे चा दिवस अत्यंत धामधुमीत गेला मतदार फोडणे, बोगस मतदान करणे बाहेरगावावरुन मुंबई, सुरत वरुन उमेदवारांनी आपले मतदार स्वखर्चाने आणले. गावात प्रत्येकाला त्रास आणि खर्च झाला. दुसऱ्या दिवशी वाशिम तहसिल

कार्यालयावर मतमोजणी होते. लिंबाचे तीन सदस्य निवडून येतात. विकासच्या पार्टीचे दोन सदस्य निवडून येतात. दोघांनाही सरपंचपदासाठी ५ मते हवी होती. सरपंचपदाला एकाच सदस्याची आवश्यकता असणारा लिंबा प्रभूला म्हणतो. 'आता सगळे तुझ्याच हातात आहे' त्यामुळे मातंगांच्या गजूच्यां मताला महत्त्व आले लिंबाला बौध्दांच्या दोनपैकी एक सदस्याला पटविता आले असते. पण पाठीमागे आंबेडकर पुतळयाने सर्वांचीच मने कलुषित झाली होती. त्यामुळे बौध्दांपेक्षा गजू लिंबाला योग्य वाटत होता. विनायकने आपले अंग अगोदरच काढून घेतले होते. लिंबा बेलेचे लोक आनंदी होते. विकास मात्र नाराज झाला. लिंबा विकासला तोंडावर म्हणाला "कालचं आंडमव्हूळ मले डोईजड व्हयाले पाहू लागलं..... आता कसं झालं? (वारुळ पृ. ४६५) ?

मातंगांची बैठक झाल्यानंतर प्रभू आणि गजू यांनी एक सदस्य पैसे आणायला जावे असे ठरते. सर्वांची चळवळीने मानसिकता बदललेली होती. त्यामुळे ते सदस्याची किंमत वसूल करणार होते पण मातंगांच्या एका सदस्याची रक्कम लिंबा बेलेकडून परस्पर गणा घेऊन जातो. प्रभू, गजू हात हालवितच परत येतात. गणाने पैसे परस्पर घेतले याचा त्रास प्रभूला होतो. पैसे नाहीत तर मत नाही, असे प्रभू ठरवितो त्यावेळी लिंबा बेल्या त्याला धमकावितो, 'जा,पण याद राख या गजूचे मत मलाच पडले पाहिजे.' गणा, गजू एका आईच्या पोटी जन्म घेतात म्हणून भाऊ, पण दोघांत वितुष्ट होते. गजू प्रभू सांगिल त्याला मत दयायला तयार होतो. गावात सर्वांना माहित असते की लिंबा बेले सरपंच होणार. सरपंच निवडीची तारीख जाहीर झाल्यानंतर विनायक आपल्या नोकरामार्फत प्रभूला कवठयाला रमेश पाटलाच्या घरी बोलावतो सांगातो. 'लिंबा बेले कोणत्याही परिस्थितीत सरपंच न व्हायला पाहिजे. लिंबाने सरपंच निवडणूक लागल्यापासून गावात नको त्या गोष्टी केल्या. घरघरात भांडणे लावली. निवडून येण्यासाठी त्याने जास्तीत जास्त पैशाचा वापर केला. दारु, मटन वाटलं, काहीही करुन आपणच सरपंच व्हायचे तो ठरवितो. त्याच्या चार जागा निवडून येतात मातंगांच्या एका सदस्याचे पैसेही गणाजवळ त्याने दिलेले होते. विनायकला गजूचे मत आपल्यालाच मिळावे असे वाटते. प्रभू विनायकला सांगतो की मताचे पैसे घेतले म्हणून लिंबाला मत दिले

असे होत नाही. प्रभूही विनायकाकडे जेवढे लिंबाने पैसे दिले तेवढेच पैसे मागतो. पण विनायक म्हणतो पैसे मागशील तर जमणार नाही. प्रत्येक सदस्याला सरपंचपदासाठी पैसे देणे विकासला जमणारे नव्हते. विकासकडून पैसे घेऊन मातंग समाजात एखादे समाज मंदिर बांधण्याचे प्रभूचे स्वप्न असते. विनायक प्रभूला सांगतो की विकास सरपंच झाल्यानंतर समाजमंदिर बांधून देईल.' पण मातंग समाजाला रोख काहीतरी हवे असते. प्रभू समाज मंदिराबरोबर गजूला उपसरपंच पद द्या असे सांगतो. त्यावर प्रभूला विनायक कोणतीही एक गोष्ट मिळेल असे सांगतो. आणि उपसरपंच पदाची जरा भानगड आहे असे सांगतो. कारण बौध्दांचे दोन सदस्य अजून येणार होते. त्यावर प्रभू त्यांना बोलतो 'मग इथेच आपल बोलण थांबल असे म्हणतो त्यावर विनायक नाराज होतो. त्यावर प्रभू म्हणतो — "माहा एक मनन असं की, मी आमच्या एका मतासाठी उपसरपंचपद मागायलो तं तुम्ही मान चोळायले — अन् तेच त्या बौध्दायचे माणसं तुम्हाले अजूक भेटले नाही तं तुम्ही त्याहयले उपसरपंचपद देयाच मनता? मंजे बौध्दांयच्या माणसाइत की आम्हाला किंमत हाये काय? " (वारुळ पृ. ४७९) प्रभू बैठकीत समाजमंदिर आणि उपसरपंचपदासाठी ठाम असतो. त्यावर बौध्दांचे दोन सदस्य असतात. मातंगाचा एकच असतो पण माणसाच्या संख्येपेक्षा मताला 'किंमत असते असे प्रभू विनायकला ठणकावून सांगतो जर असे जमत नसेल तर आम्ही बाजू काढून घेतो असे सांगतो. विकासला सरपंच होऊ द्या त्यावर विनायक चिंताग्रस्त होतो. प्रभूशी सामोपचाराने विचार विनिमय करतो. प्रभूच्या मागण्या मान्य करतो. २५ तारखेपर्यंत गजूला लपवून ठेवण्यास सांगतो. किंवा आमच्या माणसासोबत त्याला कुठेतरी पाठवा असे बोलतो.

प्रभू घरी येताच गजूच्या दारासमोर लोकांची गर्दी दिसते गणाने गजूला गाडीवरुन कोठेतरी नेले. गजूची बायको गणाच्या नावाने शिव्याशाप देत होती. बोटे मोडीत होती. त्यामुळे प्रभू चिंतीत होता. विनायकशी केलेल्या कराराचे काय अशी त्याला चिंता लागून होती. प्रभूला गजूने शब्द दिला होता. गणाची कोणतीही गोष्ट मी ऐकणार नाही, ग्रामपंचायतीत निवडून आलेले सर्व लोक जमा होतात. राजाराम आणि गणा गजूला घेऊन जिपमधून येतात. प्रभूला दिलेला शब्द गजू पाळतो.

विकासला सरपंचपदासाठी मत देतो. तर उपसरपंच म्हणून नामदेव बेलेला मत देतो. एका मताने काय परिणाम होतो तो इथे लेखकाने सांगितलेला दिसतो. सरपंच निवडणूकीनंतर गणा व गजू दोघेही बेपत्ता असतात. प्रभू गजूचा शोध घेतो तेवढयात विजय प्रभूला सांगत येतो 'गणा आणि गजू काकांचा शाळेच्या पाठीमागे मुडदा पडलेला आहे.' लिंबा बेले, त्याचे दोन भाऊ, दोन मुले यांनी गणा गजूला बेदम मारलेले होते. त्याचा नावानिशी पोलीस स्टेशनला रिपोर्ट प्रभू देतो व गणा गजूला अनसिंगला दवाखान्यात घेवून जातो. अशाप्रकारे राजकारण माणसाला कसे झुलवते याचे चित्रण यात येते.

डॉ. भोपळे साहेबांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर वाशिम विधानसभा मतदार संघातून मातंग माणसाला तिकीट मिळावे यासाठी मुंबईला जातात. विधानसभा निवडणुका संपतात. नंतर काँग्रेसशी स्पर्धा करायचा प्रयत्न शिवसेना करते. पण यशस्वी होत नाही. त्यासाठी भाजपासोबत युती केली जाते. काँग्रेसच बहुमताने महाराष्ट्रात निवडून आली होती. त्यावेळी काँग्रेस मराठा लॉबीचा दबदबा सुरु झाला होता. १९८२ ला बॅ. अंतुलेंनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर बाबासाहेब भोसलेंचा शपथविधी झाला. १९७८ साली शरद पवारांनी वसंतदादा पाटलांच्या मंत्रीमंडळातून फुटून शे. का. पक्षा सोबत पुरोगामी लोकशाही दल नावाची आघाडी स्थापन केली. स्वतःचे मंत्रीमंडळ स्थापन केले. तेव्हांच इंदिरा गांधींनी शरदपवारांना काँग्रेसमधून काढून टाकले. केंद्रात त्यावेळी सरकार मोरारजी देसाईचे होते. बाबासाहेबांनाही मुख्यमंत्री पदावरुन जावे लागले. वसंतदादा मुख्यमंत्री झाले. त्यांचे इंदिरा गांधीशी पटले नाही म्हणून १९७७–७८ ला स्वाभिमानाने मुख्यमंत्रीपद सोडले त्यावेळी केंद्रात इंदिरापुत्र संजय गांधीचे आपघाती निधन झाले. राजीव गांधीनी इंदिरा गांधींना आधार दिला. राजकारणात प्रवेश केला. ३१ आक्टोंबर १९८४ ला इंदिराजींचा खून झाला राजीव गांधी पंतप्रधान झाले. महाराष्ट्रात वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांना न विचारता राजीव गांधींनी प्रभा राव यांची महाराष्ट्र राज्य काँग्रेस अध्यक्षपदी नेमणूक केली. त्यामुळे वसंतदादांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. वरिष्ठांशी न पटल्याने दोनवेळा मुख्यमंत्रीपद सोडणारे देशातले ते पहिले एकमेव मुख्यमंत्री होते. तरी त्यांनी

राजकारणावर आपली पक्कड ढिली होऊ दिली नाही. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना त्यांनी मुख्यमंत्रीपदावर बसविले.

सारांश :— जाती—पातीवर, आधारित लोकसभा, विधानसभा, जि. प. पं. स. ग्रामपंचायत निवडणुकांत चित्र स्पष्ट दिसते. जाती जातीत संघर्ष दिसतो जातीवरुन मतदारांना आव्हान केले जाते. मतदार संघात ज्या जातीचे मतदार अधिक त्या जातीचा उमेदवार देण्याचा प्रयत्न केला जातो. गुलाम नबी आझाद सारखा माणूस महाराष्ट्रावर लादला जातो. पण हे चित्र विधानसभेच्या राखीव मतदार संघात दिसत नाही. वाशिम विधान विधानसभा हा अनुसुचित जातीसाठी राखीव मतदार संघ होता. अनुसुचित जातीतच येणाऱ्या उमेदवारातच संघर्ष असतो. इतर मतदारांपेक्षा त्याचे उमेदवारही जागृत असतात. राखीव मतदार संघात फक्त त्याचेच लोक प्रचार करतात हे चित्र या कादंबरीतील नायकाला स्पष्ट दिसते. जातींच्या राजकारणातील दलदल पाहून त्याला किळस येते. अशाप्रकारे 'वारुळ' मध्ये मातंग, बौध्द, कुणबी यांचे गावपातळीवरील पाटील,सरपंच या पदासाठी चाललेल्या राजकारणाचा तपशिल येतो. त्याबरोबर विधानसभा, लोकसभा इ. राजकारणातल्या घटना—घडामोडींचे दर्शन लेखक घडवितो.

## ७) 'वारुळ' आणि ऐतिहासिक आशयसूत्र :—

कादंबरीत विविध आशयसूत्र आलेली आहेत. त्यापैकी ऐतिहासिक आशयसूत्रांचा मागोवा या ठिकाणी आपल्याला घ्यावयाचा आहे. कादंबरीत व्यापक असा पट येतो. १९४७ ते १९८० कादंबरीची सुरुवातच मुळी एका ऐतिहासिक घटनेने झालेली आहे. "......... १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला....भारताला स्वातंत्र्य मिळाले... "(वारुळ पृ.७) कादंबरीचा नायक प्रभू वर्गात अभ्यास करतो. मास्तरांनी त्याला प्रश्न विचारलेला असतो. 'भारताला स्वातंत्र्य केव्हा मिळाले.?' चौथ्या वर्गात शिकणारा प्रभू याचे उत्तर देतो. त्याला मास्तर सांगतात 'तुझा जन्मही १९४७ ला झाला'. जातीने मातंग असलेल्या प्रभूला मास्तर 'देशाबरोबर तुही जातीयतेच्या जोखडातून स्वतंत्र झाला आहेस, असे सुचवितात. कादंबरी अशा छोटया—मोठया ऐतिहासिक घटनांद्वारे पुढे

सरकते. वर्गीयव्यवस्था, भारतीय समाजाला, लागलेली कीड त्यामुळे अस्पृश्यता बोकाळलेली आहे. दलितांना वाईट—हीन जीवन जगावे लागत होते. त्या दलितांमधील मातंग समाजाच्या तीन पिढयांचा इतिहास यामध्ये येतो. मातंग समाजाची पहिली पिढी गावकीची कामे करते ढोर ओढणे, सोलणे, पडीचे हिस्से टाकणे, मर्तिकाचे निरोप सांगणे, कणग्या दुरडया तयार करणे समारंभात सनई—चौघडा वाजविणे इ. गावकीची कामे करीत होता. बौध्द धर्माची दीक्षा घेण्याअगोदर बौध्दांनी हीच गावकीची कामे केली होती. १९५६ साली आंबेडकरांनी बौध्दांना दीक्षा दिली ते बौध्द झाले बौध्दांनी दीक्षा घेतली आणि त्यांच्यात विकासाचे वारे वाहू लागले, ते शिकले सवरले. मोठमोठया अधिकाराच्या नोकऱ्या त्यानां मिळाल्या, उद्योग, व्यवसायात ते पडले, त्यांनी स्वतःची प्रगती करुन घेतली. गावकीच्या कामावर त्यांनी बहिष्कार घातला बौध्दांनी सोडलेली गावकीची कामे मातंगांच्या पहिल्या पिढीने खुषीने स्वीकारली. अगोदरच मातंग गावकीच्या कामावर टपून बसले होते. बौध्द मातंग यांच्यात या कामावरुनच पूर्वीपासून वैमनस्य होते. मातंगाच्या पहिल्या पिढीत लोक आळशी, गावाच्या उष्टया—पाष्टयावर समाधान मानणारे, अडाणी, अज्ञान, लाचारी पत्करीत होते. कांही जागल्या, येसकर म्हणूनही काम करीत होते. त्यापैकी येसाजीला गावचा आठवडयाचा रिपोर्ट तालुक्याला पोलीस स्टेशनला द्यावा लागतो. या पिढीत येसाजी, यादव, चहादू, नाथा, भिका, संपत, हारजीही गावकीची कामे करीत होते. या पिढीच्या विवेचनावरुन बौध्दांच्या पहिल्या पिढीचे दर्शन घडते. शिदनाक, पंडनाक हे बौध्दाच्या पहिल्या पिढीचे आहेत. शिदनाक हा कादंबरीत बौध्दांचा पुढारी म्हणून येतो. नागपूरला आंबेडकरांनी दीक्षा दिली त्यावेळी वडगावच्या बौध्दांचा नेता तोच होता. पडीचे हिस्से तोच टाकीत होता. आंबेडकरांच्या विचाराचा त्याच्यावर चांगला प्रभाव होता. पण शिदनाक हा मातंगांशी कधीच चांगला राहात नाही. मातंगांची तो सारखा उपेक्षा करतो. यावरुन बौध्द—मातंगाचे पूर्वीपासून वैमनस्य असलेले दिसते. कादंबरीत आंबेडकरांचे मोठेपण शिदनाकाच्या व्यक्तिरेखेतून वाचकांना कळते. आंबेडकर हे एकटया बौध्दांचेच नसून सर्व गरीब अन्यायग्रस्त लोकांचे आहेत असे शिदनाक येसाजीला सांगतो. या दोघांच्या बोलण्यावरुन आंबेडकरांचा मृत्यू झाल्याची घटनेची

सूचन होते. त्याबरोबर शिदनाक येसाजीला ढोर ओढणे, सोलणे, मांस खाणे यातील लाचारी सांगतो. मातंगांना व येसाजीला त्याचे बोलणे आवडत नाही.

बौध्द मातंगांना हलके समजतात मातंगांना बौध्द आपले शत्रू वाटत होते. कुणबी—ब्राम्हण यांच्यापुढे या जाती हलक्याचे मानल्या जात होत्या. अस्पृश्यता टोकाची पाळली जात होती. ती पाळायला सुरुवात ब्राम्हणांनी केली. त्यातील फोलपण लक्षात आल्यावर ती सोडण्यात ब्राम्हण लोकच पुढे सरसावले.

मातंगांची पहिली पिढी अशिक्षित आहे. वाजविण्याच्या गावकीच्या कामाशिवाय त्यांनी कधी शेतातील कामे केलेली नव्हती. या समाजाला शारीरिक कष्ट करायचे म्हटले तर जमत नाही. दुसरा व्यवसाय, नोकरी करायची म्हटली तर त्याचे शिक्षण नाही. हारजी, संपत नाथा, बहादू, तुळशीराम, भिका, येसाजी कोणीच शिकलेले नाही. त्यांच्याकाही त्यांना शिकायच्या संध्या नव्हत्या महारामांगाच्या पोरांना मास्तर कधी शिकवत नसत शाळेत घेत नसत. मातंग लोकांनाही शिक्षणाची गरज वाटली नाही. मातंग समाज कायम दारिद्रयात खितपत पडला होता. त्यांची घरे बसकी आहेत. कुडाच्या मातीच्या त्यांच्या भिंती आहेत. दरवाजेही त्यांचे ठेंगणे आहेत. एखादया घरात मुलाचे लग्न झाले की सर्वांनाच घरात फिरता येत नसे. सून व मुलाला घरात ठेवून आई—वडिल कुणाच्या तरी ओठयावर झोपायला जात. घर वाढवावे म्हटले किंवा दुसरे झोपडेही या जमातील बांधता येत नाही. कारण या जमातीचा स्वभाव आळशी आहे.

कुणबी लोक मातंगांच्या लोकांचे तोंड पहाणे शुभ मानतात. सिहाजी पाटील त्यासाठी मांगवाडयातून शेताकडे जात. मांगांचे तोंड पाहिले का दिवस चांगला जातो अशी त्यांची धारणा होती. कुणब्यांच्या लोकांना मांगांचे तोंड दिसावे म्हणून मांगांची घरे कुणब्यांचा दारासमोरच पूर्वीपासूनच आहेत. मांगणीच्या हाताने दसऱ्याला पोतर भरले जाते. तिला लक्ष्मी मानून तिचे दर्शन कुणबी लोक घेतात. सूर्य—चंद्रग्रहण लागले की मातंगांची माणसे ग्रहाण मागतात. हा त्यांना परंपरेने मिळालेला अधिकार आहे. भाडोळयाचे गाणे म्हणून भाडोळा मागण्याचा अधिकारही मातंग समाजाला आहे. यात भाडोळाचा इतिहास सुध्दा सांगितला आहे. पाटलाचे दर्शन झाले की लोकांना आनंद होतो. मातंग लोकांनी गावकीची कामे करायला

सुरुवात केल्यापासून मातंग वस्तीत ढोराच्या सुकवून ठेवलेल्या मटनाचा वास सुटलेला असायचा. मातंगांची वडगावात वस्ती नव्हती. पंढरपूरहून मांगांचे दोन भाऊ वडगावात रहायला आले. त्यापासून मातंग समाजाची वंशवृध्दी झालेली दिसते. प्रत्येक मातंग कुटुंबात श्रीमंती तर नाहीच पण घरात मुलांची संख्या जास्त आहे. मातंग बौध्दांच्या मर्तिकाचे वाजवित नाहीत. फक्त कुणबी समाजाचे कोणी मेल तरच वाजवितात. धनगर, तेली, माळी, वाणी इ. लोकांचे बोलावले तर मातंग मर्तिकाचे वाजवितात इतर समारंभाचे वाजवितात मर्तिकाचे वाजविण्याची चाल उलटी असते. त्यावेळी चौघडा वापरला जात नाही. कुणब्यांच्या लग्नात पूर्वी बैलगाडी नसायची त्यांना वाजविण्याची साधने घेऊन वऱ्हाडा सोबत चालत जावे लागे. मातंगांची एक वेगळी सांकेतिक भाषा आहे. ती व्यवसायिक भाषा आहे. तिचा वापर ते कायम कुणब्यांच्या लग्नात मातंगांना शेवटी जेवायला वाढतात त्यांचा बौध्दांना बाट व्हायचा. त्याचा सविस्तर इतिहास या मध्ये पाटलाचे घोडे असेल तर त्याच्यावर बसण्याचा अधिकार नसायचा ते फक्त सांभाळले जायचे. मातंगांच्या बायका कुणब्यांच्या घरी कामाला जात पण त्यांना त्याचा मोबदला मिळत नाही. उलट त्यांची हेटाळणीच केली जायची. भाकरी जेवणही खराब झालेले दिले जात असे मंदिरांच्या पारावर उभे राहून यादवाला पखवाज वाजवावे लागत असे. कुणब्या—तेल्यांच्या भजनात मांगाचा माणूस पखवाज वाजवायला चालत नाही. प्रत्येक गावाची रचना पूर्वीपासून ठरलेली आहे. वडगावात बौध्दवाडा गावाच्या नैऋत्य दिशेला आहे. मांगवाडा त्याच्या विरुध्द ईशान्या दिशेला आहे. अनेक पिढया एकमेंकाकडे पाटी फिरवून वास्तव्य करीत आहेत. बौध्दांनी दीक्षा घेतल्यापासून ते सुधारले आहेत तर मातंग सुधारले नाहीत ज्या ठिकाणी आहेत त्याच ठिकाणी ते आहेत बौध्द लोकांच्या नावापुढे 'नाक' शब्द लावायची प्रथा होती. जारनाक, नागनाक, शिदनाक, याप्रमाणे, दीक्षा घेतल्यानंतर शिदनाक नाव असेल तर त्याला 'सिदाजी' म्हटले जावू लागले.

शिदनाक येसाजीला म्हणतो—'बाबासाहेबांच्या सांगण्यावरुन मांग लोक बौध्द धर्म स्वीकारणार होते.' पण त्यावर येसाजीचा विश्वास बसत नाही. येसाजीला जयरामच्या ओढयावर कांही माणसांची गर्दी दिसली. गावकामगार या नात्याने

त्याची खात्री करुन घेतो. तर समजते की कोणीतरी पंडित बाबा मेले त्याला सर्व संतांची नावे आठवतात. पण पंडित बाबा कोण? म्हणून येसाजीला प्रश्न पडतो. इतक्यात पाठीमागून आवाज येतो. 'अरे पंडित बाबा नाही. पंडित जवाहरलाल नेहरु म्हणं.' भोसले मास्तर त्याला सांगतात त्यावेळी त्याच्या कपाळावर आटया पडतात. भोले मास्तर म्हणतात. "हो आपले पंतप्रधान ... पंडित नेहरु मरण पावले. .. नुकतीच बातमी ऐकली मी सुध्दा रेडीओवर." (वारुळ पृ. ९८) पंडित नेहरुंचा मृत्यू कशामुळे झाला सविस्तर माहिती भोसले मास्तर सांगतात. तेव्हा चिन—भारत युध्दांचा संदर्भही यात येतो. भारताचा या युध्दात पराभव झाला 'हिन्दी—चिनी भाई—भाई, म्हणणाऱ्या चिनने विश्वासघात केला व भारताशी युध्द केल त्याचा धक्का पंतप्रधान असणाऱ्या पं. नेहरुंना बसला व ह्रदय विकाराच्या धक्याने त्यांचा मृत्यू झाला हा संदर्भ भोसले मास्तरांच्या तोडून सर्वजन ऐकतात. येसाजी सहित सर्वांना चिनविषयी राग येतो. त्याच विचारात घरी येताना सर्व गावच्या मातंगांना नेहरुंच्या मर्तिकाचा निरोप देण्यासाठी गावोगावी जावे लागेल असे वाटते.

१९७१ च्या दुष्काळाचे संदर्भ या कादंबरीत येतात. दुष्काळ निवारणासाठी सरकारने परदेशातून गहू, सातू, मिलो आणलेला होता. अमेरिकेतील जनावरे सुध्दा खात नसत तो गहू दुष्काळात लोक त्यावर उदरनिर्वाह करीत होते. त्यावेळी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री हे होते. यांनी पाकिस्तान विरुध्दचे युध्द जिंकून घेतले होते. व दुष्काळने देशातले लोक उपाशी मरु नयेत यासाठी आणलेले धान्य हलक्या प्रतीचे होते. त्याविरोधी मुंबईत राज्य सरकारच्या विरोधी पक्षांनी मोर्चे काढले मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा या धान्यासाठी निषेध केला. नाईकांनी त्याचवेळी 'कापूस एकाधिकार' योजना सुरु केली. जनता उपवाशी राहू नये यासाठी रोजगार हमी योजना सुरु केली. दुष्काळात कमी पावसावर येणारे कापसाचे व शेतीमालाचे बियाणे तयार केले. त्यालाच लोकांनी 'हरितक्रांती' हे नाव दिले. त्यात सरकारने ग्रामपंचायत निवडणुका सरकारने जाहीर केल्या. असा ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा आणि वास्तव आशय यामध्ये येतो.

हैदराबादच्या निजामाच्या रझाकारांचा ऐतिहासिक संदर्भ कादंबरीत येतो. हे रझाकार वऱ्हाडातल्या निजाम सरकारच्या हद्दीला असणारी गावं लुटण्याचा सपाटा

लावलेला होता. मातंग जातीचा इतिहास पौराणिक संदर्भांनी येतो. मातंग जातीच्या आठरा प्रकारांची माहिती इथे मिळते. मातंग पारंपरिक उदयोग नोकरी व्यवसायाकडे वळतात त्यांच्यात परिवर्तन होते. नाथाला चहा देताना बायजाच्या तोंडून 'लोक चंद्रावरुन जाऊन आले' असा संदर्भ येतो. बायजा अशिक्षित असली तरी प्रभू शाळेत चौथ्या वर्गात असताना त्याच्या पुस्तकात "२१ जुलै १९६९ रोजी अमेरिकेच्या नील आर्मस्ट्रॉंग नावाच्या माणसान पहिल्यांदा चंद्रावर पाऊल टाकल." (वारुळ पृ. १२६) हे ऐकून बायजाच्याही लक्षात राहिलं होतं त्यामुळे हा ऐतिहासिक संदर्भ तिच्या बोलण्यात सारखा येतो. प्रभूचा मुलगा संतोषच्या जन्मावरुन १४ एप्रिल वरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मदिनाचा ऐतिहासिक संदर्भ या कादंबरीत आलेला आहे.

उंबरकर गुरुजींच्या घरात फुले आणि आंबेडकरांचा फोटो आहे. गुरुजींच्या वक्तव्यावरुन फुलेंचा समाजसुधारक म्हणून मोठेपण लक्षात येते. गुरुजींनी आंबेडकरांचे मोठेपणही विषद केले आहे. आंबेडकर जन्माने महार असले तरी त्यांनी सगळया माणास जातीच्या कल्याणसाठी ते झटले. फुले, शाहू, आंबडेकर नसते तर मी मास्तर झालो नसतो असे गुरुजी सांगतात. मुल जन्मल्यांनतर गुढी मागण्याची प्रथा मातंगामध्ये आहे.

१९७५ साली इंदिरा गांधी सरकारने आणीबाणी जाहीर केली. या आणीबाणीने ग्रामीण लोकांना दिलासा मिळाला सावकारांनी कर्जासाठी भांडे कुंडे गहाण ठेऊन घेतली होती. ती त्यांना परत मिळाली. शेतकऱ्यांची कर्जे माफ झाली. बेघरांना घरे मिळाली. हुंडाबंदीचा कायदा आला होता. कल्याणकारी योजना राबविल्या गेल्या. नसबंदी सरकारी धोरणाने लोक रानावनात पळून गेले. गवताच्या, कडब्याच्या कुठारात लपून बसले. आणीबाणी उठल्यावर लोकांनी इंदिरागांधींच्या सरकारला, पक्षाला पाडले. गावचा पाटील सरपंच सांगले त्याला मत देणारी जनता आपल्या मताच्या ताकदीला ओळखू लागले. मताची किंमत ते वसूल करु लागले. कुटुंबनियोजनेच्या शस्त्रक्रियांचे टारगेट सरकारी नोकरांना पुरे करायला भाग पाडीत सामान्य माणूस त्याची किंमत वसूल करु लागला. अडाणी लोकही शिक्षणात व्यवहार हुशार झाले. ग्रामपंचायतीची निवडणूक चुरशीने लढायला लागले.

मातंगांनी अतिक्रमित शेतजमिनीचे पट्टे वहितीला काढले. सर्व मातंग आपल्या जमिनीतले धान्य खायला लागले. ६ डिसेंबर १९८३ ला बौध्द मंडळी पुतळा उभारण्याच्या कामी लागतात त्याच्यावरुन कुणबी बौध्द संघर्ष लागतो. टोकास जातो. व त्यावरुन कोर्ट कचेरी करावी लागते. त्याचा त्रास कुणब्यांनाच होतो. सरकारने सेव्हन पी. सी. आर. नावाच्या कायदयाने त्यांना संरक्षण दिलेले असते या केसचा खर्च कुणब्यांनी मिळून करायचा ठरविले जाते. बौध्दांची एकजूट आणि त्यांचे पुढारी अन्याय झालेल्यांना वाऱ्यावर सोडत नाहीत. बौध्दांना आंबेडकरांनी दिलेला 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' या संदेशाचे पालन करतात शेवटी गाववाल्यांना बौध्दांशी समझोता करावा लागतो. कुणबी बौध्द सांगतील तेथे पुतळा उभा करण्यास परवानगी देतात.

१७ जानेवारी १९८२ रोजी मोहना या गावी डॉ. अण्णासाहेब भोपळे यांनी 'अखिल महाराष्ट्र मातंग संघाची' स्थापना केली. शपथ घेतील 'जगेन तर समाजासाठी मरेन तर समाजासाठी' मातंग समाजाला उन्नतीचा मार्ग दाखविणारा नेता मिळाला संघाच्या रुपाने परिवर्तन चळवळीचे वारे महाराष्ट्रात वाहू लागले. जिल्हा, तालुका तसेच गावपातळीवर त्याच्या शाखा स्थापन केल्या गेल्या. डॉ. भोपळेंनी लो. 'अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' स्थापन व्हावं यासाठी आंदोलन उभं केलं अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यिक व सामाजिक कार्यावर त्यांनी प्रकाश टाकलेला होता. त्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या महामंडळातर्फे उदयोगधंदे, व्यवसायासाठी सरकारी कर्ज उपलब्ध करुन दिले पडित जमिनी वहितीला काढण्यासाठी मातंगांना परवानगी मिळवून दिली. संघातर्फे मातंग समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, स्थितीविषयी मातंगांना सरकारकडून कोणत्या योजनांचा लाभ होतो? मातंग मतदार संघ तालुक्यात किती आहेत? कोणकोणत्या पदावर मातंग लोक कार्यरत आहेत? याची सर्व माहिती काढली जाते. मातंगसमाजाला एकजूट करण्याचा प्रयत्न केला जातो. तायडेगुरुजी वडगावात हे काम करतात. साधना गवना भांडणात ते गवनाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. पाणीवाडया महाराजाला वाचवितात. अ. म. मातंग संघाचे वाशिमला कार्यक्रम होतात त्यासाठी वाशिम तालुक्यातील प्रत्येक गाव शाखेचे अध्यक्ष येतात.

अन्याय अत्याचार सहन करणाऱ्या मातंग समाजाला जागृत करण्याचे ऐतिहासिक काम डॉ. भोपळेंनी केले. संघटनांचे महत्त्व सांगितले. मातंग समाजात आठराविश्वे दारिद्र्य आहे. आपण अस्पृश्य आहोत. शांत आहोत असे समजण्याचे दिवस गेले. समाजाच्या अंगी बळ येत आहे. हे अ. म. मातंग संघामुळेच पुढे सर्व लोक स्वत:ला मांग म्हणवून घेत नव्हते. मातंग म्हणवून घ्यायला लागले होते मातंग, मतंगवाडा जय मातंग अशा शब्दांना महत्त्व येऊ लागले होते.

रामायणकाळात मातंग नावाचे ऋषी होऊन गेले त्यांचा सांभाळ शंकर—पार्वतीने केला पूजेच्या तयारीचे काम मातंग ऋषीवर सोपविले पण महाराच्या पोराने कपिला गायिला कापले त्याचा आळ या मातंग ऋषीवर येतो. त्यामुळे महादेव—पार्वतीने त्यांना अंतर दिले. कपिल गाईचा गोऱ्हा बसण्याला ऋषींनी पकडले. भाडळीच्या कथेत मातंग ऋषीला ग्रहण मागण्याचा मिळालेला अधिकार, रामायणात मातंग ऋषीचा संदर्भ येतो. वालीपासून जीव वाचविण्यासाठी सुग्रीव मातंग ऋषीच्या आश्रमात जाऊन लपतो हा मातंग समाजाचा इतिहास वाशिमच्या भोपळे साहेबांच्या कार्यक्रमाने मिळतो. सगळे मातंग लोक संघटीत होणार म्हणून कुणब्यांच्या भिवया उंचावतात. 'उदया मातंग लोक आपल्या विरोधात जाणार' याची त्यांना भिती वाटते. नवी पिढी जुन्या मातंगांच्या पिढीसारखी वागत नाही हा परिवर्तनवादी चळवळी मुळे झालेला बदल होता.

डॉ. भोपळे साहेबांचा वाशिमला कार्यक्रम घ्यावा अशी तालुका व गावपातळीवरील सदस्याकडून मागणी केली जात होती. सूर्यकांत साठे डॉ. भोपळेंच्या कार्यक्रमाची गावोगावची कार्यकारणी व नियोजन करीत असतानाच साठे कार्यकर्त्यांना दु:खद व धक्कादायक बातमी सांगतात त्याकडे सर्वांचे लक्ष लागते. “बातमी अशी आहे की, आपल्या भारताच्या लाडक्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा आज दुपारी खून झाला आहे.” (वारुळ पृ. २५७) या बातमीने सर्वजन गोंधळतात. वाशिममधले वातावरण तंग होते. साठे सर्व कार्यकर्त्यांना वेळ न घालविता घरी जायला सांगतात. इंदिरा गांधींच्या खुनाने देशातील वातावरण बिघडले होते. जगातल्या मोठ—मोठया राज्यकर्त्यांना त्यांची जरब होती. त्या पंतप्रधान झाल्या आणि प्रत्येक घरातील स्त्रीयांचे उर भरुन आले. त्यांना त्याचा

अभिमान वाटला. बायका माणसांवर वरताण करु लागल्या. एक स्त्री देशाचा कारभार करते ही गोष्ट स्त्रीयांना अभिमानाची होती. पंजाबमध्ये अतिरेकी घुसले अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचा त्यांनी शस्त्रासाठी, लपण्यासाठी वापर सुरु केला होता. अतिरेक्यांच्या बंदोबस्तासाठी इंदिरा गांधींनी मंदिरात सैनिक घुसवले त्याचा अतिरेक्यांना राग आला आणि इंदिरा गांधीच्या रक्षकांपैकी कांहीनी त्यांच्या अंगावर गोळया झाडल्या ही बातमी सर्व देशात पसरली ठिकठिकाणी दंगली जाळपोळी झाल्या. शिख लोकांचे ट्रक जागोजाग देशभर पेटविले त्यांचे मुडदे पाडले महात्मा गांधीच्या खूनापेक्षा इंदिरा गांधीच्या खूनाने जास्त खळबळ देशात घडली. त्याचे खेडोपाडी पडसाद उमटले. वाशिम, अनसिंग बरोबर वडगावातही तणाव निर्माण झाला होता. वाशिमला मिल्ट्री तैनात केली होती. कर्फ्यू लागू केली होती. इंदिरा गांधीच्या खुनाची कारणमीमांसेसह ऐतिहासिक संदर्भ 'वारुळ' मध्ये येतो.

मातंगांचा उदरनिर्वाह सिंधीच्या बनावर होत होता हे बन वडगावच्या रानात होते. त्यावर पिंपळदरीच्या मातंग स्त्रीयांचाही डोळा असायचा देऊळगावच्या देशमुखांनी मंत्री, मुख्यमंत्री यांच्या मदतीने स्वत:ची शेती पाण्याखाली यावी यासाठी वडगावच्या रानात धरण बांधायची योजना सरकारकडून मंजूर करुन आणतात आणि ते बन तोडले जाते. मातंग लोकांच्या पोटावर पाय येतात. त्याची तक्रार करायला गेले की मातंगांनाच उलट दम दिला जातो. मातंग संघातर्फे तालुक्याच्या गावी वाचनालय स्थापन केले जाते. मातंग समाजात वाचनाची आवड जोपासली जाते. त्यामध्ये फुले, शाहू, आंबेडकर यांची पुस्तके प्रामुख्याने ठेवली जातात. अण्णाभाऊंच्या पुस्तकावर व चरित्रावर व्याख्याने दिली जात होती. मातंग समाजाला अण्णाभाऊंची ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला जात होता. भोपळेसाहेबांच्या वाशिमच्या ६ डिसेंबर दिवसीच बौध्द आंबेडकर पुतळा उभारण्याचे ठरवितात कुणब्यांनी बौध्दांच्या अटी मान्य केल्या होत्या. त्यावेळी गाववाले चिंताग्रस्त होते. बौध्दांपुढे त्यांना शरणागती पत्करावी लागली होती आणि त्याचवेळी मातंगांच्यात चळवळीच्या मेळाव्यांनी जागृती केली होती. तेही गाववाल्यांच्या विरोधी उभे राहणार होते. नव्या संघर्षाला मातंग मंडळी तयार झाली होती. त्यामुळे आतून गाव अशांत होते. भोपळे साहेबांच्या कार्यक्रमाला मोठया

संख्येने लोक निघाले, त्यांच्या विचारांनी भारावले गुलामगिरी झुगारुन देण्याचे बळ त्यांच्यात आले. भोपळे आंबेडकरांच्याच मार्गांनी निघाले त्यांचेच कार्य त्यांनी पुढे चालविले समाजाला जागृत केले. संघाच्या माध्यमातून मुंबईच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या मातंग समाजहितासाठी संघर्ष केला त्यासाठी संघाच्या शाखा जागोजागी मुंबईत स्थापन केल्या मातंगाचे मेळावे भरविले. अन्यायग्रस्तांसाठी मोर्चे काढले. उपोषणे, सभा शिष्ठमंडळे घेऊन मंत्री अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या महामंडळ मिळवून कित्येक बेकरांना रोजगार मिळवून दिला. महाराष्ट्रभर दौरे काढून चळवळीचा प्रसार महाराष्ट्रभर केला. डॉ. भोपळेंच्या कार्यक्रमानंतर कुणब्यांनी त्यांच्यावर बौध्दांप्रमाणे बहिष्कार घातला.

१७ फेब्रुवारी म. फुल्यांचे गुरु लहुजी साळवे यांची पुण्यतिथी वेळी प्रा. अंभोरे यांनी मातंग समाजातील साळवे व इतर क्रांतीवीरांचा पराक्रम विषद केला. आद्य क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या नावाशिवाय देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास अपूर्ण राहिला. इतिहासाने तर त्यांची नोंद घेतली नाही महात्मा फुलेंच्या मुळेच लहुजी साळवे यांचे कर्तृत्व महाराष्ट्राला माहित झाले. इ. स. १८४१–४७ या काळात म. फुल्यांनी लहुजींकडे बलोपासनेचे व समाजक्रांतीचे शिक्षण घेतले. नंतर २० वर्षांनी लहुजींच्या हाताखाली आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी सैनिकी शिक्षण घेतले. सन १८७९ साली फडक्यांनी आपल्या गुरुच्या मार्गदर्शनाखाली ब्रिटीशांविरुध्द बंड उभे केले. 'बलवान बना आणि स्वातंत्र्य मिळवा' हे क्रांतीबीज त्यांनी क्रांतीकारकांच्या मनात रुजविले. लहुजी हे जातीने मांग पण त्यांचे घराणे शिवाजींच्या मर्जितले होते. पुरंदरच्या रक्षणासाठी या घराण्याने बलिदान दिले या क्रांतीवीर लहुजी साळवे यांचा जन्म १९ नोव्हेंबर १७१४ साली विठाबाई आणि राघोजी या दांपत्याच्या पोटी झाला. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी वडीलांसोबत लहुजींनी खडकीच्या लढाईत भाग घेतला. इंग्रजांच्या तोफांपुढे बाजीरावांचे सैन्य टिकले नाही. लहुजी व त्यांचे पिता प्राणपणाने लढले. त्याचवेळी राघोजींना गोळी लागली इंग्रजांनी त्यांना घोडयाच्या टाचाखाली मारले. क्रोधीत झालेले लहुजी इंग्रजांवर तुटून पडले शेवटी १७ नोव्हेंबर १८१७ रोजी मराठयांचा पूर्ण पराभव झाला. दुसरा बाजीराव पळून गेला. शिवाजींनी मातंग,

रामोशी, कोळी, भिल्ल, महार, जागले यांच्या मदतीने निर्मिलेले राज्य नष्ट झाले. आणि 'इंग्रजी' राजवट मराठी मुलखात सुरु झाली. लहुजींच्या मनातला इंग्रजांबद्दलचा राग मावळला नाही. त्यांनी पुणे भोर, पुरंदर, सुपे नगर, सातारा भागातून शूर मांग, रामोशी तरुण जमा केले. त्यांना देशप्रेमाने पेटविले. इंग्रजांविरुध्द बंड करणारा लहुजीचा मित्र उमाजी नाईक याला इंग्रजांशी लढताना लहुजींनी माणसे पुरविली. ब्राम्हण, राजे, सरदार इंग्रजांना घाबरुन पळत त्यावेळी लहुजी साळवे मांग, रामोशी भिल्लांना घेऊन इंग्रजांशी लढत होता त्याला इंग्रजांनी पकडून फाशी दिले. लहुजी मातंग समाजाचे असूनही त्याचे कर्तृत्व प्रा. अंभोरे सांगतात त्यामुळे मातंग समाजाचा इतिहासही पराक्रमाने रंगलेला होता. हे कळते शिवाजी राजांच्या किल्ले, गडाचे रक्षण करण्याचे काम मातंग समाजातल्या पराक्रमी पुरुषांनी केले. स्वराज्य निर्मितीत मांग महार लोकांचा सहभाग होता. इंग्रजी काळात परिस्थिती बदलली होती. गावा—गावावर दरोडेखोर हल्ले करत हे परतवण्याचे काम मातंग समाजाकडेच असे हे हल्ले गावाच्या आग्नेय किंवा ईशान्य दिशेकडून होत त्यामुळे त्यांची वस्ती त्याच दिशेला असलेली दिसून येते. हे हल्ले परतवून लावण्यासाठी गावोगावचे कित्येक मातंग लोक ठार झाले. पश्चिम महाराष्ट्र मराठवाडयाच्या मानाने विदर्भातील खेडयातून मातंग समाजाची वस्ती कमी दिसते देश स्वातंत्र्य झाल्यानंतर दरोडखोरी कमी झाली. मातंगांना काम राहिले नाही. लढणारा मातंग शेती करु शकत नव्हता. त्याला गाव पाटील पोसत होते. पाटील देतील त्यावर स्वत:ची गुजराण तो करीत होता. मातंग लोक आळशी बनले. लाचारी पत्करली त्याची अंगी भित्रेपणा आला. पाटलांचा वचक त्याला वाटू लागला गुलामगिरीचे जीवन मातंग समाज जगू लागला अशा रितीने मातंग समाज त्यामधील क्रांतीकारकांचा इतिहास पराक्रमाने कसा भरलेला आहे. प्रा. अंभोरे आपल्या भाषणातून सांगतात बाशिमच्या कार्यकारणीने गावांगावच्या शाखांना वस्ताद लहुजी साळवे पुण्यतिथी सागरी करण्याचे आदेश दिले होते. त्या कार्यक्रमात अंभोरे मातंग समाजाचा इतिहास सांगत होते.

१९७८ ला शरद पवारांनी पुलोद आघाडीचे मंत्रीमंडळ स्थापन केले. त्यावेळी विधानसभेत मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याचा

प्रस्ताव पास केला होता. त्यावर मराठवाडयात जाळपोळ लुटालुट दंगे, रेल्वे, मोटारी अडविणे असे सगळे भीषण प्रकार सुरु होते. यात अनेक गावी बौध्दांची घरे जाळण्यात आली होती. त्यांना मारहान करण्यात आली होती. या संघर्षात नांदेड जिल्हयातला टेंभुणीचा पोचीराम कांबळे नावाचा मातंग असून तो बौध्दांबरोबर नामांतर लढयात पडला पोचीराम जिवंत जाळला गेला. या घटनेने सगळा महाराष्ट्र हादरला होता. याच प्रकारे शामराव थोरात या खंडाळयाच्या कार्यकर्त्यांवर सुध्दा अन्याय झालेला होता. त्यामुळे त्याला न्याय मिळवून देण्याचे काम अ. म. मातंग संघ, वाशिमने केले. अशा प्रकारे मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा ऐतिहासिक संदर्भ या कांदबरीत येतो.

**सारांश :—** या कादंबरीत मातंग समाजाच्या तीन पिढयांचा इतिहास येतो. मातंग समाजाचा पौराणिक काळापासून आजपर्यंतच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकलेला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी मातंग क्रांतीवीरांनी स्वतःचे बलीदान दिले. शिवाजी महाराजांपासून पेशव्यांच्या काळातही या क्रांतीवीरांनी त्यांच्या पूर्वजांनी आहुती दिली. त्याचा ऐतिहासिक तपशिल कादंबरीत येतो. तसेच मातंग समाजाचा उत्कर्ष परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून कसा झाला? मराठवाडा नामांतरांच्या ऐतिहासिक घटनेची ऐतिहासिक नोंदही कांदबरीत येते.

### ८) 'वारुळ' आणि परिवर्तनवादी आशयसूत्र :—

परिवर्तन म्हणजे बदल. हा सर्व जगाचा नियम आहे परिवर्तन म्हणजे नुसताच बदल नव्हे तर 'विकासात्मक बदल' होय. परिवर्तन सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, सांस्कृतिक, अधिक या स्वरुपाचे असू शकतो. 'वारुळ' मध्ये सामाजिक बदल मुख्यत्वे सांगितला आहे. त्याबरोबर वैज्ञानिक बदलाची उदाहरणे थोडी आलेली दिसतात. यातील कुलकर्णी मास्तर अस्पृश्यता पाळीत नाहीत. प्रभू मांग असून त्याचा त्यांना बाट होत नाही. मास्तर आणि प्रभू एकाच ठिकाणी फराळ करतात. प्रभूला हात बशीतूनच धुवायला लावतात कुणब्यांच्या लग्नात मात्र स्वतःच्या पत्रावळया स्वतःलाच प्रभूला उचलाव्या लागतात. मास्तरांच्यात त्याला सन्मानाची वागणूक मिळते. शहरापेक्षा खेडयातच अस्पृश्यता पाळतात या गोष्टी

ब्राम्हणांनीच सुरु केल्या व त्या बंद करण्यासाठी ब्राम्हण पुढे येत आहेत असे मास्तर प्रभूला सांगतात. मास्तर सुविचार सांगतात 'माणूस कर्माने मोठा होतो, जातीने नव्हे' याबाबत आंबेडकरांचे मोठेपण मास्तर प्रभूला सांगतात. कुलकर्णी मास्तरांच्यात शिक्षणाने हा बदल झालेला आहे. आजारापणमुळे यादवला मेलेला बैल ओढायला जाता येत नाही. त्याची बायको त्याला हरिपाठालाही पाठवीत नाही. परंतु सिदाजी पाटलांच्या मर्तिकाचा निरोप कवठयाला दयायला त्याला भर पावसात आजारी अंगाने जावे लागते. त्यावेळी यादवच्या मनात परिवर्तनवादी विद्रोही विचार येतात. बौध्दांसारखे सुधारित जीवन आपल्याला कधी जगायला मिळेल? बौध्दांवर आंबेडकरांचा प्रभाव त्यांच्या मृत्यूनंतरही कायम आहे असा एखादा युगपुरुष आपल्या जातीत मिळेल का? अशी प्रश्नांची मालिका येसाजीच्या मनातही येते. कवठयाच्या शाळेत असणारे शिक्षक उंबरकर त्यांचे पहिले आडनाव 'कांबळे' होते. त्यांनी बदलून 'उंबरकर' ठेवले. उंबरा हे त्यांच्या गावाचे नाव होते. आडनावामुळे जात पटकन लक्षात येते. ज्या आडनावामुळे जात ओळखू येणार नाही असे आडनाव गुरुजी ठेवतात हाही एक बदलच म्हणावा लागेल. आंबेडकरांचा फोटो ही पिढी घरात लावते मास्तरांसारख्या लोकांना बाबासाहेबांचे कर्तृत्व मान्य आहे. त्यांच्या विचाराने ही पिढी भारावली आहे. शिकल्यामुळे मास्तर सारख्यांच्या पिढीत बदल होताना दिसतो.

आंबेडकरांनी बौध्दानां १९५६ ला दसऱ्याला बौध्द धर्माची । दीक्षा दिली 'शिका संघटीत व्हा, संघर्ष करा' अशा परिवर्तनाचा संदेश दिला. त्याप्रमाणे बौध्दांमध्ये परिवर्तन व्हायला लागले. गावकीच्या कामावर त्यांनी बहिष्कार टाकला गावकीची लाचारीची कामे सोडून दिली स्वाभिमानाने जगायला त्यांनी सुरुवात केली. आंबेडकरांनी सुरु केलेल्या परिवर्तनाच्या चळवळीत बौध्दांबरोबर इतर मागास जातींनाही सहभागी व्हायला सांगितले त्यात मातंगाचाही सहभाग होता. परंतु आंबेडकर बौध्दांचे म्हणून परिवर्तनाच्या चळवळीत जायला त्यांनी नकार दिला. उलट बौध्दांनी सोडलेली गावकीची कामे मातंगांनी स्वीकारली म्हणून त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास बौध्दांपेक्षा २०—२५ वर्षे उशिरा झाला

त्यासाठी १९८२ साली डॉ. अण्णासाहेब भोपळेंची अ. म. मातंग संघाची वाट पहायला लागली.

'वारुळ' मध्ये मातंगांची पहिली पिढी गावकीच्या कामात गुंतली. दुसरी शिकून सवरुन नोकरी व्यवसायाकडे वळताना दिसत. नायक प्रभू याला १५ मे १९७१ ला कोतवालपदाची ऑर्डर मिळते. तर मातंगांची तिसरी पिढी (संतोष) शिकून सवरुन समान विकासाच्या मार्गात पडणारी आहे. या पिढीबरोबर गावातही विकास होताना दिसतो. पोष्ट, लाईट गावात येते. फाटयापासून गावापर्यंत जोडरस्ता होतो. गावखरच्या नाल्यावर पूल होतो. विहिरीवर मोटारपंप येतात. नवीन बी—बियाणे येतात एकूणच कुणबी सदन झाला म्हणेल तेवढा शेतातून माल काढायची ताकद त्याच्यात आली. कुणब्यांबरोबर शेतमजूरही पोटभर खाऊ लागला होता. गावाबरोबर माणसंही बदलली वागण्यात छाकटेपणा आला १९७०—७१ च्या दुष्काळाने गरीब श्रीमंत अंतर कमी केले होते. १९७५ ला आणीबाणीने कल्याणकारी कायदे आले. सावकार नरमले. लोकांची कर्जे माफ झाली. बेघरांना घरे मिळाली. हुंडा बंदी केली. नसबंदी करणाऱ्या इंदिरा गांधीच्या सरकारला लोकांनी पाडले. स्वतःच्या मतात असणारी ताकद लोकांनी ओळखली स्वतःच्या मताची किंमत लोक मागू लागले. वाहतुकीच्या सोयीमुळे लोक वाशिम अनसिंगला जात जगातल्या घडामोडीचे ज्ञान घेतात. स्वतःबदलून इतरांनाही बदलायला भाग पाडतात. मागासवर्गीय लोक आता पाटील पाडयांना भित नाहीत. नजरेला नजर देतात. आता कोणाला कोणाचा धाक वाटेनासा झाला. पाटलांपेक्षा गावात सरपंचाला किंमत आली. त्याच्याकडे अर्थिक व्यवहार आले. त्याने प्रत्येक गावात सरपंचपदाच्या निवडणूकीला महत्त्व आले. असा काळानुसार गावात व माणसांमध्ये बदल होत होता. वडगावात पडिक जमिनी सरपंचाच्या मदतीने मातंगांनी वहितीला काढल्या लोक त्यात धान्य पिकवून खावू लागले. बेघरांना घरे मिळाली. इंदिरा सरकारने आणिबाणीच्या काळात स्वखर्चाने घरे बांधून दिली. मातंगांमध्ये त्यामुळे एकमेकांत अंतर पडले होते दुरावले होते गावातही याच प्रकारची गत होती. जातीपातीचा विचार घरे बांधून देताना केलेला नव्हता. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत विनायकने उभारलेल्या 'जयबजरंग युवक आघाडीला' बहुमत मिळाले. सरपंच

झालो की दोन मेंबरच्या बदल्यात उपसरपंचपद आणि आंबेडकरांचा पुतळा दिला होता. बौध्दांना उपसरपंचपद आणि आंबेडकरांचा पुतळा दिला होता. बौध्दांना उपसरपंचपद दिले जाते यावे सर्वांना आश्चर्य वाटते. हा एक बदलच होता. यातून बौध्दांची एकजूट सर्वांना दिसते. आंबेडकर पुतळा बसविण्यावरुन बौध्द—कुणबी संघर्ष सुरु होतो. बौध्दांवर कुणबी बहिष्कार टाकतात त्याला बौध्द जुमानित नाहीत. कोर्टात केस पडलेली होती तिचा निकाल बौध्दांच्या बाजूने लागतो सेव्हन. पी. सी. आर. कायदयाखाली बौध्दांच्या अटी कुणब्यांना मान्य कराव्या लागतात. बौध्दांच्या मताप्रमाणे पुतळा त्यांना उभारु देतात.

कवठयाच्या शाळेवर आलेले तायडे मास्तर प्रभूला सुचवितात 'आपल्याही समाजात आंबेडकरासारखा कुणब्यां विरोधात क्रांतीची मशाल घेऊन एक व्यक्ती येते आहे.' याचे प्रभूला आश्चर्य वाटते. मास्तर त्या व्यक्तीचे नाव डॉ. अण्णासाहेब भोपळे असे सांगतात. त्यांनी 'अखिल महाराष्ट्र मातंग संघ' नावाची संघटना १७ जानेवारी १९८२ ला मोहना गावी स्थापना केली मुंबईत झोपडपट्यात राहणाऱ्या मातंग समाजाची त्यांनी एकजूट केली. मुंबई विविध भागात संघाच्या शाखा स्थापन केल्या. त्यांनी शपथ घेतली. "जगेन तर समाजासाठी मरेन तर समाजासाठी, मरेन तर समाजासाठी' अ. म. मातंग संघालाच कादंबरीत परिवर्तनवादी चळवळ संबांधले आहे. या संघाच्या माध्यमातून मातंग संघाच्या सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न मातंग तरुण करतात. या संघाबरोबरच 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळा' साठी त्यांनी आंदोलन सुरु केले. अण्णाभाऊ साठेच्या नावाने सुरु केलेले हे महामंडळ फक्त मातंगांसाठीच आहे. मातंगांना वेगवेगळया उद्योग धंदयासाठी व्यवसायासाठी मंडळाद्वारे कर्ज पुरवठा करण्याची सोय होईल बेरोजगाराने कोणीच मरु नये यासाठी भोपळेंनी महामंडळासाठी आग्रह धरलेला होता. या मागणीबरोबरच दुसरी मागणी म्हणजे खेडेगावात पडित जमिनीवर मातंगांनी अतिक्रमण केलं ती जमीन त्यांनाच भाडेपट्टीने मिळावी. अशा प्रकारे जमिनी मातंगांनी वहातीला काढलेल्या आहेत मात्र त्यांच्या मालकीच्या झालेल्या नाहीत. ही माहिती तायडे मास्तर प्रभूला सांगतात कारण तायडे मास्तरांचा भाऊ दुष्काळात मुंबईला कामासाठी गेलेला

असतो व भोपळेसाहेंबाबरोबर काम करायला लागलेला असतो. त्याच्या सांगण्यावरुन तायडे मास्तर मातंग समाजाचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती, सरकारी कोणत्या योजनांचा लाभ मातंगांना होतो? तालुक्यात किती मतदार संघ आहेत? कोणकोणत्या कार्यालयात, कोण कोणत्या पदावर मातंग लोक कार्यरत आहेत याची माहिती मिळवितात. शिवाय मातंग समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाबद्दल, त्यांच्या सामाजिक, राजकीय हक्कांबद्दल जाणीव जागृती करण्याची त्यांची सुरुवात वडगावापासून करण्याचे ठरवितात.

साधना यंकाच्या गवनाला मारते. तिला बघायला सर्वजण जातात. पण साधना राजारामविरुद्ध रिपोर्ट देत नाहीत. कारण मातंग वाड्यात एकजूट नव्हती. गणालिंबाच्या खास मर्जीतला होता. यंका प्रभू यांचे बळ कमी पडत होते. त्यामुळे तायडे मास्तरांना अ. म. मातंग संघाचे काम करणाऱ्या भावाला बोलावून घ्यावे असे वाटत होते. अशा प्रकारे मुलांना शाळेत घालण्यापासून त्यांच्या अभ्यासाच्या प्रगतीपर्यंत मास्तर लक्ष घालतात. अन्यायग्रस्त जातभाईला न्याय मिळवून देतात. समाजाला अण्णाभाऊंची ओळख व्हावी यासाठी मास्तर चळवळीचा एक भाग म्हणून आण्णाभाऊंची जयंती, पुण्यतिथी साजरी करुन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मातंग समाजाला परीचय करुन देतात. साहित्यिक म्हणून परीचय देतात. गिरणी कामगार म्हणून अनुभवलेले दु:ख, पोवाडे रचून त्यांनी मांडले कामगारांचे संघटन केले. त्यांच्या साहित्यलेखनाचा अनुवाद भारतीय व पाश्चात्य भाषेतून झाला. म्हणून त्यांचे लेखन जागतिक कीर्तिचे कसे झाले? याविषयी माहिती सांगतात. आण्णाभाऊंचे नांव घेऊन मातंग संघाची स्थापना व संघटन शिकले सवरलेले लोक करीत असतात. त्यामध्ये भोपळे तर खेड्यात राहणारे मुंबईत झोपडपट्टीत त्यांनी डॉक्टरकीचा व्यवसाय त्यांनी सुरु केला. दुष्काळात मुंबईला गेलेल्या लोकांच्या औषध- पाण्यासाठी येणाऱ्यांच्या समस्या, स्वत:चा वेळ खर्च करुन सोडविल्या. मातंग समाजाच्या समस्या, अज्ञान, अंधश्रध्दा, गरीबी यांचे जवळून अवलोकन केले. मुंबईत रामनगर नावाच्या भागात शिवलिंगाच्या रुपात मातंग ऋषीची स्थापना करुन महाशिवरात्रीला यात्रा भरविली होती. अ. म. मातंग संघाच्या शाखा मुंबईबाहेरही येऊ लागल्या होत्या.

येऊ लागल्या होत्या. चळवळीतून स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य, संघटन या गोष्टी मातंग शिकतात. प्रभूला या सर्व गोष्टींची ओळख तायडे मास्तरांमुळे होते. मास्तर मातंगांच्या हिताची कामे वडगावात करायला सुरुवात करतात. गणासारख्याला त्या भानगडी वाटतात. समाजाच्या प्रत्येक कामात प्रभू तायडे गुरुजींना मदत करतो. अ. म. मातंग संघ वाशिम तालुक्याचे अध्यक्ष सूर्यकांत साठे यांचीही मदत मास्तर घेतात. मास्तर अकोल्याहून अण्णाभाऊंची पुस्तके शाळेतील मुलांना वाचायला आणून देतात. त्यासाठी स्वत: झळ सोसतात. वाशिम तालुका शाखेने राजू खंदारेच्या घरी अण्णाभाऊ वाचनालय सुरु केले होते. त्यातून तायडे गुरुजी पुस्तके मुलांना आणून देत. मातंग समाज ज्या ज्या गावात वास्तव्याला आहे. त्या त्या गावात अ. म. मातंग संघाचा मेळावा संघाच्या शाखा स्थापन करण्यासाठी वाशिमला भरविला जातो. त्यासाठी पत्रके काढली जातात. प्रत्येक गावचे मातंग त्याला उपस्थित होतात. तायडे मास्तर विष्णू मांगाला (पाणीपाडया महाराज) गणाच्या मदतीने आपला जातभाई म्हणून सोडवितात. बौध्दांचे सुधारणावादी विचार मातंग समाजाला व चळवळीला उपयोगी पडतात. प्रभू सिदाजीला डॉ. भोपळे व चळवळी विषयी बोलतो त्यावेळी सिदाजीला भोपळे आंबेडकरांसारखेच वाटतात. सेव्हन पी. सी. आर. कायदयाने जसे बौध्दांना संरक्षण दिले तसेच संरक्षण मातंगांनाही मिळते. वाशिमच्या कार्यक्रमानंतर सर्व संघाच्या नेत्यांनी स्वत:ला 'मांग' म्हणवून घेणे सोडले. त्याऐवजी 'मातंग' मांगवाडयाऐवजी 'मातंगवाडी' पूर्वी 'राम राम' त्याऐवजी 'जय मातंग' हे शब्दा पुढे आले. व रामायण काळातल्या मातंग ऋषीचा महिमा सांगितला जाऊ लागला तायडे मास्तर दिवाळीला घरी जात नाहीत. कारण दिवाळीच्या वेळेस मातंगांचा मेळावा आयोजित केला होता. त्यामध्ये प्रत्येक गावशाखेची कार्यकारणी सूर्यकांत साठेंच्या मदतीने होते साठेंजवळ डॉ. भोपळे साहेबांच्या कार्यक्रमाचे आयोजन वासिमला व्हावे असा लोकांचा आग्रह असतो. त्यासाठी डॉ. भोपळेंची भेट साठे घेतात. व ६ डिसेंबर ही तारीख निश्चित करतात. त्याचवेळी सेव्हन पी. सी. आर. कायदयाखाली बौध्दांची पुतळयाच्या केसचा निकाल त्यांच्या बाजूने लागून तेही ६ तारखेला पुतळा उभारतात.

वडगावच्या रानात असणारे सिंधीचे बन यावर मातंगांच्या स्त्रियांचा उदर निर्वाह व्हायचा. पण देऊळ गावच्या देशमुखांनी वडगावच्या बनात धरण बांधायचे मंजूर करुन घेतले व वडगावच्या मातंगांच्या पोटावर पाय येतात. मातंग तहसिलदाराकडे चौकशी करतात. त्यांना उलट दम दिला जातो.

तायडे मास्तर समाजासाठी सर्वतोपरी मदत करीत होते. ते कुणब्यांना सहन होत नाही. गणालाही ते सहन होत नाही. सभापतीकडे तक्रार करुन मास्तरांची बदली करायला लावतात 'गावात जातीय तणाव वाढविण्याऱ्या कारवाया तायडे गुरुजी करतात.' असा आरोप त्यांच्यावर ठेवला जातो. तक्रार अर्जात सहया करणारांत सरपंच विनायक लिंबा बेले, इतर पंचवीस जन होते. त्यामध्ये गणाचाही समावेश होता. याचे दु:ख मास्तरांना होते. मास्तरांची बदली ऑर्डर रद्द करण्यासाठी प्रभू प्रयत्न करतो. कारण बदलीने चळवळीचे मोठे नुकसान होणार असते.

६ डिसेंबर १९८४ डॉ. आंबेडकरांचा महापरिनिर्वाणदिनी डॉ. भोपळेच्या कार्यक्रमाची तारीख निश्चित होते. भोपळे आंबेडकरांच्याच मार्गाने गेले. मातंग समाजात जागृती निर्माण केली. झोपडपट्टयात राहाणाऱ्या मातंग समाजाच्या हितासाठी संघर्ष केला. अ. म. मातंग संघाच्या शाखा मुंबई, मुंबई बाहेर स्थापना केल्या मेळावे भरविले. अन्याय प्रस्तांसाठी उपोषणे केली. सभा घेतल्या, मोर्चे काढले अन्यायाविरुध्द लढायला मातंगांना तयार केले. मंत्र्यांना घेराव घातले व महामंडळ मिळविले. त्यामुळे बेकारांना रोजगार मिळू लागला. वाशिम तालुक्यात त्याच्या शाखा गावपातळीवर स्थापन केल्या. या कार्यक्रमाला समाज बांधव उपस्थित राहावे यासाठी प्रयत्न केले. त्याचवेळी बौध्द आंबेडकरांचा पुतळा उभारण्यास सज्ज होतात. या दोन्ही कार्यक्रमाने बौध्द व मातंगांत आनंदाचे वातावरण असते. भोपळेंच्या कार्यक्रमानंतर गणा कोणालाच कुणब्यांच्या कामावर पाठवित नाही. याचे वाईट प्रभूला वाटते. तो गावात गेला की गावकीची न आवडणारी कामे कुणबी सांगत. गणा तरीही कुणालाच कुणब्यांच्या कामावर जाऊ देत नाही. बौध्दांप्रमाणे कुणबी मातंगांवर बहिष्कार घालतात. ज्या गावात मातंग आहेत. त्या गावातही कुणब्यांनी बहिष्कार टाकलेला होता. गावकामदारकी करणाऱ्या सोनाळयाच्या मातंगाला लोकांनी बेदम मारले. बामणीच्या सर्जेराव नाईक

मातंगांचे विहिरीचे पाणी बंद करतो. वडगावातले मातंग उपाशी राहण्यापेक्षा कुण्ब्यांच्या शेतात कामाला जातात त्याचा दोष गणा प्रभूला देतो त्याचे प्रभूला काहीच वाटत नाही. यंकाने भोपळे साहेबांच्या कार्यक्रमापासून गावकीची कामे सोडलेली होती. त्यावेळी बैल ओढण्यास यंका नकार देतो. तेव्हा लिंबा संभाचा चुलत भाऊ राजाराम व त्याची दोन मुले यंकाला मारतात. प्रभू यंकाला अ. म. मातंग संघाकडे वाशिमला न्याय मागण्यासाठी घेऊन जातो. प्रा. अंभोरे ही तक्रार धुडकावून लावतात. गणा शाखेच्या अध्यक्ष असून कांही करु शकत नाही.

१७ फेब्रुवारी लहुजी साळवे यांच्या पुण्यतिथीवेळी प्रा. अंभोरेंनी साळवे यांचे चरित्र सांगून चळवळीला अवश्यक असणाऱ्या आक्रमकतेविषयी प्रभूला सांगतात. भोपळेंच्या सोबत राहून आंभोरेही आक्रमक होतात. भित्रे लोक चळवळीला मारक ठरतात. असे आंभोरेंचे मत होते. "चळवळ म्हणजे क्रांतीची मशाल. मशाल म्हटलं की तिच्यात धग, अंगार असतोच ज्याने हाती धरली त्यालाही चटके देणार, तर जो कोणी तिच्या सान्निध्यात येईल त्यालाही तिची झळ बसणार." (वारुळ पृ.३१७) परिवर्तनासाठी व्यक्तिकडे आक्रमता असावी लागते. चळवळीमुळे गावोगावी तणाव निर्माण झाला होता बिनबँडाचे लग्न लावले जाऊ लागले होते. विकासच्या लग्नात गणाचा बँड असतो. गणासह सर्व बँडवाले ट्रकमध्ये बसतात. तर त्यांना आपमान करुन खाली उतरविले जाते. जुन्या काळी मातंगांना स्वत:ची वाजपाची बासने घेऊन चालत जावे लागत असे मातंग वाजंत्री गाडीत बसल्याचे कुणब्यांना ते पटत नाही. बिनाबँडचे वऱ्हाड जाते. रिसोड जवळच्या खंडाळयाला सवर्ण मातंग वस्तीला आग लावतात. त्यात पंधरा घरे जळून खाक होतात. मनुष्यहानी होत नाही. शामराव थोरात हा अ. म. मातंग संघाचा कार्यकर्ता होता. त्याच गावातल्या गावकीची हलकी कामे करणाऱ्या किसन थोरातला 'तू अशी कामे करु नको' असे सांगत होता. त्याला कामात आडवते होता. त्यामुळे गावकऱ्यांचा शामराववर राग होता. त्यातच आंबेडकर साठे, साळवे यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या तो साजऱ्या करुन समान जागृती करीत होता. स्वत:ची पाणस्थळ शेती करुन स्वत:चा उदरनिर्वाह करीत होता. त्याला इतरांसारखी कुणब्यांची गरज लागत नव्हती. गावातल्या गुंड लोकांनी एकदा त्याला बेदम मारले. पोलीसात त्याने रिपोर्ट दिला.

त्यामुळे गाववाले अधिक चिडले. शामरावच्या धराला त्यांनी आग लावली. त्याच्या बरोबर किसन थोराताचे घरही जळाले. त्याला न्याय मिळवून देण्यासाठी वाशिम शाखेचे पदाधिकारी जळीत प्रकरणाची पाहणी करुन वाशिमला मंत्र्यांना अधिकाऱ्यांना भेटतात. त्यात ना. लहान (म. रा. गृहराज्यमंत्री) विलासराव लहाने (संपर्क आणि ग्रामविका संमत्री) कलेक्टर डी. एस. पी रिसोड, वाशिम परिसरातील सर्व राजकीय नेते, आमदार यांच्या सोबत बोलणी चालू होती. अ. भ. मा. संघाच्या कार्यकर्त्यांना भेटण्याची वेळ दिलेली होती. पोलीसांत केस देऊन कांहीच होत नव्हते. आरोपी फिरत होते. दुसऱ्याच लोकांना अटक केली होती. शामरावने डॉ. भोपळेंची भेट घेतली. मुख्यमंत्र्याची भेट घेतली होती. पंधरा दिवसात कारवाई झाली नाही तर कलेक्टर ऑफिससमोर आत्मदहन करण्याची धमकी दिली होती. त्यावेळी सरकारला जाग येते. सर्व प्रकारची चौकशी होते. प्रमुख आरोपींना अटक होते. जळीत ग्रस्तांना सरकारी मदत मिळते. 'अ. म. मा. संघ दिशा आणि दशा' यावर सर्वांना आवडेल असे ना. लहाने संभाषण करतात. सर्व मातंगावर त्याचा परिणाम होतो. प्रभूही चळवळीच्या माध्यमातून सामाजिक कामे करायला प्रभावित होतो. गावात वर्गणीचा डबा फिरवून पैसे जमा करतो हे चळवळीचे काम आहे, हे सर्वांना सांगतो त्यातून मराठी शाळेतल्या मुलांना १५ ऑगस्टला ड्रेस घेण्यांचा त्याचा संकल्प असतो. त्यासाठी गावातल्या ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पाटील यांची परवानगी काढतो सहकार्यासाठी विनंती करतो. ना. लहान यांच्याकडून बोध घेऊन प्रभून हा अभिनव उपक्रम चळवळीच्या माध्यमातून करायचे ठरविले. वर्गणीच्या पैशातून आणलेले कपडे जातीपातीचा विचार न करता वाटले जातात. त्यामुळे गाववाल्यांच्या मनातील संघनेविषयीची चांगली भावना वाढीस लागते. सुधारणेच्या युगात मातंग सुधारले तरी काही बिघडत नाही असा गाववाल्यांचा समज झाला. यंकाला ते मेलेलं ढोर ओढायला बोलवत नव्हते. गावात मेलेलं ढोर गाड़ीत टाकून बाहेर नेऊन खड्डा काढून पुरुन टाकण्यास सुरुवात झाली. दवंडीचे रोख पैसे घेतले जातात. दवंडी देताना डफडे न वाजविण्याची पध्दत येते. हीन नसणारी गावकीची कामे फक्त यंका करीत होता. येसकरकीच्या भाकरी मागणे प्रभूला पटत नव्हते. अण्णाभाऊ, लहुजी यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साध्या

पध्दतीने सांजऱ्या करायचा संकल्प प्रभूचा असतो. त्यात कोणी मदत केली चांगले नाही केली तरीही चांगले. स्वतःच्या घरी पुण्यातिथी साजरी करतो. शाळा सुरु झाली की मातंग मुलामुलींची नावे शाळेत घालायला सांगतो. त्यावेळी गणा घरातली मुले शाळेत पाठवित नाही. गणाच्या घरी जाऊन त्याच्या बायकोला मुलांना शाळेत पाठवित नाही. गणाच्या घरी जाऊन त्याच्या बायकोला मुलांना शाळेत पाठविण्यास सांगतो, गणाचे मित्र संतोषच्या हातून वर्गणीचा डबा हिसकावून घेतात. प्रभूने घरगुती साजऱ्या केलेल्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला येऊन गणा गोंधळ घालतो गावातले सर्व लोक निघून जातात. त्याचा वाईट परिणाम प्रभूच्या मनावर होतो. गणाला गावातल्या मुलांसाठी प्रभू वर्गणी गोळा करतो याचा राग येतो. "जे लोक अ. म. मातंग संघाच्या चळवळीला पाण्यात पाहतात. जागोजाग चळवळीला विरोध करतात. त्यांच्या पोरांसाठी अ. म. मातंग संघाचे नाव घेऊन वर्गणी करायची काय गरज? त्याला कोणी या उचापती करायला सांगितल्या?" (वारुळ पृ. ३६५) संघाच्या माध्यमातूंन जे काय विधायक करायचे असेल ते मातंगासाठीच असा गणाचा विचार होता. गणा या प्रभूच्या कृती विषय अंभोऱ्यांना बोलतो. गावशाखेच्या अध्यक्ष गणा असल्यामुळे अंभोरे प्रभूला विरोध करायला लावतात. गणाला वाशिमला विकासची माणसे मारतात. त्याचा संशय प्रभूवर घेतला जातो.

पुण्यातिथीच्या कार्यक्रमापासूंन मनातून उध्वस्त झालेल्या प्रभूची ज्योती समजूत घालते. पुन्हा तो वर्गणीचा डबा घेऊन वर्गणी जमा करायला सुरुवात करतो. विनायक पाटीलांचा त्याला पाठींबा मिळतो. वर्गणीचा डबा फोडून १५ ऑगस्टला ड्रेस आणले जातात. वाघ गुरुजी व इतर शिक्षक प्रत्येकी एक ड्रेस देतात. प्रभूमुळे प्रत्येकाला ही प्रेरणा मिळालेली असते. त्यावेळी प्रभूचा सत्कार होतो. मुलांना ड्रेस वाटप केले जाते. त्याचे येशाजीला कौतुक वाटते. चळवळीमुळे यंका गावकीची कामे सोडतो. पोळयाच्या दिवशी तो तोरण बांधित नाही. हा चळवळीने केलेला एक बदल होता. प्रभूमुळे यंका जमिनीचे पट्टे वहितीला काढतो. गायरान वहितीला काढण्यासाठी विनायक पाटील पाठींबा देतात. प्रत्येक पोळयाला गणा स्वतःचा बँड फुकट बैल नेताना वाजवायचा परंतु चळवळीमुळे तो

वाजवित नाही. गणा बँडचे १०१ रुपये घेईन असे सांगतो. पोळयाला बँड नाही पण डफडे तरी वाजवावे असा आनंदा, लिंबा सांगतो. पण यंका डफडेही वाजविणार नाही. ही चळवळीमुळे मातंगात झालेली जागृती होती. ही विनायकलाही मान्य आहे. हारजीचा बाबू, झोपडपट्टीतला शिवा, जामटीचा नारायण कांबळे या तिघांना उद्योग—धंदयासाठी 'अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' तर्फे कर्ज मिळवून देण्यासाठी प्रभू त्यांना सूर्यकांत साठेकडे वाशिमला येतो. हे एक चळवळीचेच काम तो समाजबांधवांसाठी करतो. हे त्याचे काम वाशिम तालुका शाखा पदाधिकाऱ्यांनाही माहित असते. वडगावातील मातंगांनाही नाहित असते. साठे प्रभूविषयी कौतुकाचे शब्द बोलतात त्याच्या कार्याचा गौरव करतात. अ.म. मातंग संघाची खरी प्रेरणा सर्व मातंग बांधवावे जीवन प्रकाशमान व्हावं ही तळमळ आहे त्यावेळी डॉ. भोपळे साहेबांनी शिवसेनेत प्रवेश केलेला होता. याविषयी प्रभूला व इतर कार्यकर्त्यांना चिंता वाटते. एक—दीड वर्षेच चळवळ वाटयाला आली. चळवळीने सर्व मातंग समाज ढवळून निघाला समाजाने गावकीची कामे नाकारुन स्वाभीमान जगायचे म्हणून गावकीची कामे नाकारुन स्वाभीमाने जगायचे म्हणून गावकीचा विरोध सहन करण्याची हिमंत दाखविली. भाजप युतीचे महाराष्ट्रात सरकार उदया आले तर भोपळेसाहेब मंत्रीही हाऊ शकतील. प्रा. आंभोरे हे डॉ. भोपळे साहेबांवर टिका करतात. त्यामुळे चळवळीचे नुकसान होईल असे त्यांना वाटते.राजकारण समाजकारणाला पोषकच असते. असे प्रभुंचे मत होते. आंभोरेची टिका प्रभुला योग्य वाटत नाही.

प्रा. आंभोरे अ.म. मातंग संघ सोडून 'स्व. अण्णाभाऊ साठे क्रांतीदलाची' स्थापना करतात. त्यांच्या विचारांचे काही लोक त्यांच्याबरोबर जातात. अ.म. मातंग संघातही ही फुट पडलेली असते. भोपळे आणि आंभोरे फुटले तरी दोघेही समाजकार्यच करणार असतात. भोपळेंच्या मताला इतर सर्वजन पाठींबा देतात. आंभोरेंच्या जागी साठे प्रभूची सरचिटणीसपदी निवड करतात. वडगाव शाखेच्या कार्यकारणीची नव्याने निवड केली जाते. सूर्यकांत साठे म्हणायचे —'प्रभूजी तुम्हीच आमच्यासाठी तुमच्या गावची खरी कार्यकारणी' सरचिटणीस झाल्याबरोबर दोन दिवसातच प्रभूवर जबाबदारी सोपविली जाते. अ.म. मातंग संघ आणि बहुजन

आघाडीच्या वतीने दि. ८ डिसेंबर १९८५ मातंगांचा नागपूर भवनावर भव्य, विराट मोर्चा नेण्याचा निणर्य भोपळे घेतात. वाशिम विभाग प्रभूवर सोपवितात. या मोर्चाची पोस्टर गणा व मित्र फाडतात. या कार्यक्रमाला जाणाऱ्यांना धमकी देतात. प्रभू प्रमाणेच येसाजीलाही चळवळी विषयी कळकळ आत्मियता वाटत होती. पारुला आंबेडकर हे बौध्दांचेच वाटत होते. परंतु त्यांचे श्रेष्ठत्व लक्षात आल्यावर संतोष हे पारुला आंबेडकरांचे रुप वाटते. आंबेडकरांसारखा मोठा हो असा आर्शीवाद त्याला देते. हा तिच्यातील एक बदलच म्हणावा लागेल.

वाशिम संघटनेचा व्याप वाढलेला होता. जाती बांधवांना कामात मदत करण्यासाठी कुठेतरी एखादे कार्यालय असावे असे कार्यकर्त्यांना वाटते. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे कर्ज, पं. स. तर्फे राबविल्या जाणाऱ्या योजना, जि. प. च्या योजना हा व्याप संघाच्या पाठीमागे लावलेला होता. प्रभू आपल्या लोकाची कोर्ट कचेरीची कामे करीत होता. इतर साहेब, बाबू लोक, लोकांकडून पैसे घेत. प्रभू त्याला आटकाव करत होता. काम झाले की लोक पैसे घेत. प्रभू त्याला आटकाव करत होता. काम झाले की लोक पैसे हातात घालीत कमीत कमी चहा तरी घ्यावा लागत होता. प्रा. आंभोरे लोकांकडून जास्त पैसे काढीत प्रभू लोकांकडून आलेले पैसे संघटनेसाठी देतो. देवदेवतांविषयी चळवळीमुळे त्याची मते बदलेली होती. राम, कृष्ण विठ्ठल या देवदेवतांची पूजा करुन मातंगांचा कांहीच फायदा झाला नाही. चळवळीमुळे गावोगावच्या शाखांनी हिंन्दू देवदेवतांवर बहिष्कार टाकलेला होता. घरातले देव, घरातल्या तुळशी उपटून टाकायला सांगितल्या प्रभूला वाटत होते की लोक शिकले' सवरले अधश्रध्दामागील फोलपणा त्यांच्या लक्षात आला की ते सोडून देतील म्हणून तो अशा भानगडी उपस्थित करीत नाही.

डॉ. भोपळे प्रमाणेच प्रभूही समाजकारणाला राजकारणाची जोड देतो. भोपळेसाहेब आमदार तर प्रभू गावात सरपंचपदाची निवडणूक लढवितो. आपल्या मताची जास्तीत जास्त किंमत वसूल करतो. लिंबा व विकास यांचे प्रत्येकी सहा उमेदवार उभे असतात. संख्येने जास्त असणारांचे भवितव्य संख्येने कमी असणारांवर असते. त्यांसाठी लिंबा व विकास मतासाठी प्रभूच्या मागे लागतात. त्यावर प्रभू मतमोजणी होऊ दया असे सांगायचा लिंबाच्या पार्टीचे त्याच्यासह चार

सदस्य निवडून येतात. तर विकासचे फक्त दोन व त्यामुळे बौध्दांच्या दोन आणि मातंगांच्या एका मताला किंमत येणार होती. लिंबाने प्रभूवरच हवाला ठेवला 'आता तुझ्याच हातात हाये गड्या प्रभू ।' लिंबाला मातंगांचे एक मत महत्वाचे वाटू लागले होते. लिंबाला बौध्दांच्या दोन पैकी एकाला पटविणे जमले असते पण पुतळा प्रकरणात त्यालाही जेलचा त्रास झाला होता. मत कोणाला दयायचे? किती पैसे घ्यायचे याची सल्ला मसलंत करण्यासाठी मिटींग होतो पैसे प्रभूने घ्यावे किती घ्यावे त्यानंच ठरवावे असे सर्वानुमते ठरते. भेटलेले पैसे प्रभू आणि गजू यांच्या नावे बँकेत टाकावेत, पैसे आणायला गजू आणि प्रभूने जावे मातंग आपल्या मताची किंमत वसूल करायला निघतात. चळवळीच्या नेत्यांनीच त्यांना ही शिकवण दिलेली होती. तसा हां क्रांतीकारी दिवस होता. गावाला मातंगांची किंमत कळणारा होती. प्रभूला याचा आनंद झाला. चळवळीने दिलेल्या शहाणपणाच्या आधारावर मातंगवाडयाच्या एकीचे 'वारुळ' बांधले जाते. याचे रक्षण करण्यासाठी सर्व मातंगांनी प्रयत्न करावेत असे येसाजीला वाटते. कारण याला हानी पोचायला गावातले डोमे नाग (लिंबा बेले, आनंदा विनायक राजाराम, गणा) टपलेले आहेत. गणा लिंबाकडून एक मेंबरची रक्कम प्रभू, गजू अगोदर घेऊन जाती आडकाठी आणतो. त्यावर सर्वांना प्रश्न पडतो परंतु गजू गणांचे ऐकत नाही. म्हणून गजूला गणा सरपंच निवडणूकीच्या अगोदर घेऊन जातो. आडकाठी आणतो. त्यावर सर्वांना प्रश्न पडतो. परंतु गजू गणाचे ऐकत नाही. म्हणून गजूला गणा सरपंच निवडणूकीच्या अगोदर गायब करतो. विनायक प्रभूला सांगतो. 'लिंबा कोणत्याही परिस्थितीत सरपंच व्हायला नाही पाहिजे.' प्रभूला त्याची चिंता वाटते. कारण त्याने विनायकला शब्द दिलेला होता. मताच्या बदल्यात समाजमंदिर आणि उपसरपंच पद प्रभू मागतो. त्यापैकी मंदिर तेवढेच मान्य होते. चळवळीच्या स्थापने नंतर वडगावाची ही पहिलीच निवडणूक असते. त्यामुळे प्रभूचा जीव कासावीस होतो. निवडणूकीच्या दिवशी गणा, गजूला घेऊन येतो. विकासला सरपंचपदासाठी मत देतो. तर उपसरपंच म्हणून लिंबा पार्टीच्या नामदेव बेलेला देतो एवढा सगळा खेळ गजूच्या मताने होतो. चिडलेले लिंबा, राजाराम मास्तर व त्यांचे दोन भाऊ, मुले गणा गजूला शाळेच्या पाठीमागे नेऊन बेदम मारतात. प्रभू सगळे भेद विसरुन गणा,

गजूला अनसिंगला दवाखान्यात नेतो. व लिंबा, मास्तर यांच्या विरुध्द नावानिशी पोलीसात केस करतो हे सगळे परिवर्तन चळवळीमुळे शक्य होते.

### ९) आशयसूत्रांची गुंफण :—

कादंबरीचा अभ्यास सोयीस्कर व्हावा यासाठी कादंबरीच्या आशयसूत्रांची विविध अंगे पाहिली या आशयसूत्रांनेच लेखकाने कादंबरीचा गुंफण केलेली आहे. यांना एकमेकां पासून अलग करणे अशक्य आहे.

विशिष्ठ स्वभावाच्या व्यक्ती, विशिष्ठ प्रसंगात सापडल्यामुळे घटना प्रसंगांची निर्मिती होते. घटना प्रसंगाच्या बांधणीतूनच वेगवेगळी कथानके आकार घेत असतात. हे लक्षात घेऊन कादंबरीकडे पाहिल्यास तिची वीण लक्षात येते. प्रभू त्याचे वडील येसाजी, बायजा, पारु या छोटयाशा मातंग कुटुबाला केंद्रस्थानी ठेवून गावगाडयातील समाजाचे विविधांगी दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरी सामाजिक आहे. त्यामुळे मातंग, बौध्द समाजजीवनाबरोबर सवर्णांचे ही जीवन आपल्यासमोर उभे राहाते. मातंगांच्या वाटयाला येणाऱ्या सुख दु:खाच्या प्रसंगातून साकार होते. यामध्ये विविध आशयसूत्रांची गुंफण झालेली आहे. मातंग समाजांच्या विविध पौराणिक संदर्भाबरोबर कांदबरीत सामाजिक आशयांची मालिका सुरु होते. कादंबरीत ऐतिहासिक संदर्भही येतात. त्यामुळे सामाजिक व ऐतिहासिक ही दोन्ही आशयसूत्रे एकत्र येतात. राजकीय, सामाजिक, परिवर्तनवादी तसेच वास्तववादी आशयसूत्रेही एकमेकांत मिसळून येतात.

## • समारोप :—

समाजवास्तव चितारणारी कादंबरी म्हणजे 'वारुळ' या ठिकाणी समाजाचे चित्रण वऱ्हाडी भाषेच्या सहाय्याने केलेले दिसते 'प्रभू' हा नायक मातंग समाजाचा केंद्रस्थानी ठेवून मातंगांच्या तीन पिढयांचा इतिहास सांगितलेला आहे. बौध्दांच्या समाजाच्या उन्नतीतून प्रेरणा घेऊन मातंगही स्वत:चा उत्कर्ष करतात. आंबेडकरांचे परविर्तनाचे विचार मातंगांनाही प्रगतीसाठी उपयोगी ठरतात. संवाद आणि हे आधुनिक कादंबरीचे तंत्र स्वीकारुन मुसळे कांदबरीची सुरवात व शेवटही उत्तम

करतात. येसाजीच्या पिढीतील लोकांचे जीवन आणि प्रभूच्या पिढीला मिळालेले जीवन कसे परिवर्तनशील आहे. याचा आलेख परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून दाखविलेला आहे. मातंग—कुणबी संघर्ष मातंग—बौध्द संघर्ष, बौध्द—कुणबी संघर्ष इ. तून 'वारुळ' चे कथानक गतीमान होते तिला एक वेगळी धाटणी मिळते रचना निश्चित होते.

- **निष्कर्ष :—**

१) कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मय प्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा भरपूर मजकूर असतो. यास आपण कथानक म्हणतो.

२) 'वारुळ' ही एक बाबाराव मुसळेंची सामाजिक कादंबरी आहे. तिच्यातून समाजवास्तव चित्रित होते.

३) बाबाराव मुसळे यांच्या व्यक्तिमत्वाला चळवळीचा स्पर्श आहे. जाणिव आहे. त्याचे व्यक्तिमत्व साहित्याच्या पटलात वापरणारे आहे.

४) मुसळे ग्रामीण—दलित साहित्याच्या सीमारेषेवर लेखन करीत असले तरी त्यांनी दलित जीवन जवळून पाहिले आहे त्यालाच साहित्याच्या माध्यमातून उभे केले.

५) 'वारुळ' मधून मातंग समाजाच्या तीन पिढयांचा इतिहास येतो. त्यांच्या जीवनातील परिवर्तन कसे झाले? त्याचा आलेख टप्पा—टप्प्याने कादंबरीत येतो.

६) दलितांचे प्रश्न राजकीय, आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक इ. ना. वारुळ स्पर्श करुन जाते. दलित साहित्याच्या प्रेरणां सारख्याच 'वारुळ' च्या प्रेरणा आहेत.

७) बौध्दांचा विकास, विचार चळवळ, ही मातंग समाजविकासाला कशी उपयोगी पडते याचे चित्रण यात येते.

८) आंबेडकरी तत्वज्ञान डॉ. भोपळेंनी स्वीकारुन 'अ. म. मातंग संघ, नावाने परिर्वतनवादी चळवळ उभी केली व मातंगांचा विकास साधला याचे चित्रण येते.

९) मातंग—बौध्द याचे गावकुसाबाहेरचे जीवन, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या हाल—अपेष्टा, विदर्भातील सामाजिक चित्रण, कथानकातून कळते. जातीजातील वैर, पाटील, कुणबी, भावकी, इ. चा दलितांना होणारा त्रास यामध्ये येतो.

१०) छोटे छोटे प्रसंग छोटी वाक्ये यातून 'वारुळ'चे कथानक उलगडत जाते. गतिमान होते.

११) 'वारुळ' ला सामाजिक आशयाबरोबर राजकीय ऐतिहासिक परिवर्तनशील, पौराणिक इ. अनेक आशय प्राप्त होतात.

१२) मातंग समाजाला, परिवर्तनवादी चळवळीला लेखकाने 'वारुळ' संबोधले चळवळीची एकजूट करुन संरक्षण करणे हा या शीर्षकाचा मतितार्थ आहे.

१३) विदर्भातील—अकोला—अनसिंग—वासिम—वडगाव या भागातील वऱ्हाडी भाषा आपल्या सर्व वैशिष्टयांसह 'वारुळ' मध्ये अवतरते.

१४) प्रभू नायक आपल्या समाजाचे चळवळीच्या सहाय्याने संघटन करतो या आशयवार कादंबरीचा शेवट होतो.

## • संदर्भग्रंथ :—


१) डहाके वसंत आबाजी — संपा— 'वाङ्.मयीन संज्ञा संकल्पना कोश' पहिली आवृत्ती डिसेंबर (२००१) ग. रा. भटखळ फाऊंडेशन मुंबई ३४. पृ. क्र. ३२४.

२) तत्रैव — पृ. क्र. ३२५.

३) मुसळे बाबाराव यांनी लिहून पाठविलेली प्रश्नावली.

४) सानप डॉ. किशोर — 'अस्मितादर्श' ए. मे. जू. (२००५) पृ. क्र. ५०.

५) तत्रैव — पृ. क्र. ५०.

६) देशपांडे प्रा. अजय — 'लोकसत्ता' विदर्भरंग पुरवणी दि. ४ जून २००५.

७) देशपांडे प्रा. अजय — 'महाराष्ट्र साहित्या पत्रिका' क्र. ३१५. (आक्टों—नोव्हे—डिसें. २००५) पृ. क्र. ३५

८) मुसळे बाबाराव — 'दै सकाळ' सप्तरंग पुरवणी रविवार दि. १२/०६/२००५.

९) सानप डॉ. किशोर — 'प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर' पहिली आवृत्ती १९९८ बजाज पब्लिकेशन (पृ. क्र. १)

१०) बांदिवडेकर चंद्रकांत — 'मराठी कादंबरीचा इतिहास' मेहता कादंबरीचा इतिहास' पृ. क्र. ५.

११) नेमाडे भालचंद्र — 'टीका स्वंयवर' साकेत प्रकाशन, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती (२००१) पृ. क्र. २५३.

१२) डहाके वसंत आबाजी — संपा—'वाङ्.मयीन संज्ञा संकल्पना कोश' पहिली आवृत्ती (२००१) पृ. क्र. ११७. ग. रा. भटखळ फाऊंडेशन, मुंबई. पृ. क्र. ११७.

१३) मुसळे बाबाराव — 'वारुळ' (२००४)
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
पृ. क्र. २३.

१४) देशपांडे प्रा. अजय — 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' क्र. ३१५
(आक्टो., नोव्हें—डिसें. २००५)
पृ. क्र. ३६.

१५) नेमाडे भालचंद्र — 'कादंबरी शैली रुप मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप' संपा. गो. मा. पवार आणि म.द. हातकणंगलेकर
पॉप्युलर प्रकाशन मुंबई. पृ. क्र. २८९.

१६) मुसळे बाबाराव — 'वारुळ' (२००४)
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.